सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, १३ ऑगस्ट २०२४ | वर्ष दुसरे | अंक १४३ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# राष्ट्रीय संस्थात्मक रँकिंगमध्ये महाराष्ट्रातील ८० शैक्षणिक संस्था

## पुणे विद्यापीठाला सर्व राज्यांमध्ये तिसरी सर्वोत्कृष्ट विद्यापीठ म्हणून स्थान

नवी दिल्ली, १२ ऑगस्ट : केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी भारतीय मानांकने २०२४ अहवाल जारी केला. भारतातील उच्च शिक्षण संस्थांच्या भारतीय मानांकनाचा अहवाल जारी होण्याचे हे सलग नववे वर्ष आहे.

राजधानीतील भारत मंडपम येथील सभागृहात, केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्यावतीने उच्च शैक्षणिक संस्थांची राष्ट्रीय संस्थात्मक रँकिंग-२०२४ आज जाहीर करण्यात आली. शिक्षण, शिक्षण आणि संसाधने, शोध आणि व्यावसायिक कार्यप्रणाली, पदवी परिणाम, संपर्क आणि समावेशिता, कल्पना या मापदंडांवर एकूण १३ श्रेणींमध्ये




सर्वोत्कृष्ट ८० संस्थांची यादी जाहीर करण्यात आली आहे. विशेष म्हणजे वर्ष २०२४ पासून तीन नवीन श्रेणींचा समावेश करण्यात आला असून, यात राज्यांतील सर्वोत्कृष्ट विद्यापीठे, सर्वोत्कृष्ट मुक्त विद्यापीठे आणि कौशल्य विद्यापीठांचा समावेश करण्यात आला. यामध्ये पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठ या शैक्षणिक संस्थेला तीसऱ्या क्रमांकाचे सर्वोत्कृष्ट विद्यापीठाचे मान प्राप्त झाले.

या कार्यक्रमात केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान, केंद्रीय शिक्षण राज्यमंत्री डॉ सुकांती मुजुमदार, युजीसी अध्यक्ष प्रा. एम जगदीश कुमार, ऑल इंडिया कॉउंसिल ऑफ ट्रेनिंग अँड एजुकेशन अध्यक्ष प्रा. टी.जी. सिथाराम, शिक्षण मंत्रालयाचे सचिव के. संजय मूर्थी, सह सचिव गोविंद जयस्वाल यासह सर्व विद्यापीठांचे कुलगुरू व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

सर्वोत्कृष्ट समग्र संस्थांमध्ये महाराष्ट्राच्या ११ संस्था

संस्थात्मक रँकिंगच्या यादीत समग्र संस्थांच्या श्रेणीमध्ये निवडलेल्या देशातील १०० शैक्षणिक संस्थांमध्ये महाराष्ट्रातील ११ शैक्षणिक संस्थांचा समावेश आहे. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी बॉम्बे या क्रमवारीत तीस-या स्थानावर आहे तर होमी भाभा राष्ट्रीय संस्था, मुंबई (२७), सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे (३७), भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्था पुणे, (४२), सिम्बायोसिस इंटरनॅशनल पुणे, (५२), रसायनशास्त्र तंत्रज्ञान संस्था, मुंबई (५६), डॉ. डी. वाय पाटील विद्यापीठ, पुणे(६३), दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ हायर एडुकेशियन अँड रीसर्च, वर्धा (७१), विश्वेश्वरैया राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, नागपूर (७७), एस. व्ही. के. एम. ची नरसी मोंजी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, मुंबई(८४) तसेच टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स मुंबई (९८) क्रमांकावर आहे.

# लाडकी बहीण योजनेतून अर्थव्यवस्थेला चालना मिळेल : मुख्यमंत्री

मुंबई : 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजना' व अन्नपूर्णा योजना या सर्वसामान्य महिलांच्या कुटुंबाला आधार देण्यासाठी सुरू करण्यात आल्या आहेत. मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण ही योजना राज्यातील अर्थव्यवस्थेला चालना देणारी योजना आहे. शासन राज्याच्या विकासाला प्राधान्य देत असतानाच कल्याणकारी योजनाही राबवित असून यातून विकास व कल्याण यांची सांगड घालण्याचा प्रयत्न करीत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे केले.

इंडिया टुडे ग्रुपच्या 'मुंबई तक बैठक' कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते. मुंबई तकच्या अँकर हर्षदा परब, अनुजा धाक्रस आणि माधवी देसाई यांनी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांची आज मुलाखत घेतली.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, हे सर्वसामान्यांचे शासन



आहे. मुख्यमंत्री- माझी लाडकी बहिण योजना, अन्नपूर्णा योजना याबरोबरच वयोश्री योजना, तीर्थक्षेत्र योजना अशा अनेक कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. मुख्यमंत्री-माझी लाडकी बहिण योजनेची तयारी ही गेल्या आठ-नऊ महिन्यांपासून सुरू होती. घरातील महिलांना घरखर्च करताना कसरत करावी लागते. त्यांना आधार देण्याचा प्रयत्न मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेतून राज्य शासन करत आहोत. ही योजना सध्या मोठ्या प्रमाणात यशस्वी होत आहे. त्याचप्रमाणे अन्नपूर्णा योजनेतून वर्षातून तीन गॅस सिलेंडर देण्यात येणार आहेत. 'लेक लाडकी लखपती योजना' तसेच मुलींना उच्च शिक्षणासाठी शिक्षण शुल्क माफी अशा योजनेतून महिलांना केंद्रबिंदू मानून राज्य शासन काम करत आहे. या कल्याणकारी योजनांसाठी निधीची तरतूद करूनच त्याची अंमलबजावणी केली जात आहे. महाराष्ट्र हे राज्य प्रगतीशील राज्य असून राज्याच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधांची कामे हाती घेण्यात आली आहेत. मोठ्या प्रमाणात उद्योग सुरू होत असून रोजगार संधी निर्माण होत आहेत, असेही त्यांनी सांगितले. माध्यमे ही लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. राज्य शासन करत असलेली सकारात्मक कामे, योजना ही माध्यमांनी आपल्या व्यासपीठावरून लोकांपर्यंत पोहोचवावीत. लोकांच्या हिताची कामे दाखवावेत. वस्तुनिष्ठ माहिती पोचवावी. लोकांच्या समस्यांना वाचा फोडणारी पत्रकारिता व्हावी अशी अपेक्षा आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

# बारावीची परीक्षा ११ फेब्रुवारीपासून, तर दहावीची २४ फेब्रुवारीपासून

## दहावी, बारावीच्या परीक्षेचे वेळापत्रक जाहीर

पुणे : राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून फेब्रुवारी/मार्च २०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षाचे संभाव्य वेळापत्रक जाहीर झाले असून यंदा प्रथमच दोन्ही परीक्षा नियोजित तारखेपेक्षा ८ ते १० दिवस अगोदर होणार आहेत. बारावीची लेखी परीक्षा दि. ११ फेब्रुवारी २०२५ ते दि. १८ मार्च २०२५ या कालावधीत तर दहावीची लेखी परीक्षा २१ फेब्रुवारी २०२५ ते १७ मार्च २०२५ या कालावधीत होणार आहे.

विद्यार्थ्यांना अभ्यासाच्या तयारीच्या दृष्टीने राज्य मंडळाकडून दरवर्षी परीक्षेच्या तारखा ५ ते ६ महिने अगोदर जाहीर केल्या जातात. त्यानुसार फेब्रुवारी/मार्च २०२५ मध्ये आयोजित परीक्षांच्या तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या पुढील शैक्षणिक वर्षाची प्रवेशप्रक्रिया वेळेत होण्यासाठी तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षांच्या तयारीला विद्यार्थ्यांना पुरेसा वेळ मिळावा यासाठी यंदापासून दोन्ही परीक्षा ८-१० दिवस लवकर होत आहेत. बारावीची प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी परीक्षा व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा दि. २४ जानेवारी ते दि. १० फेब्रुवारी या कालावधीत होणार आहे.

दहावीची प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी परीक्षा व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा दि. ३ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी या कालावधीत होणार आहे. प्रात्यक्षिक परीक्षा, तोंडी, श्रेणी, अंतर्गत मूल्यमापन परीक्षा व लेखी परीक्षेचे सविस्तर विषयांचे वेळापत्रक स्वतंत्रपणे मंडळाच्या संकेतस्थळावर जाहीर केले जाणार आहे. या संभाव्य वेळापत्रकावर सूचना, हरकती मांडण्यासाठी दि. २३ ऑगस्ट पर्यंत मुदत देण्यात आली आहे. मंडळाच्या संकेतस्थळावर या सूचना पाठवायच्या आहेत. निर्धारित वेळेनंतर येणाऱ्या सूचनांचा विचार केला जाणार नाहीत, अशी माहिती राज्य मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

## स्वातंत्र्यदिनानिमित्त दिल्लीत हायअलर्ट!

नवी दिल्ली : बांगलादेशात सध्या गृहयुद्ध भडकले आहे. अनेक बांगलादेशी नागरिक भारताच्या हद्दीत येण्याचा प्रयत्न करत आहेत. या पार्श्वभूमीवर भारताच्या स्वातंत्र्यदिनानिमित्त दिल्लीत हायअलर्ट जाहीर करण्यात आला आहे. दिल्लीच्या पोलीस मुख्यालयात उच्चस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीत स्वातंत्रदिनाच्या पार्श्वभूमीवर बांगलादेशमधील परिस्थिती बघता दिल्ली एनसीआरमध्ये कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून बैठकीत चर्चा झाली. यानंतर दिल्ली पोलिसांना अलर्ट मोडवर राहण्याचे आदेश देण्यात आले. स्पेशल सेल, क्राईम ब्रान्च आणि जिल्हा पोलिसांना अलर्ट राहण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या आहेत.

# मानधन वाढीसाठी अंगणवाडी सेविकांचा पुन्हा ठिय्या; आझाद मैदानात उतरला लाखोंचा समुदाय!

मुंबई : राज्यभरातील अंगणवाडी सेविकांसंर्दभात मोठी बातमी समोर आली आहे. मुंबईतील आझाद मैदानावर अंगणवाडी सेविकांनी बेमुदत संप पुकारला आहे. याआधी ४ डिसेंबर २०२३ रोजी राज्यातील अंगणवाडी सेविकांनी राजव्यापी संप केला होता. मानधनात दरमहा ५ हजार रूपये वाढ होईल, असे आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आले होते. मात्र अद्यापही पगारवाढीसंदर्भात कोणताही प्रस्ताव दिला नसल्यामुळे अंगणवाडी सेविकांनी पुन्हा एकदा संपाची हाक दिली आहे.

मानधनात वाढ करण्याच्या मागणीसाठी अंगणवाडी सेविकांनी पुन्हा आक्रमक रुप धारण केले आहे. त्यामुळे राज्यातील अंगणवाडी सेविका आजपासून संपावर जाणार आहेत. तर येत्या २१ ऑगस्ट रोजी सेविका सरकार विरोधात मोर्चा काढणार असून यामध्ये २ लाख अंगणवाडी सेविका सहभागी होणार आहेत.



**काय आहेत अंगणवाडी सेविकांच्या मागण्या?**

मानधनात वाढ करण्याचा निर्णय घ्यावा., कायदेशीररित्या ग्रॅच्युइटी देण्यात यावी., मान्य केल्याप्रमाणे मासिक पेन्शन योजना लागू करावी., प्रलंबित प्रस्ताव तत्काळ मान्य करावा.

## निवासी डॉक्टरांची संपूर्ण देशात संपाची घोषणा

कोलकाता : कोलकाता येथील आरजी कर मेडिकल कॉलेजमधील एका महिला डॉक्टरवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या करण्यात आली होती. याप्रकरणानंतर एकच खळबळ उडाली होती. आता हे प्रकरण चांगलेच तापताना दिसत आहे. याच घटनेच्या निषेधार्थ निवासी डॉक्टरांच्या संघटनेने 'फेडरेशन ऑफ ऑल इंडिया रेसिडेंट डॉक्टर्स असोसिएशन'ने १२ ऑगस्टपासून संपूर्ण देशात संपाची घोषणा केली आहे. आरजी कर मेडिकल कॉलेजचे ज्युनियर डॉक्टरही पीडितेला न्याय मिळावा या मागणीसाठी आंदोलन करत आहेत. सध्या हे रुग्णालय बंद आहे. पोलिसांनी केवळ एका आरोपीला अटक केली आहे, तर इतर अनेक लोकांचा या घटनेत सहभाग असू शकतो, अशी शक्यता व्यक्त केली आहे.

## मुळा धरणातुन आज दुपारी ३ वाजता; २ हजार क्युसेकने पाण्याचा नदीपात्रात विसर्ग

अहमदनगर दि. १२ ऑगस्ट (जिमाका) : मुळा धरणाची एकूण साठवण क्षमता २६ टीएमसी एवढी असुन आजघडीला धरणाच्या जलाशय परिचालन सूचीनुसार लोअर गाईड व अप्पर गाईड कर्व्हनुसार पाणीसाठा नियंत्रित ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे आज सोमवार १२ ऑगस्ट रोजी दूपारी ३-०० वाजता मुळा धरणातून २ हजार क्यूसेक्सने नदीपात्रामध्ये पाण्याचा विसर्ग सोडण्यात येणार आहे. आपत्कालीन परिस्थितीमध्ये आवश्यकता भासल्यास मुळा धरणातून नदीपात्रामध्ये टप्प्याटप्प्याने विसर्ग वाढवण्यात येणार असुन मुळा नदीकाठच्या गावांनी आवश्यक ती दक्षता घेण्याचे आवाहन मुळा पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता सायली पाटील यांनी केले आहे. नदीकाठावरील गावातील नागरिकांनी नदीपात्रातील चल मालमत्ता, चीजवस्तु ,वाहने, पशुधन , शेती अवजारे व इतर मनुष्य उपयोगी संसाधने सुरक्षित स्थळी स्थलांतरित करावी. नदीपात्रात प्रवेश करु नये. कुठलीही जिवित व वित्त हानी होणार नाही याबाबत दक्षता घेण्याचे आवाहनही प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

**मुळा नदीकाठच्या गावातील नागरिकांनी दक्षता घ्यावी**

# शाळेत जायला रस्ता तरी द्या; विद्यार्थ्यांची आर्त हाक

वाळूज महानगर (प्रतिनिधी) औद्योगिक परिसराच्या अगदी जवळच असलेल्या जोगेश्वरी गावातील आंबेडकरनगरामधील विद्यार्थ्यांना गेल्या कित्येक वर्षांपासून चिखल तुडवीत शाळेत जावे लागत आहे. सध्या पावसामुळे रस्त्यावर पाण्याचे डबके तयार झाले असून त्या पाण्यावर डासांचा वावर होत आहे. सर्वत्र चिखलमय रस्ता निर्माण झाला आहे. शैक्षणिक धडे घेण्यासाठी विद्यार्थी आतुर आहेत पण चिखलाचा रस्ता आडवा येतो या रस्त्यावरून पावसाळ्यात शाळेला जाताना मोठी कसरत करावी लागत आहे. निदान शाळेसाठी तरी रस्ता द्या अशी आर्त हाक विद्यार्थी देत आहेत.

दरवर्षी याच रस्त्याने शाळेला जाणार्या विद्यार्थ्यांना चिखल तुडवीत जावे लागते. अनेक विद्यार्थी तसेच नागरिक चिखलात घसरून





पडतात. हा रस्ता वर्दळीचा असून, दुचाकी देखील शाळेच्या दिशेने मार्गक्रमण करू शकत नाही कारण विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी पुरेसा रस्ता नाही. वाहनधारकांना तसेच पायी चालणार्या विद्यार्थ्यांना, पालकांना खुप कसरत करत शाळेच्या दिशेने मार्गक्रमण करावे लागत आहे.पावसाच्या पाण्यामुळे झालेल्या चिखलमय रस्त्यावरून चालताना चिमुकल्या विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.आम्ही शाळेत कसं जायचं? आम्हाला शाळेत जाण्यासाठी चांगला रस्ता द्या, अशी मागणी विद्यार्थ्यांसह पालकवर्ग करत आहे. या खराब रस्त्यामुळे विद्यार्थ्यांसह पालकांना मानसिक व शारीरिक त्रास होताना दिसून येत असून त्यामुळे संताप व्यक्त होत आहे. या वसाहतीला कोणीच वाली नाही, आम्ही गेल्या १०-१२ वर्षांपासून आमचा विकास करून घेण्यासाठी धडपड करीत असून, आम्हाला कोणीच साथ देत नाही, निवडणुका आल्या की आमच्या दारावर चकरा सुरू होतात, आश्वासनांचा पाऊस पडतो, निवडणुका संपल्या की साधे ढुंकूनही कोणी पाहत नाही.

या वसाहतीतील कोणताच रस्ता सुस्थितीत नाही, एखाद्या गर्भवती अथवा आजारी व्यक्तीला खाटेवरूनही घेऊन जाणे शक्य होणार नाही, इतकी भयानक परिस्थिती आहे. आमची लहान मुले, महिला, वृद्ध तापाने फणफणत असून, या परिसरात साथीच्या आजाराने ग्रासले असल्याचे अर्चना शिरसाट, वंदना शिरसाट, मंगल पैठणे, कोमल भालेराव, रेखा कांबळे, शिला वाघमारे, सुमन वाघमारे, सारा अर्नाजलम, अनिता अल्हाट, कल्पना जगताप, कविता वाघमारे, शिला वाघमारे, सोनाली पवार, सोनली गव्हाणे आदी महिलांनी 'तरुण भारत'कडे तक्रारीचा पाढा वाचला.

**१४ महिन्यापासून मी कार्यरत आहे, या अगोदर कोणताच विकास या परिसरात म्हणावा तसा झालेला नाही, सर्वप्रथम मी या परिसरातील गटार नाल्याचे काम हाती घेतले, त्यानंतर मी रस्ता तयार करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले असून, त्यानुसार काही भागात मी रस्त्याचे कामही सुरू केले आहे, आंबेडकरनगर हा शंभर एकरचा गट आहे, सध्या ग्रामपंचायतीकडे बजट नाही, तसेच या परिसरातील नागरिक कर ही भरत नाहीत, जर सर्वच नागरिकांनी ग्रामपंचायतीकडे कर जमा केला तर त्याच्या दुप्पट मी या ठिकाणी विकास काम करण्यास तयार आहे. तरीही मी याठिकाणी बरेचसे काम हाती घेतले असून, काही ठिकाणी रस्त्याचे काम झाले तर काही ठिकाणी सुरू आहे.**

**-योगिता रामेश्वर आरगडे (सरपंच)**

## शंभू बॉर्डर अंशताः उघडण्यात यावी- सर्वोच्च न्यायालय

नवी दिल्ली, १२ ऑगस्ट : पंजाब आणि हरियाणाला जोडणारी शंभू सीमा अंशत: उघडण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. या प्रकरणावर आज, सोमवारी सुनावणी करताना न्यायालयाने महिला आणि मुलांसाठी सीमा खुली करण्यात यावी, असे सांगितले. याशिवाय रुग्णवाहिका, अत्यावश्यक सेवा आणि स्थानिक प्रवाशांच्या वाहतुकीसाठी शंभू सीमेवरील रस्ता अंशत: खुला करण्याची गरज आहे. शंभू सीमेवरून ट्रॅक्टर हटवण्यासाठी पंजाब सरकारला शेतकऱ्यांशी बोलून त्यांचे मन वळवण्यासही न्यायालयाने सांगितले आहे.

सुप्रीम कोर्टाने पंजाब सरकारला शंभू सीमेवरील रस्त्यावरून ट्रॅक्टर हटवण्यास आंदोलक शेतकऱ्यांना पटवून देण्यास सांगितले. महामार्ग हे वाहने पार्किंगसाठी नसतात, असे न्यायालयाने म्हटले आहे. अशाप्रकारे अनेक महिन्यांपासून शंभू सीमेवर ट्रॅक्टर घेऊन उभे असलेल्या आंदोलक शेतकऱ्यांवरही सर्वोच्च न्यायालयाने तीव्र प्रतिक्रीया दिलीय. न्यायालयाने पंजाब, हरियाणाच्या पोलीस महासंचालकांना शेजारील जिल्ह्यांच्या पोलीस अधीक्षकांसोबत शंभू सीमेवरील रस्ते अंशत: पुन्हा सुरू करण्यासाठी आठवड्याभरात बैठक घेण्याचे निर्देश दिले.

# नगरकरांच्या सहकार्यामुळे विषाणूजन्य आजारांवर नियंत्रण मिळविण्यात यश : यशवंत डांगे

### एक तास स्वच्छतेसाठी या मोहिमेचा चौथा आठवडा, शिवाजीनगर कल्याण रोड परिसरात जनजागृती व स्वच्छता मोहीम

अहमदनगर : पावसाळ्यात उद्भवणारे विषाणूजन्य आजार रोखण्यासाठी एक तास स्वच्छतेसाठी ही मोहीम महानगरपालिकेने सुरू केली होती. त्यानुसार दर रविवारी एक तास आपला परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी नागरिकांनी पुढे यावे यासाठी आवाहन करण्यात आले होते. त्या जनजागृती मोहीमेला अहमदनगर शहरातील सर्व भागातील नागरिकांकडून सहकार्य मिळाल्यामुळे विषाणूजन्य आजारांवर नियंत्रण मिळवण्यात यश आले असल्याचे प्रतिपादन महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी केले.

झिका, डेंग्यू आदी



विषाणूजन्य आजार रोखण्यासाठी जनजागृती मोहिमेच्या चौथ्या रविवारी शिवाजीनगर - कल्याण रोड परिसरात जनजागृती व स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. त्यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना आयुक्त डांगे बोलत होते. यावेळी आयुक्त डांगे यांनी सांगितले की, या पावसाळ्यातील चार आठवडे पूर्ण झाले असून येत्या चार आठवड्यांमध्ये विषाणूजन्य आजारांवर उपाययोजना व जनजागृती करण्यासाठी आणखी दक्षता घेणे आवश्यक आहे. त्यासाठी नागरिकांच्या सहकार्यातून महापालिका प्रशासन आवश्यक त्या सर्व खबरदारीच्या उपायोजना करीत आहे.

या जनजागृती मोहिमेत माजी नगरसेवक श्याम नळकांडे, महापालिका वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. अनिल बोरगे, संदीप दातरंगे आदींसह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शासनाच्या निर्देशानुसार ९ ते १५ ऑगस्ट दरम्यान नागरिकांनी आपल्या घराच्या छतावर राष्ट्रध्वज फडकवावा व हर घर तिरंगा या मोहिमेत उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवावा, असे आवाहन देखील यावेळी आयुक्त डांगे यांनी उपस्थितांना केले.

त्यानंतर आयुक्त डांगे यांनी अहमदनगर शहरात विविध भागात स्वच्छता कर्मचाऱ्यांसोबत स्वच्छता कार्यात स्वतः सहभागी होऊन स्वच्छता मोहीम राबवली.

## जागावाटप आणि निवडणुका जिंकण्याचे नियोजन फडणवीसांच्या नेतृत्वाखाली सुरु - आशिष शेलार

मुंबई, १२ ऑगस्ट : भाजपाने महाराष्ट्रातील आगामी विधानसभा निवडणुकांसाठी महत्त्वपूर्ण पावले उचलली असून, तिकीट वाटपाची संपूर्ण जबाबदारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर सोपवली आहे. रविवारी झालेल्या भाजप कोअर कमिटीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला, अशी माहिती भाजप नेते आशिष शेलार यांनी दिली.

या बैठकीत प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, फडणवीस, महाराष्ट्र विधानसभा प्रभारी भूपेंद्र यादव, सह संघटन मंत्री शिवप्रकाश, मुंबई अध्यक्ष आशिष शेलार, सरचिटणीस विनोद तावडे, आणि पंकजा मुंडे यांची उपस्थिती होती. फडणवीस यांना विधानसभा निवडणुकीतील भाजप उमेदवारांच्या तिकीट वाटपाचे सर्वाधिकार देऊन पक्षाने त्यांच्यावर विश्वास दाखवला आहे. शेलार यांनी यासंदर्भात सांगितले की, जागावाटप आणि निवडणुका जिंकण्याचे नियोजन फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सुरू केले जाईल.

भाजपाने आगामी निवडणुकीसाठी १५ दिवसांचा कार्यक्रम आखला आहे. यामध्ये प्रत्येक विधानसभा मतदारसंघात भाजप आमदार कार्यकर्त्यांसोबत स्नेहभोजन आयोजित करून त्यांचे मत जाणून घेणार आहेत. तसेच, गावपातळीवर जनसहभाग वाढवण्यासाठी भाजप कार्यकर्त्यांना अधिक सक्रिय करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## सोयगाव शहरात हर घर तिरंगा रॅली संपन्न



सोयगाव,दि.१२ ऑगस्ट : संत ज्ञानेश्वर कनिष्ठ महाविद्यालयातील व कै.बाबुरावजी काळे मराठी स्कूल च्या विद्यार्थ्यांनी हर घर तिरंगा यासाठी सोयगाव शहरात तिरंगा रॅली काढण्यात आली घोषवाक्यातून हर घर तिरंगा,वंदे मातरम,भारत माता की जय अशा घोषणा देऊन नागरिकांमध्ये देशभक्ती बद्दल जागृतता निर्माण करण्यात आली.या रॅलीमध्ये महाविद्यालयातील प्राचार्य डॉ.शिरीष पवार,उपप्राचार्य डॉ. रावसाहेब बारोटे,क.म.वि.प्रमुख डॉ.उल्हास पाटील डॉ.सुभाष पाटील,प्रा.आर.टी.जाधव,प्रा.टी.आर.शेख, प्रा.अनिल मानकर,प्रा. दीपक कल्याणकर निकम,प्रा.भारती पाटील, प्रा,स्वाती देशमुख,शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर एलिस, देसाई मॅडम,कथलकर मॅडम व शाळा महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

## 'सुपर एग अँड मिल्क' पौष्टिक बिस्किट लाँच केले

छत्रपती संभाजीनगर –आयटीसी सनफीस्ट नेहमीच आपल्या ग्राहकांना काही नवीन आणि विशेष अनुभव देण्यासाठी प्रसिद्ध आहे. या संदर्भात, आयटीसीसनफिस्टने आज हेन आणि काऊ यांच्यातील एक आगळ्यावेगळ्या कॉन्फरन्सचे आयोजन केले होते. या कॉन्फरन्समध्ये त्यांच्या प्रतिनिधींमध्ये चर्चा झाली, जिथे त्यांनी मुलांसाठी दूध आणि अंडी अधिक महत्वपूर्ण बनवण्याच्या आव्हानांवर विनोदीपणे प्रकाश टाकला आणि चांगले पोषण देण्यासाठी त्यांच्या योगदानावर भर दिला. कॉन्फरन्समधील सर्वसाधारण चर्चेनंतर, एक मोठी पॅनेल चर्चा आयोजित करण्यात आली होती, ज्यामध्ये विविध क्षेत्रातील मान्यवरांनीही सहभाग घेतला. याठिकाणी उपस्थित असलेल्या मान्यवर व्यक्तींमध्ये श्री मदन मोहन मैती, चेअरमन, नॅशनल एग कोऑर्डिनेशन कमेटी (एनईसीसी) पश्चिम बंगाल, डॉ. दुलाल चंद्र सेन, वाइस चेअरमन, आयडीए पूर्व विभाग, डॉ. अनन्या भौमिक, क्लिनिकल न्यूट्रिशनिस्ट आणि लाइफस्टाइल कन्सल्टन्ट, सेलिब्रिटी मॉम कोनिका बॅनर्जी, अर्चना सिन्हा, को-फाउंडर आणि सीईओ, नरिशिंग स्कूल्स उपस्थित होते. मुलांचा विकास होणाऱ्या वयामध्ये अंडी आणि दूध या दोन्ही गोष्टी अत्यंत महत्त्वपूर्ण असतात यावर पॅनेलने भर दिला, कारण हे दोन्ही व्हिटॅमिन ए, डी, ई, लोह इत्यादीसह इतर अनेक पोषक घटकांसह प्रथिनांचे महत्वाचे स्रोत आहेत. मुलांसाठी दूध आणि अंड्याचे सेवन अधिक वाढवण्यासाठी नवीन मार्ग विकसित करण्याच्या पद्धतींवरही पॅनेलने चर्चा केली.

## एमजी विंडसर क्षेत्रातील प्रथम एरो-लाउंज सीट्सचे फिचर देणार

पुणे : फारच अपेक्षित असलेली क्रॉसओव्हर युटिलिटी व्हेईकल (सीयूवी) – एमजी विंडसरमध्ये क्षेत्रातील प्रथम एरो-लाउंज सीट्स असतील, ज्यामध्ये आलिशानपणा आणि आराम यांचे अमर्याद एकत्रीकरण आहे.एमजी विंडसरच्या उत्कृष्ट वैशिष्ट्यांपैकी एक म्हणजे १३५ओ रेक्लाइनसह एरो-लाउंज सीट, आलिशानपणा आणि आरामदायीपणा यांचा अतुलनीय अनुभव देण्यासाठी डिझाइन केलेली आहे. काळजीपूर्वक तयार केलेला रेक्लाइन अँगल हे सुनिश्चित करतो की, प्रवासी स्टाईलमध्ये आराम करू शकतात, अगदी ते शहराच्या छोट्या प्रवासावर असले किंवा लांब पल्ल्याच्या प्रवासात असले तरीसुद्धा. विंडसर कॅसलच्या भव्यतेने प्रेरित होऊन, इंटेलिजेंट सीयूवी मधील प्रशस्त केबिन कार्याभ्यास आणि सौंदर्यशास्त्रावर भर देऊन डिझाइन केले आहे, ज्यामुळे स्थिरता आणि समृद्धीची भावना आणखी वाढते.

## बालाजी खतगांवकर यांच्या अनुभवाचा फायदा घ्यावा...मंत्री शंभुराजे देशाई

मुखेड – बालाजी पाटील खतगावकर हे अनुभव अधिकारी आहेत,काम कशा पध्दतीने करुन घ्यावे याची सविस्तर माहिती त्यांना आहे. या भागातील जनतेनी त्यांच्या अनुभवाचा फायदा घेवून आपल्या भागाचा विकास साधावा असे प्रतिपादन राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभुराजे देशाई यांनी केले. ते मुखेड येथे बालाजी पाटील खतगावकर यांनी सुरु केलेल्या शिवसेना मध्यवर्ती कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. व्यासपीठावर माजी खा.हेमंत पाटील,आ.बालाजी कल्याणकर,माजी आ.सुभाष साबणे,माजी आ.राम पाटील रातोळीकर,जिल्हा प्रमुख उमेश मुंडे,बोंढारकर,गंगाधर बडुरे आदींची उपस्थिती होती.

## रक्तवाहिन्या आणि रक्तगट जुळत नसतांना केली शस्त्रक्रिया

पुणे – वेगळा रक्तगट आणि अनेक रक्तवाहिन्या असलेल्या आव्हानात्मक अशा किडनी निकामी झालेल्या ४० वर्षीय महिला रुग्णावर पुण्यातील बाणेर स्थित मणिपाल हॉस्पिटल मधील डॉक्टरांनी यशस्वी रित्या किडनीबदलाची शस्त्रक्रिया केली आहे. गृहिणी असलेल्या आरती मशाले यांना २०१५ पासून विविध प्रकारच्या आरोग्याच्या तक्रारी होत्या. त्यांच्या आजारपणाची सुरुवात ही एसएलई (सिस्टमॅटिक ल्युपस एरिथेमाटोसस) आणि दुर्बल रोगप्रतिकारशक्ती असलेल्या ल्युपस नेफ्रायटिस या आजाराच्या निदानाने झाली होती. पाच प्रकारच्या विविध औषधोपचार पध्दतींचा वापर करुनही त्यांचे हायपरटेन्शन हे नेहमीच अनिंत्रित होते.

## हिमटेक्स उत्पादन क्रांती प्रज्वलित करण्यासाठी सज्ज

पुणे – हैदराबाद उद्योग नावीन्यपूर्ण आणि टिकाऊपणाच्या ऐतिहासिक अभिसरणाची तयारी करत आहे. १६ ते १९ ऑगस्ट २०२४ दरम्यान, हिमटेक्स प्रदर्शन केंद्र हैदराबाद इंटरनॅशनल मशीन टूल अँड इंजिनिअरिंग एक्स्पो ( हिमटेक्स ) ची ८ वी आवृत्ती, इंडिया प्रोसेस एक्स्पो आणि कॉन्फरन्स (आयपीईसी) ची तिसरी आवृत्ती आणि उद्घाटन इको सस्टेन एक्सपो आयोजित करेल. ,हिमटेक्स २०२४ मधील ३०० हून अधिक प्रदर्शक मशीन टूल्स, ऑटोमेशन, रोबोटिक्स आणि औद्योगिक अभियांत्रिकीमध्ये अत्याधुनिक प्रगती सादर करतील. उपस्थित लोक उत्पादनाच्या भविष्यात प्रगती करण्यासाठी डिझाइन केलेले तंत्रज्ञान आणि उपायांचे विस्तृत स्पेक्ट्रम एक्सप्लोर करतील.

### निधन वार्ता

## तुळशीराम बोडखे यांचे निधन



सोयगाव,दि.१२ ऑगस्ट – रामजीनगर येथील रहिवासी तुळशीराम दौलत बोडखे (वय.६०) यांचे सोमवार रोजी सकाळी ११:०० वाजता हृदयविकाराने निधन झाले.त्यांच्या पार्थिवावर सोमवार रोजी सायंकाळी ७:०० वाजता सोयगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी,एक मुलगा,दोन मुली,सुन,नातवंडे,असा परिवार आहे. ते भगवान बोडखे यांचे मोठे बंधू होत.

## अंजनाबाई जोहरे यांचे निधन



सोयगाव,दि.१२ ऑगस्ट – तालुक्यातील गलवाडा (अ)येथील रहिवासी अंजनाबाई अर्जुन जोहरे (वय.८२) यांचे सोमवार रोजी सकाळी ५:०० वा.निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सोमवार रोजी ४:०० वा.गलवाडा ता.सोयगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा,एक मुलगी,सुन,नातवंडे,असा परिवार आहे. ते विक्रांत जोहरे यांच्या आजी होत

## गजरीबाई राठोड यांचे निधन



सोयगाव,दि.१२ ऑगस्ट : तालुक्यातील नांदातांडा येथील गजरीबाई वाघा राठोड (वय.११०) यांचे रविवार रोजी सायंकाळी ५:१५ वा.निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी रोजी सकाळी ९:०० वा.नांदाताडा ता.सोयगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुले,सुना,नातवंडे,असा परिवार आहे.

# विद्यार्थ्यांसाठी शिक्षणासोबत व्यवहारज्ञान महत्वाचे : राधा कडवकर

## कन्या विद्यालयात विद्यार्थिनी बनवलेल्या राखी विक्रीचा शुभारंभ



तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.१३ ऑगस्ट -जीवनात आपल्याला आपल्या पायावर सक्षमपणे उभे रहता आले पाहिजे.भविष्यात प्रत्येकाला शिकून नोकरी लागेलच असे नाही,त्यासाठी व्यवसाय करण्याचा मोठा पर्याय सर्वांकडे आहे.शालेय जीवनात विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत व्यवहारज्ञान व व्यवसायासंदर्भात धडे घेणे,शिकणे महत्वाचे आहे असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्त्या व आर्ट ऑफ लिव्हिंगच्या समन्वयक राधा कडवकर यांनी शहरातील सावित्रीबाई फुले कन्या विद्यालय येथे सोमवारी (ता. १२) केले.

विद्यालयातील मुलींनी स्वतः तयार केलेल्या राखी विक्रीच्या शुभारंभ प्रसंगी उदघाटक म्हणून त्या बोलत होत्या. यावेळी मुख्याध्यापक संजय जाधव, पर्यवेक्षिका सुनीता दळवी वरिष्ठ शिक्षक सुभाष गोरे, प्रा. विजय भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्यालयातील मीनाक्षी पाटील व ज्योती बिरारे यांनी छत्रपती संभाजीनगर येथील मराठा हायस्कुल येथून मुख्याध्यापक डॉ. रुपेश मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली राखी बनवण्याचे प्रशिक्षण घेतले.त्यानंतर त्यांनी कन्या विद्यालयातील मुलींना राखी बनववण्याचे तंत्र हस्तातंर केले. त्यानुसार मुलींनी विविध रचना, रंग व आकर्षक राख्या तयार केल्या. या राख्या विद्यालयातील विद्यार्थी, पालक व नागरिकांना विक्री केल्या जात आहे.

यावेळी संतोषी जंगले,जयश्री सोनार,सुनंदा पवार, शारदा देशमुख,प्रा. रामनाथ टेकाळे, अजित खंबाट,प्रा. गणेश विसपुते, प्रा. संतोष रिंढे, नारायण पूजरोड,प्रा.के. एम. शेवाळे,आबा पवार, संजय गोरे,संग्राम देशमुख आकाश सिरसाठ,मंगल शेजवळ, नरेंद्र शेजवळ यांची उपस्थिती होती. संजय त्रिभुवन यांनी सूत्रसंचलन करुन आभार मानले.

### बीज राखीतून नावीन्य उपक्रम

बाजारात मिळणाऱ्या सामान्य राख्यांप्रमाणे या विद्यार्थ्यांनी बीज राख्या तयार केल्या.या राख्यांना विविध वनस्पतीचे बिया चिटकावल्या आहेत. राखीपौर्णिमा सन संपल्यानंतर राखी फेकून पर्यावरणा मध्ये प्रदूषण करण्या ऐवजी अशा राख्या जमिनीत पुरून दिल्यास त्यातून एक वनस्पती उगवून येईल अशी मध्यवर्ती कल्पना आहे. सदर बिया कृषिभूषण अजय जाधव यांच्या पारिजात देशी बीज बँक येथून विद्यालयाला मोफत मिळाल्या आहेत.

## पोलीस दलात भरती झालेल्या तरुणांचा सत्कार सभारंभ संपन्न



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १३ ऑगस्ट नुकतेच छत्रपती संभाजीनगर शहर पोलीस दलात बिडकीन परिसरातील स्वप्निल हुड पाडळी, प्रशांत गरड कृष्णापुर , गणेश जगदाळे पाडळी, व कल्पना जाधव गिरजापुर-गिधाडा ,हे शेतकरी कुटुंबातील चार होतकरू तरुण भरती झाले असुन त्यांचा आपल्या आनंदेश्वरी सेवा भावी संस्था व स्वराज्य नागरी सहकारी पतसंस्था कडुन सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.सत्कार सोहळ्यास बिडकीन पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील यांनी नव्या भरती झालेल्या तरुणांना पोलीस दलाविषयी सखोल मार्गदर्शन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या . यावेळी मोतीराम जाधव, पतसंस्था अध्यक्ष सर्जेराव जाधव, अध्यक्ष विजय शेजूळ, सचिन हाडे, लहु कातबने , ज्ञानेश्वर औटी , सुनिल बदर , अरविंद शेजुळ ,राम कुऱ्हाळ , तुषार हाडे , रोहित निनाळे, अशोक बोबडे , हृषिकेश काळभोर आदींसह संस्थेचे कर्मचारी उपस्थित होते.

## श्रावण सोमवार निमित्त धारेश्वर देवस्थान ट्रस्ट परिसरात वृक्षारोपण



तभा वृत्तसेवा

कन्नड:दि.१३ ऑगस्ट – तालुक्यातील नाचनवेल येथील निसर्ग मित्र देविदास थोरात यांनी दि.१२ रोजी श्रावण महिन्यातील दुसरा श्रावण सोमवार निमित्त धारेश्वर देवस्थान नाचनवेल ट्रस्ट मोहरा परिसरात स्वखर्चाने पर्यावरण पूरक झाडे तसेच सुशोभीकरण व फुलझाडे फळझाडे यांचे वृक्षारोपण करण्यात आले.

पिंपळ, उंबर, कडुलिंबू, वड , चिंच, जांभूळ, देवतुळस, लालगुंज, हाडजुडी, सिताफळ, ब्रह्मकमळ, आपटा, एरिका पाम इत्यादी प्रकारचे १५ झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले.गतवर्षी सुद्धा या परिसरात वृक्षारोपण करून त्यांचे संगोपन केले आहे यावर्षी देखील परिसरात निसर्गरम्य वातावरण निर्माण व्हावे या उद्देशाने वृक्षारोपण करण्यात आले याप्रसंगी वृक्षारोपण करण्यासाठी राजू थोरात यांनी सहकार्य केले. लावलेल्या सर्व झाडांचे संगोपन धारेश्वर मित्र मंडळ व निसर्ग मित्र करत आहेत. जगद्गुरु संत तुकोबाराय यांनी आपल्या अभंगातून सांगितलेले वृक्षाचे महत्व यांचा आदर्श समोर ठेवून मी गेल्या दहा वर्षापासून वृक्षारोपण करणे व संगोपन करण्याचे कार्य करीत आहे असे मत निसर्ग मित्र देविदास थोरात यांनी व्यक्त केले.

## कंत्राटी सफाई कामगारांचे नगरपालिके समोर उपोषण



तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.१३ ऑगस्ट – चार महिन्यांच्या वेतनासाठी कंत्राटी सफाई कामगारांचे उपोषण सुमारे चार महिन्यांपासून शहरातील कंत्राटी सफाई कामगारांना वेतन न मिळाल्याने त्यांनी आज सोमवार १२ ऑगस्ट रोजी नगरपालिका कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे.

या संदर्भात सफाई कामगारांचे प्रतिनिधीत्व करत असलेले मनोज बाविस्कर यांनी ५ ऑगस्ट रोजी नगर पालिकेला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, या कामगारांचे ४ महिन्यांचे वेतन अदा करण्यात आलेले नाही. त्यामुळे या कामगारांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. कुणाचे घरभाडे, कुणाचे किराणा बिल,विद्यार्थ्यांची शाळेची फी अशा एक ना अनेक अडचणींमुळे या कामगारांना घर चालविणे मुश्किल झाले असून ७ दिवसात वेतन अदा न केल्यास, उपोषणाचा इशाराही देण्यात आला होता. मात्र दुर्दैवाने त्यांना वेतन न मिळाल्याने त्यांनी उपोषण सुरू केले आहे. या वेळी त्यांनी विविध घोषणाही दिल्या.

या संदर्भात पालिकेचे स्वच्छता निरीक्षक प्रमोद तुपे यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले की, पालिकेने सफाईचे कंत्राट परभणी येथील हरिओम एजन्सीला दिलेला आहे. सदरील कामगारांची नेमणूक ही एजन्सीने केलेली आहे. त्यांचे वेतन देण्याची जबाबदारी ही त्या एजन्सीची आहे. आम्ही पत्रानुसार संबंधित एजन्सी व कामगारांच्या प्रतिनिधीला कळविले आहे.

## हाई सोशिएटल प्रेशर असूनही महाराष्ट्रातील ९४% तरुणांमध्ये आशावाद आणि आकांक्षा आहेत; आईकू क्वेस्ट रिपोर्ट २०२४

मुंबई – विवो ग्रुपच्या सब-स्मार्टफोन ब्रँड आईकू ने सायबर मीडिया रिसर्च च्या सहकार्याने आपला पहिला द आईकू क्वेस्ट रिपोर्ट २०२४ जारी केला आहे, जो जेन जी ची स्वप्ने, करिअर आणि आकांक्षा शोधतो आणि ट्रेंडवर आधारित आहे. हा अहवाल या आशावादी पिढीच्या स्वप्नांचा आणि उत्कटतेचा प्रवास उलगडतो, जी जगभरातील सर्वात मोठी आहे.

यामध्ये भारत, युनायटेड स्टेट्स, युनायटेड किंगडम, ब्राझील, मलेशिया, थायलंड आणि इंडोनेशिया या ७ देशांतील २०-२४ वर्षे वयोगटातील ६,७०० रेस्पोंडेंट्स चे इनसाइट्स समाविष्ट आहे.

अहवालात तीन क्षेत्रांचा समावेश आहे: जेन जी क्वेस्टर्सची त्यांच्या स्वप्नांचा पाठपुरावा करण्याची प्रेरणा, त्यांच्या आवडींचा पाठपुरावा करताना त्यांना येणारे अडथळे आणि त्यांच्या आवडी वाढवणारे करिअर पर्याय.महाराष्ट्रातील तरुणांना मोठ्या प्रमाणात हाई सोशिएटल प्रेशरचा सामना करावा लागत असल्याचे अहवालातील निष्कर्षांवरून दिसून आले आहे. परंतु हाई सोशिएटल प्रेशर असूनही, आशावाद आणि आकांक्षांची पातळी ९४% आहे.

जेन जी झेडसाठी यश म्हणजे काय याच्या विविध पैलूंचा अभ्यास केला आहे. क्वेस्ट इंडेक्स किंवा क्यूआई या परिमाणवाचक मेट्रिकमध्ये ते क्वेस्टर्सची ड्राइव्ह, आवड आणि महत्त्वाकांक्षा कॅप्चर करते. भारताचा क्यूआई९.१ आहे, त्यानंतर मलेशिया ८.७ क्यूआई, थायलंड आणि अमेरिका८.२ क्यूआई, इंडोनेशिया ८.१ क्यूआई, युनायटेड किंगडम ८ क्यूआई आणि ब्राझील ७.८ क्यूआई आहे.

## महाविकास आघाडीचे जेष्ठ नेते रंगनाथ काळे यांची वाडेकर परिवार यांच्या घरी सांत्वन भेट



तभा.वृत्तसेवा

सोयगाव ,दि.१२ ऑगस्ट

आमखेडा-आमराई येथील श्री गजानन भक्त परिवाराचे सदस्य रघुनाथ लक्ष्मण वाडेकर (वय.७५ ) याचे दि.१० शुक्रवार रोजी रात्री ९:३० हृदयविकारांनी निधन झाले होते. त्यानिमित्ताने महाविकास आघाडीचे ज्येष्ठ नेते रंगनाथ काळे यांनी शनिवार रोजी शोकाकुल वाडेकर यांच्या घरी सांत्वन भेट दिली. यावेळी रंगनाथ काळे यांनी शोकाकुल वाडेकर परिवाराचे सांत्वन करीत घडलेल्या दुर्दैवी घटनेबद्दल शोक व्यक्त केला.

यावेळी महाविकास आघाडीचे जेष्ठ नेते रंगनाथ काळे,राष्ट्रवादी काँग्रेसचे सोयगाव शहराध्यक्ष रवींद्र काळे(शरद पवार गट),सोयगाव शिवसेना तालुकाप्रमुख दिलीप मचे (ठाकरे गट) ज्येष्ठ नेते राजेंद्र अहिरे,काँग्रेसचे सोयगाव तालुकाध्यक्ष राजू काळे,काँग्रेसचे शहराध्यक्ष दिनेश हजारी,राष्ट्रवादी काँग्रेसचे सोयगाव तालुका अध्यक्ष डॉ.इंद्रजित सोळूंके(शरद पवार गट) कृष्णा जुनघारे पाटील,दिपक पाटील,रवींद्र काटोले, संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य शिरीष पवार,उपप्राचार्य रावसाहेब बारोटे,बापू मानकर,अरुण सोहणी,विजय गव्हाड,विष्णू लाड,आदीं गावकऱ्यांसह शोकाकुल वाडेकर परिवारातील सदस्यांची उपस्थिती होती.

## बजाजनगरात भगवा सप्ताह निमित्त झेंडे वाटप



वाळूज महानगर (प्रतिनिधी) भगवा सप्ताह निमित्ताने बजाजनगर शाखेच्या वतीने तालुकाप्रमुख बाळासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली उपतालुकाप्रमुख विशाल खंडागळे यांनी महाराणा प्रताप चौक येथे व्यापारी, व्यवसाय, नागरिकांना भगवे झेंडे वाटप कार्यक्रम आयोजित केला होता. प्रसंगी उपजिल्हाप्रमुख प्रमुख बप्पा दळवी, अरविंद धिवर, शहर प्रमुख सागर शिंदे, उपतालुकाप्रमुख सुदाम भंडे, लक्ष्मण लांडे, विभागप्रमुख गणेश सूर्यवंशी, गजानन सरकटे, आत्माराम सातपुते, रामेश्वर पवार, धोंडिबा वरवटे, कैलास वाघ, अनिल मानके, साई पणकडे, अमोल वाघमारे , विष्णू पटले, आदींची उपस्थिती उपस्थिती होती.

## डोंगरगाव येथे हर घर तिरंगा राष्ट्रभक्ती अभियान



नाचनवेल: दि.१२. ऑगस्ट-कन्नड तालुक्यातील डोंगरगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व ग्रामस्थ यांनी हर घर तिरंगा अभियान अंतर्गत १३ ते १५ ऑगस्ट आपल्या घरावर तिरंगा फडकवुन राष्ट्रभक्ती चा अभिमान दाखवून देण्याचे आवाहन म्हणून जि. प. प्रा. डोंगरगाव शाळेतील विदार्थ्यांच्या प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी विद्यार्थ्यांनी देशभक्तीच्या घोषणा देत ध्वज घेऊन हर घर तिरंगा राष्ट्रभक्तीची जनजागृती केली यावेळी शाळेच्या मुख्यध्यपिका योगिता गावेंदे, मंजुषा कुलकर्णी, सारिका सिंनगारे,मारोती बडे,ज्ञानेश्वर बोलकर, जितेश तांडीलकर, कृषी उद्योजक अनिल आग्रे ,आजींनाथ आग्रे काकासाहेब गायकवाड, मिठू मदार, राहुल आग्रे,बाळू गायकवाड, भास्कर आग्रे प्रतिष्ठित ग्रामस्थ सहभाग घेतला.

## समर्थ रामदास स्वामींचं जीवनचरीत्र रुपेरी पडद्यावर



छत्रपती संभाजीनगर- समर्थ रामदास स्वामींचं जीवनचरीत्र रुपेरी पडद्याच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येण्यासाठी सज्ज झालं आहे. 'रघुवीर' हा आगामी चित्रपट खऱ्या अर्थाने प्रभू श्रीराम भक्त आणि समर्थ रामदास स्वामींच्या अनुयायांसाठी एक पर्वणी ठरणार आहे. 'रघुवीर' या चित्रपटाद्वारे प्रथमच रामभक्त समर्थांचं जीवन जगासमोर येणार आहे. या चित्रपटाचा मनमोहक आणि उत्कंठावर्धक ट्रेलर प्रदर्शित करण्यात आला आहे. ट्रेलरमध्ये चित्रपटाची झलक पाहिल्यानंतर 'रघुवीर'बाबतची उत्कंठा शिगेला पोहोचते. २३ ऑगस्ट रोजी 'रघुवीर' सर्वत्र प्रदर्शित होणार आहे.

## आज्जीबाई पन्नाशीत, तीन महिन्यात सुवर्ण महोत्सवी प्रयोग

महाराष्ट्रातील नाट्य रसिकांमध्ये धुमाकूळ घालत असलेलं पहिलं एआय महा बालनाट्य 'आजीबाई जोरात' आपला सुवर्ण महोत्सव साजरा करत आहे. केवळ तीन महिन्यात ५० प्रयोग झालेल्या या नाटकाने प्रेक्षक, समीक्षक आणि मान्यवर अशा सगळ्यांचीच मनं जिंकली आहेत. येत्या १४ आणि १५ ऑगस्ट रोजी या नाटकाचे सुवर्ण महोत्सवी प्रयोग पुण्यामध्ये होणार आहेत. बाल प्रेक्षकांना मराठीची गोडी लावणारं, स्क्रीन मधून बाहेर काढणारं आणि पालकांनाही हवंहवसं वाटणारं हे नाटक आता वेगवेगळ्या शाळा उपक्रम म्हणून दाखवू लागल्या आहेत.

## प्राजक्ता सुसर (सपकाळ) सेट परीक्षा उत्तीर्ण



सोयगाव,दि.१२ ऑगस्ट : येथील संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या ग्रंथपाल निर्मला बोराडे यांच्या कन्या प्राजक्ता ह्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून एप्रिल २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या राज्य पात्रता चाचणी परीक्षेत ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयात सेट परीक्षा उत्तीर्ण झाल्या आहे. त्यांच्या यशाबद्दल अजिंठा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रंगनाथ काळे,सचिव प्रकाश काळे,संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार,उपप्राचार्य डॉ. रावसाहेब बारोटे,अधीक्षक पंकज साबळे,आई ग्रंथपाल निर्मला बोराडे, कनिष्ठ विभाग प्रमुख डॉ.उल्हास पाटील, कला व वाणिज्य पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ.सी.यु.भोरे, विज्ञान विभाग पदव्युत्तर प्रमुख डॉ.रामेश्वर मगर यांच्यासह ग्रंथालयीन कर्मचारी, प्राध्यापक,प्राध्यापकेत्तर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## श्रीकृष्ण जन्मभूमी मुक्ती न्यास संस्थेच्या राष्ट्रीय सचिवपदी सुदर्शन महाराज कपाटे यांची निवड



छत्रपती संभाजीनगर- महानुभाव पंथाचे मुनिश्री सुदर्शन नागराज बाबा कपाटे महानुभाव यांची मथुरेतील श्रीकृष्ण जन्मभूमी मुक्ती न्यास संस्थेच्या राष्ट्रीय सचिव पदी नियुक्ती झाली आहे. श्रीकृष्ण जन्मभूमी मुक्ती आंदोलनाच्या कायदेशीर लढाईमध्ये मुख्य भूमिकेत असलेल्या या संस्थेद्वारे श्रीकृष्ण जन्मभूमी मुक्त व्हावी यासाठी अथक असे प्रयत्न केले जात आहेत.

## गलवाडा ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी फिरोज पठाण बिनविरोध



सोयगाव,दि.१२ ऑगस्ट : गलवाडा-वेताळवाडी ग्रामपंचायत च्या सरपंच पदी शिंदे गट शिवसेनेचे फिरोज पठाण यांची सोमवारी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. सरपंच पदाच्या निवडी साठी सोमवारी गलवाडा ग्रामपंचायत च्या सभागृहात अध्यासी अधिकारी मारोती धोंडकर यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते.दरम्यान सरपंच पदासाठी फिरोज पठाण यांचा एकमेव उमेदवारी अर्ज मिळाल्याने त्यांची बिनविरोध सरपंच पदी निवड झाल्याची घोषणा अध्यासी अधिकारी मारोती धोंडकर यांनी दुपारी दोन वाजता केली. यावेळी विशेष सभेसाठी सभागृहात नऊ पैकी सहा सदस्य हजर तर तीन सदस्य गैरहजर होते.यावेळी सदस्य सुशीलाबाई इंगळे,आसमा पठाण,मंगलाबाई बिऱ्हारे, मधुकर इंगळे,फिरोज पठाण,दीपाली औरंगे आदी सहा सदस्य उपस्थित होते.

## स्वच्छ आणि हरित वाहनांच्या गतिशीलतेला चालना

छत्रपती संभाजीनगर : जागतिक स्तरावर शाश्वततेचे चॅम्पियन म्हणून, टोयोटा २०५० पर्यंत कार्बन न्यूट्रॅलिटीसाठी वचनबद्ध आहे आणि टोयोटा एन्व्हायर्नमेंटल चॅलेंज २०५० च्या मार्गदर्शनाखाली २०३५ पर्यंत मॅन्युफॅक्चरिंग ऑपरेशन्समध्ये नेट झिरो कार्बन साध्य करण्याचे टोयोटाचे उद्दिष्ट आहे.

### नावात बदल

जुने नाव
सृष्टी विजय रणवीर
नवीन नाव
सृष्टी विजयकुमार रणवीर

पत्ता : रा. रो-हाऊस नं. ए-४ गट नं.०८, वडगाव को., छत्रपती संभाजीनगर. पीन - ४३११३६ महाराष्ट्र राज्य
69AA274434

जा.क्र./नपंसो/नामांतर/२०२४/२०२५ कार्यालय नगर पंचायत सोयगांव
दिनांक : १२-०८-२०२४

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, **अभिषेक विष्णु गव्हाणे** यांनी मोहल्ला **नारळीबाग वार्ड क्र १४** सोयगांव स.नं. ----- मधील प्लॉट **९३४/१** त्यांचे नांवे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. अर्जानुसार जागेची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे.

**पूर्व : विष्णु विठ्ठलराव गव्हाणे पश्चिम : अनिल सुकलाल निकुंभ यांची जागा**
**दक्षिण : सखाराम किसन फुसे यांची जागा उत्तर : अंतर्गत वापराचा रस्ता.**

आकार : पूर्व पश्चिम **१०×३२= ३२०** दक्षिणोत्तर..........

वरील नामांतराबाबतच्या कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसांचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे. मुदती नंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मुख्याधिकारी
नगरपंचायत सोयगाव

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# राहुल लोणीकरांच्या कामाची दखल घेत पक्षाकडून पदोन्नती; भाजपा महाराष्ट्र प्रदेश सचिव पदी राहुल लोणीकर यांची निवड

## पक्षाने दिलेली प्रत्येक जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहील -राहुल लोणीकर

**तभा वृत्तसेवा**
**जालना/ सुरेश कवडे पाटील**

भारतीय जनता युवा मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष श्री राहुल लोणीकर यांनी आज प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा राजीनामा दिला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे सुपूर्द केलेल्या राजीनामांमध्ये सर्वप्रथम प्रदेशाध्यक्ष पदाची धुरा दिल्याबद्दल आभार व्यक्त करत आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विधानसभा कार्यक्षेत्रात अधिकाधिक लक्ष देणे गरजेचे असल्याचे राहुल लोणीकर यांनी म्हटले आहे प्रदेशाध्यक्ष पदाची जबाबदारी खूप मोठी असून संपूर्ण राज्यभरात लक्ष देणे अपेक्षित आहे अशा परिस्थितीत विधानसभा कार्यक्षेत्र वर लक्ष केंद्रित केल्यानंतर राज्य पातळीवर आवश्यक तेवढा वेळ देणे शक्य होणार नाही त्यामुळे राजीनामा स्वीकारण्यात यावा अशी विनंती देखील पत्रात श्री चंद्रशेखर बावनकुळे यांना करण्यात आली होती

यापूर्वी राहुल लोणीकर यांनी भारतीय जनता युवा मोर्चा जालना जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी सांभाळलेली होती तत्कालीन भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष आमदार योगेश टिळेकर यांच्या कार्यकारणी मध्ये प्रदेशात उपाध्यक्ष पदाची जबाबदारी देण्यात आली होती या काळात केलेल्या चमकदार कामगिरीच्या बळावर नव्याने जाहीर करण्यात आलेल्या युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष विक्रांत पाटील यांच्या कार्यकारणी मध्ये महामंत्री (सरचिटणीस) पदाची जबाबदारी श्री लोणीकर यांना देण्यात आले कोविडच्या काळात महामंत्री म्हणून पक्षाची मोठी ताकद उभी करणे सर्वसामान्य लोकांपर्यंत मदत पोहोचवणे रक्तदान शिबिर राबवणे या सर्व बाबी राहुल लोणीकर यांनी चोखपणे पार पाडल्या होत्या त्याचे फलित म्हणून पुढे थेट भारतीय जनता युवा मोर्चाच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी निवड करण्यात आली होती

भारतीय जनता युवा मोर्चाच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष पदाची द्वारा सांभाळल्यानंतर देखील अटल युवा पर्व ही अनोखी संकल्पना असलेला कार्यक्रम राबवण्यात आला यामध्ये युवकांना वक्तृत्व स्पर्धेच्या माध्यमातून संपूर्ण राज्यभरात व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले तालुकास्तर, जिल्हास्तर, विभागीय व त्यानंतर राज्यस्तरावर या स्पर्धा घेण्यात आल्या, कोविड काळात रक्तदान शिबिर आयोजित करून पक्षाने केलेल्या सूचनेप्रमाणे ९७०२ पेक्षा अधिक रक्त पेशव्यांचे संकलन राहुल लोणीकर यांच्या नेतृत्वात करण्यात आले होते, एवढ्या मोठ्या प्रमाणात करण्यात आलेले रक्त संकलन यापूर्वी कुठल्याही राजकीय पक्षाने केलेल्या संकलनापेक्षा उच्चांक गाठणारे आहे अशा शब्दात प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी गौरव केला होता, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा सप्ताह च्या निमित्ताने २८८ विधानसभा मतदारसंघात विविध लोककल्याणकारी उपक्रम राबवण्यात आले, मागील काळात विरोधी पक्षाच्या भूमिकेत असताना



जनसामान्यांचे प्रश्न सरकार समोर मांडण्यासाठी वेगवेगळ्या स्वरूपात अत्यंत आक्रमकपणे आंदोलने करण्यात देखील युवा मोर्चा अग्रेसर होता, तत्कालीन सत्ताधाऱ्यांना सळो की पळो करून सोडणारी आक्रमक आंदोलन राहुल लोणीकर यांच्या नेतृत्वात त्या काळात करण्यात आली होती.

नागपूर येथे राहुल लोणीकर यांच्या संयोजनातून ७० हजार पेक्षा अधिक युवकांचे नमो युवा महासंमेलन आयोजित करण्यात आले होते या संमेलनासाठी उपमुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस केंद्रीय मंत्री श्री नितीन गडकरी तत्कालीन केंद्रीय मंत्री स्मृती इराणी भारतीय जनता युवा मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार तेजस्वी सुर्या यांची प्रमुख उपस्थिती होती महाराष्ट्रात एवढ्या मोठ्या संख्येने युवकांचे संमेलन यापूर्वी कधीही झाले नसल्याचे गौरव उद्गार यावेळी देवेंद्र फडणवीस आणि नितीन गडकरी यांनी काढले होते तर महाराष्ट्र भारतीय जनता युवा मोर्चा ने राबवलेला हा उपक्रम संपूर्ण देशाने राबवावा यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे गौरवोद्गार राष्ट्रीय अध्यक्ष खासदार तेजस्वी सूर्य यांनी यावेळी व्यक्त केले होते. नाशिक येथे आयोजित महाराष्ट्र भारतीय जनता पार्टीच्या महत्त्वपूर्ण अधिवेशनादरम्यान युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष राहुल लोणीकर यांच्या संकल्पनेतून नाशिक महानगरामध्ये १५२ युवा वॉरिअरच्या शाखा अधिवेशनाला उपस्थित नेते मंडळींच्या शुभहस्ते उघडण्यात आल्या होत्या एकाच वेळी एकाच दिवशी एवढ्या शाखा उघडण्याचा विक्रम एक प्रकारे राहुल लोणीकर यांच्या नावे आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही अधिवेशनादरम्यान सर्वच नेते मंडळींनी राहुल लोणीकरांच्या या उपक्रमाचे खूप कौतुक केले होते राहुल लोणीकर यांच्या नेतृत्वात व मार्गदर्शनाखाली संपूर्ण महाराष्ट्रभर युवा वॉरिअरच्या ५००० पेक्षा अधिक शाखा स्थापन करण्यात आलेले आहेत

सर्वच राजकीय पक्ष पत्रकार दिनाच्या निमित्ताने पत्रकार बांधवांचा सत्कार समारंभ आयोजित करतात परंतु महाराष्ट्रात पहिल्यांदा संपूर्ण राज्यभरात पत्रकार दिनाच्या निमित्ताने पत्रकार बांधवांचा एकाच वेळी सत्कार करण्याचा अभिनव उपक्रम राहुल लोणीकर यांनी आयोजित केला होता महाराष्ट्र भाजपा प्रदेश कार्यालय मुंबई सह महाराष्ट्रातील प्रत्येक संघटनात्मक जिल्ह्यामध्ये एकाच वेळी पत्रकार बांधवांचा सत्कार देखील भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने करण्यात आला यावेळी पत्रकार बांधवांचा सत्कार केल्यानंतर असा अभिनव उपक्रम कधीही व कुणीही राबवलं नसल्याच्या अनेक प्रतिक्रिया पत्रकार बांधवांनी दिल्या होत्या

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून शहिदांना श्रद्धांजली म्हणून दिल्ली येथे अमृत वाटिका निर्माण करण्यासाठी देशभरातील विविध ऐतिहासिक धार्मिक सांस्कृतिक महत्त्व असणाऱ्या प्रत्येक ठिकाणाहून तसेच प्रत्येक गावातून मातीच्या कलशांचे संकलन करण्यात आले होते यामध्ये भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने राज्यभरातून ०१ लाख ५० हजार पेक्षा अधिक कलश संकलित केले होते मेरी माटी मेरा देश या नावाने दिल्ली येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते त्यादरम्यान या सर्व समर्पित करण्यात आले होते या उपक्रमाच्या माध्यमातून युवा मोर्चाने महाराष्ट्रात सर्वाधिक कलश यांचे संकलन करण्याचा विक्रम केला होता तसेच मेरी माटी मेरा देश या कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातून १५०० युवकांना दिल्ली येथे कार्यक्रमासाठी घेऊन गेले होते,लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने नमो चषक क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते या क्रीडा स्पर्धेत दरम्यान महाराष्ट्रभरातून ५० लाख पेक्षा अधिक तरुणांनी नोंदणी केली होती महाराष्ट्रातील तरुणांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न या निमित्ताने युवा मोर्चाच्या वतीने करण्यात आला होता. यामध्ये क्रिकेट कबड्डी खो-खो या सर्व मैदानी खेळांसह अनेक खेळांचा समावेश करण्यात आला होता तिरंगा यात्रेच्या निमित्ताने हर घर तिरंगा ही संकल्पना राबविण्यासाठी देखील भारतीय जनता युवा मोर्चा ने राहुल लोणीकर यांच्या नेतृत्वात मोठा पुढाकार घेतला होता या निमित्ताने तिरंगा रॅली प्रत्येक विधानसभा मतदारसंघांमधून काढण्यात आली होती महाराष्ट्रातील २८८ विधानसभा मतदारसंघांमध्ये युवा मोर्चा म्हणून हा उपक्रम मोठ्या उत्साहात राबवण्यात आला होता. दहावी बारावी उत्तीर्ण झाल्यानंतर काय करावे? असा प्रश्न कायम या विद्यार्थ्यांसमोर असतो अशा परिस्थितीमध्ये या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व्हावे यासाठी भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने परीक्षा सेलची स्थापना करून गएए, छएएढ यासारख्या परीक्षांसाठी मार्गदर्शन करण्यात यावे या संदर्भाने नियोजन करण्यात आले होते या सर्व मार्गदर्शन शिबिरामध्ये ४ लाख ५० हजार पेक्षा अधिक परीक्षार्थी विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग नोंदवून प्रत्यक्ष लाभ मिळवला होता. युवा मोर्चा मध्ये केलेल्या या सर्व कार्यक्रमांची दखल घेत भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश सचिव पदी राहुल लोणीकरांना जबाबदारी देण्यात आली असल्याची माहिती प्रसिद्धी पत्रकाद्वारे देण्यात आली आहे

भारतीय जनता युवा मोर्चाचा प्रदेशाध्यक्ष म्हणून व आता नव्याने भारतीय जनता पार्टीचा प्रदेश सचिव म्हणून मला जबाबदारी देण्यात आली आहे. आमचे लाडके नेते श्री देवेंद्र फडणवीस जी, प्रदेशाध्यक्ष श्री चंद्रशेखर बावनकुळे जी, प्रदेश महामंत्री श्री विक्रांत पाटील जी यांच्यासह पक्षातील अनेकांनी माझ्यावर या दोन्ही जबाबदारी देताना जो विश्वास दाखवला व पक्षामध्ये पदाची धुरा देत जनसामान्याची सेवा करण्याची संधी दिली त्याबद्दल त्या सर्वांचा, माझ्या पक्षाचा आणि माझ्या नेत्यांचा मी आजन्म ऋणी राहील. युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष म्हणून मी जे काम करू शकलो त्यामध्ये माझे सर्व महामंत्री, सर्व विभागीय समन्वयक, सर्व सहकारी पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांचा सिंहाचा वाटा आहे हे मी या ठिकाणी आवर्जून नमूद करू इच्छितो. माझे सहकारी मित्र श्री अनुप मोरे यांना युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष पदाची धुरा देण्यात आली आहे, त्यांना देखील त्यांच्या भावी आयुष्यासाठी खूप खूप शुभेच्छा देतो आणि प्रदेश सचिव म्हणून पक्षाने मला दिलेली ही नवीन जबाबदारी मी अत्यंत प्रामाणिकपणे व निष्ठेने पार पाडेन असा विश्वास देतो -- राहुल लोणीकर (नवनिर्वाचित प्रदेश सचिव भाजपा महाराष्ट्र)

## संक्षिप्त

### ओमप्रकाश देवडा बँकेच्या जालना शाखेस प्रथम पुरस्कार



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

ओम प्रकाश देवडा पीपल्स को-ऑपरेटिव्ह मल्टीस्टेट बँक लि.हिंगोली च्या जालना शाखेस सर्वोत्कृष्ट बँकिंग व्यवसायाबद्दल संपूर्ण ३३ शाखांमधून प्रथम पुरस्कार प्राप्त झाला आहे.

हिंगोली येथे रविवारी ( ता .११ ) बँकेची ४२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बँकेचे अध्यक्ष प्रकाशचंद्र सोनी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली .या सभेत जालना शाखेचे व्यवस्थापक संजय गावडे यांना स्मृतीचिन्ह ,प्रशस्तीपत्र, रोख पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरवण्यात आले .यावेळी बँकेचे उपाध्यक्ष सुनील देवडा, संचालक नरेंद्र मोदी, विठ्ठलदास मुंदडा,राजेंद्र निमोदिया ,एम.एम .बुद्रुक शाखा अध्यक्ष विजय कामड,मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर जालनापुरे , सरव्यवस्थापक शशिकांत कंदी, सहाय्यक सरव्यवस्थापक सुधीर मुळे यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी बोलताना नरेंद्र मोदी म्हणाले, बँकेने आतापर्यंत नियमितपणे सभासदांना १० टक्के लाभांश वाटप केला असून जालना शाखेचे व्यवस्थापक संजय गावडे यांच्या नेतृत्वाखाली कर्मचाऱ्यांनी नवीन खाते उघडून कर्ज वाटप वसुली यावर वेगवान पद्धतीने काम करत प्रथम क्रमांकाचा बहुमान पटकावला. अन्य शाखांतील व्यवस्थापक आणि कर्मचाऱ्यांनी सुद्धा याच पद्धतीने काम करून प्रथम क्रमांक मिळवावा असे आवाहन मोदी यांनी केले.दरम्यान
मानाचा प्रथम पुरस्कार मिळाल्या बद्दल आयकॉन स्टील चे संचालक कांतीलाल राठी, शाखा अध्यक्ष विजय कामड, नेमीचंद रूणवाल, अशोक रूणवाल, स्थानिक सल्लागार सुभाषचंद्र देवीदान, सिताराम अग्रवाल, पुरूषोत्तम अग्रवाल, विजयकुमार बगडिया, प्रमोद मुथा, अर्जुन गेही, प्रकाश मालपाणी, आदींनी व्यवस्थापक संजय गावडे आणि कर्मचारी वृंदांचे अभिनंदन केले आहे.

### विकास कामांसाठी सर्वांनी एकत्र या – आमदार संतोष पाटील दानवे



**तभा वृत्तसेवा**
**जाफ्राबाद/प्रतिनिधी**

निवडणुका सुरू राहणारच आहे या निवडणुकीच्या काळात काही सिझनेबल पुढारी तयार होतात मतदान घेऊन जातात त्यांना विकास नावाचा विषय सुद्धा कधी कळतही नसेल तरी सुद्धा जनतेशी खोटं बोलुन मतदारांची फसवणूक करतात निदान विकास कामांमध्ये राजकारण न करता विकास करण्यासाठी सर्वांनी एकत्र आले पाहिजे असे प्रतिपादन आमदार संतोष पाटील दानवे यांनी जाफ्राबाद येथे विकास कामाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत असताना केले.

माजी केंद्रीय मंत्री माननीय श्री.रावसाहेब पाटील दानवे साहेब व आमदार श्री.संतोष पाटील दानवे यांच्या विशेष प्रयत्नातून बऱ्याच दिवसापासून हिंदू समाजाची मागणी असलेल्या हिंदू स्मशानभूमी बांधकामासह सुशोभीकरण करण्यासाठी ५० लक्ष रुपये व स्व. नथ्थुजी पा. वाकडे चौकापासून ते दीपक पाटील वाकडे यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्ता बांधकामासाठी ५० लक्ष रुपये अशा १ कोटी रुपये निधी उपलब्ध करून आज त्याचे उद्घाटन आमदार संतोष पाटील दानवे यांच्या हस्ते पार पडले.

यावेळी विजय नाना परिहार, नाना पाटील भागिले, गोविंदराव मामा पंडित, सुरेशजी दिवटे सर, सुधीर पाटील, दीपक वाकडे, दगडूबा गोरे, रविराज जैस्वाल, अमोल पडघन, सचिन जैस्वाल, दुर्गेश दीक्षित, संदीप वाकडे, राहुल वाकडे, बबलू जोडीवाले, विष्णू वाकडे, धोंडू आप्पा दिवटे, राजू वाकडे, नारायण वैद्य, योगेश वाकडे, पुंडलिक घोडके, रामू शिंदे, पलाश खंडेलवाल, गणेश विभुते, विशाल वाकडे,मुकेश भारद्वाज इत्यादी सह स्थानिक भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते व शहरातील नागरिकांसह माता-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेच्या विधानसभा क्षेत्र स्तरीय समितीच्या अध्यक्षपदी आ.संतोष दानवे

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**



राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी आणि त्यांच्या आरोग्य आणि पोषणात सुधारणा करण्यासाठी तसेच कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी राज्यभर ''मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण'' योजना राबविण्यात येत आहे. सदर योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे व सुलभतेने होण्यासाठी विधानसभा क्षेत्रनिहाय समिती गठित करण्याची तरतुद ''मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण'' योजनेच्या शासन निर्णयात करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने समितीमध्ये तीन अशासकिय सदस्यांचा समावेश करुन त्यापैकी एका सदस्याची अध्यक्ष पदी नियुक्ती करणे बाबत निर्देशीत करण्यात आले होते. त्यानुसार जालना जिल्हयाचे पालकमंत्री मा.ना.श्री.अतुल सावे यांनी भोकरदन-जाफ्राबाद विधानसभा क्षेत्राची ''मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण'' योजनेच्या क्षेत्र स्तरीय समिच्या अध्यक्ष पदी आमदार संतोष पाटील दानवे यांची तर उर्वरीत दोन अशासकीय सदस्य पदी श्री. मुकेश रामचंद्र चिने, भोकरदन व श्री.संतोष रामराव लोखंडे, खासगांव ता.जाफ्राबाद यांची नियुक्ती करण्यात आली आहे. दरम्यान सदर समिती ही मतदारसंघातील माता-भगिनीमध्ये आर्थिकदृष्ट्या जनजागृती करणारी व कुटुंबातील त्यांची भूमिका अधोरेखीत करणारी असल्यामुळे आणि या योजनेच्या माध्यमातुन माता-भगिनीमध्ये आर्थिकदृष्ट्या स्वालंबनाची भावना निर्माण होणार आहे. त्यामुळे या समितीवर काम करीत असतांना कुठलाही पक्षपात न करता तळागाळातील सर्व महिलांना या योजनेचा थेट लाभ मिळवुन देण्यासाठी सर्व स्तरातील कार्यकर्त्यांनी सर्वोतोपरी प्रयत्न करावेत असे आवाहन ''मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण'' योजनेचे नवनियुक्त अध्यक्ष आमदार संतोष पाटील दानवे यांनी केले आहे.

''मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण'' योजनेच्या भोकरदन-जाफ्राबाद विधानसभा क्षेत्राच्या क्षेत्रस्तरीय समितीवर आमदार संतोष पाटील यांची अध्यक्ष पदी तर श्री. मुकेश रामचंद्र चिने व श्री.संतोष रामराव लोखंडे यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातुन अभिनंदन होत आहे.

# छत्रपती संभाजीनगर येथील काँग्रेस पक्षाच्या कार्यक्रमाला -अविनाश चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**तळणी /प्रतिनीधी**



छत्रपती संभाजी नगर येथे काँग्रेस पक्षाच्या वतीने होणाऱ्या बैठकीत बंजारा समाजाचे सामाजिक कार्यकर्ते अविनाश चव्हाण हे पक्षप्रवेश करणार आहेत. या सोहळ्याला महाराष्ट्राचे प्रभारी रमेश चेनीथल्ला, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विरोधी पक्षनेते पक्षनेते विजयजी वड्डेटीवार, विरोधी पक्ष नेते बाळासाहेब थोरात, महाराष्ट्र प्रदेश महासचिव सतीश बंटी पाटील,सरचिटणीस महाराष्ट्र राज्य तथा माजी राज्यमंत्री अमित भैया देशमुख जालना खा.कल्याण काळे,गोरसेना व समनक जनता पार्टी चे राष्ट्रीय अध्यक्ष प्राध्यापक संदेश चव्हाण, विधान परिषदेचे आमदार राजेश भैय्या राठोड, माजी आमदार सुरेश कुमार जेथलिया, जालना जिल्हाध्यक्ष राजेभाऊ देशमुख, कार्याध्यक्ष राजेंद्र राख, अनवर देशमुख, तालुका अध्यक्ष निळकंठ वायाळ, ज्ञानेश्वर माऊली वायाळ, प्रकाश अण्णा घुले, शरद भाऊ बोराडे, बालासाहेब आकात, किसनराव मोरे, अण्णासाहेब खंदारे यांच्या उपस्थितीत परतुर व मंठा मतदार संघाचे सामाजिक कार्यकर्ते अविनाश भाऊ चव्हाण यांचा जाहीर पक्षप्रवेश सोहळा संपन्न होणार आहे तरी या पक्ष प्रवेश सोहळ्याला मंठा-परतूर नेर शेवली, वाटूर ,आष्टी तळणी परिसरातील काँग्रेसच्या सर्व आजी-माजी पदाधिकारी कार्यकर्त्यांनी छत्रपती संभाजी नगर येथील भाग्यलक्ष्मी लॉन्स, चिकलठाणा येथे हजारोच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते अविनाशजी चव्हाण यांनी केले आहे.

# जास्तीत जास्त मतदार नोंदणी करा -आ.कैलास गोरंट्याल

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



आगामी विधानसभानिवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्ह्यात मतदार नोंदणीसाठी मतदान केंद्रांवर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात सहभागी होऊन नागरिकांनी जास्तीत जास्त मतदार नोंदणी करावी असे आवाहन जालन्याचे आमदार कैलास गोरंट्याल यांनी केले आहे.

अलीकडेच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत जालना शहरासह विधानसभा मतदार संघातील शेकडो मतदारांची नावे मतदार यादीतून परस्पर वगळण्यात आली असल्याचा प्रकार समोर आला होता. शिवाय एकाच कुटुंबातील मतदारांची नावे वेगवेगळ्या मतदान केंद्रांतील मतदार यादीत समाविष्ट करण्यात आल्याने मतदारांना मोठ्या प्रमाणात मानसिक त्रास होऊन त्याचा परिणाम मतदानाच्या टक्केवारीवर देखील झाला होता. जालना शहर व विधानसभा मतदार संघातील मतदारांची वगळलेली नावे पुन्हा मतदार यादीत समाविष्ट करण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने विशेष मोहीम राबवावी अशी मागणी आ. गोरंट्याल यांनी जालन्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्याकडे लोकसभा निवडणुकीच्या दरम्यान केली होती. जालना जिल्ह्यासह राज्यातील अनेक जिल्ह्यात मतदार यादीतून परस्पर मतदारांची नावे वगळण्यात आल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर भारत निवडणूक आयोगाने या तक्रारींची दखल घेऊन मतदार नोंदणीसाठी विशेष शिबिरांचे आयोजन करण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाला दिले आहेत. त्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाच्या वतीने दि. १० व ११ ऑगस्ट आणि १७ व १८ ऑगस्ट असे चार दिवस विशेष मतदार नोंदणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. उपरोक्त दिवशी आपल्या जवळच्या मतदार केंद्रावर जाऊन बी. एल. ओ. मार्फत मतदार नोंदणी, नावात दुरुस्ती, पत्ता बदल आदी बाबींची पूर्तता नागरिकांनी घ्यावी असे आवाहन आ. गोरंट्याल यांनी केले आहे.

# हक्कापासून दूर ठेवणाऱ्या लोकप्रतिनिधीला बदला -आमदार अमित गोरखे यांचे आवाहन



**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीचे नवनिर्वाचित विधान परिषदेचे सदस्य तथा अण्णाभाऊ साठे महामंडळाचे माजी अध्यक्ष अमित गोरखे यांनी घनसावंगीतील दलित, वंचित घटकांच्या सामाजिक परिस्थितीची पाहणी केली. या पाहणीत दलित वंचित समाज हा शासकीय योजनापासून वंचित असल्याचे त्यांना दिसून आल्याचे त्यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले. घनसावंगी विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करणारे आमदार राजेश टोपे यांनी पंचवीस वर्षात दलित मातंग समाजाचा फक्त मतासाठी वापर झाला, अशा शब्दात त्यांनी राजेश टोपेवर टीका केली. तसेच येणाऱ्या काळात दलित वंचित समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

लोकशाहीर आण्णाभाऊ साठे महामंडळाचे माजी अध्यक्ष मातंग समाजाचे उच्चशिक्षित युवा नेते यांची विधान परिषदेवर निवड झाली आहे. त्यांनी मराठवाड्यातील दलित, वंचित आणि मातंग समाजाचे प्रश्न जाणून घेण्यासाठी दौरा सुरू केलेला आहे. शनिवारी अमित गोरखे यांनी घनसावंगी मतदारसंघातील दलित वंचित घटकाच्या विविध गावांना भेटी देऊन त्यांचे प्रश्न जाणून घेतले. या भेटीत त्यांना दलित समाजातील अनेक घटकांना घरकुलाचा लाभ देखील मिळू शकलेला नाही. अनुसूचित जाती जमातीच्या जनतेसाठी महायुती सरकारने राबवलेल्या अनेक योजना या त्यांचापर्यंत पोहचू शकल्या नसल्याचे दिसले. एक लोकप्रतिनिधी म्हणून अनुसूचित दलित वंचित समाजाला शासकीय योजनापासून, घरकुलापासून वंचित ठेवनारा लोकप्रतिनिधी असेल तर त्याला बदलवण गरजेचे आहे. येणाऱ्या काळात सरकारच्या माध्यमातून घनसावंगी विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक दलित, वंचित घटकाला शासनाच्या योजना त्यांच्या दारापर्यंत नेण्यासाठी मी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी भाजपा नेते सतीश घाटगे, भाजपा अनुसूचित जाती-जमाती मोर्चाचे उपाध्यक्ष सर्जेराव जाधव यांची उपस्थिती होती.

# गायत्री मंदिर परिसरात प्रलंबित विकास कामे पूर्ण करणार -अर्जुनराव खोतकर

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

शहरातील सर्वात प्राचीन गायत्री मंदिर येथे भाविकांना येण्यासाठी मुख्य मार्गावरून ते मंदिरापर्यंत रस्त्यासह मंदिर परिसरात उर्वरित विकासकामे आगामी काळात करणार असल्याची ग्वाही शिवसेना उपनेते, माजी मंत्री अर्जुनराव खोतकर यांनी दिली.



गायत्री मंदिर प्रवेशद्वार ते चौकापर्यंत सिमेंट रस्ता कामाचे लोकार्पण माजी मंत्री अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते थाटात करण्यात आले. यावेळी भक्तमाल कथा प्रवक्ता किशोर जी तिवारी, पं. सत्यनारायणजी व्यास, शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले मेघराज चौधरी ,ड. राहुल हिवराळे, रामेश्वर जोशी ,रामप्रसाद मुंदडा, मनोज दायमा, हिरालाल सोनी, अमन मित्तल ,राघवेंद्र त्रिपाठी, धनराज चौधरी, डॉ. सुदर्शन काळे,यांची प्रमुख उपस्थिती होती. माजी मंत्री अर्जुनराव खोतकर म्हणाले, गायत्री मंदिर परिसरात आपण कुटुंबासह दर्शनासाठी येत असतो, येथे वेगळीच आत्मिक शांती मिळते. विश्वस्तांच्या मागणीवरून आपण ३५ लक्ष रुपयांची विकास कामे केली असून आगामी काळात परिसरात सभामंडप उभारणीसह गायत्री नगर भागात रस्त्यांची कामे करण्यास प्रयत्न करणार असल्याचे खोतकर यांनी सांगितले. भक्तमाल कथा प्रवक्ता किशोरजी तिवारी यांनी राजसत्तेला नीती असली पाहिजे असे महत्त्व आर्य चाणक्य यांनी सांगितले असून त्याच तत्त्वावर श्री. खोतकर यांची वाटचाल सुरू आहे. असे नमूद करत मंदिर परिसरातील उर्वरित विकास कामे करण्यासाठी खोतकर यांना बळ मिळावे अशी प्रार्थना तिवारी यांनी केली. विष्णू पाचफुले यावेळी म्हणाले, जालना शहरासाठी माजी मंत्री अर्जुनराव खोतकर यांनी पदावर नसतांना सुद्धा शंभर कोटी रुपयांचा निधी खेचून आणला असून शहरातील प्रत्येक गल्ली-बोळात कामे सुरू आहेत. असे सांगून आगामी निवडणुकीत त्यांच्या पाठीशी उभे राहून त्यांना पुन्हा मंत्री करावे असे आवाहन पाचफुले यांनी केले. सूत्रसंचालन आशीष रसाळ यांनी तर रामेश्वर जोशी यांनी आभार मानले. यावेळी विनोद पांडे, वाघमारे, रूदेश चौधरी यांच्यासह परिसरातील महिला नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## अग्रलेख...

# भारताची प्रभावी संरक्षण सिद्धता

जमिनीवरून हवेत मारा करणारी लांब पल्ल्याची अत्याधुनिक अशी १२० इंटरसेप्टर क्षेपणास्त्रे रशियाकडून भारताला मिळण्याचा मार्ग मोकळा झाल्यामुळे भारताची हवाई संरक्षण यंत्रणा प्रचंड मजबूत होणार आहे. विशेष म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नुकत्याच झालेल्या मॉस्को दौऱ्यानंतर रशियाने हा निर्णय घेतला आहे. भारताचा स्वातंत्र्य दिन अवघ्या तीन दिवसांवर येऊन ठेपला असताना भारताच्या हवाई संरक्षण प्रणालीला प्रचंड सक्षम करणारा हा निर्णय भारतीयांसाठी आनंददायक आणि दिलासादायक आहे. एकीकडे साम्राज्यवादी, विस्तारवादी, विश्वासघातकी व राक्षसी महत्त्वाकांक्षेचा ड्रॅगन आणि दुसरीकडे नेहमीच जिहादी दहशतवादाला आणि फुटीरतावादाला प्रोत्साहन व पाठिंबा देणारा पाकिस्तान असे दोन 'सख्खे शेजारी' भारताच्या आजूबाजूला असताना भारताला अशाच प्रकारच्या प्रभावी संरक्षण साहित्याची नितांत आवश्यकता होती. कुठल्याही देशाचे अस्तित्व आणि सार्वभौमत्व टिकून ठेवायचे असेल तर त्या देशाची संरक्षण व्यवस्था अतिशय मजबूत व उत्तम असणे आवश्यक असते. त्या देशातील नागरिक किती नीतिमान, चांगले, सत्याच्या वाटेवर चालणारे असले तरी जोपर्यंत याला शक्ती व सामर्थ्याची जोड मिळत नाही, तोपर्यंत या सगळ्यांना काहीच उपयोग नाही. भारताच्या इतिहासात डोकावून पाहिले असल्यास लक्षात येईल की, ज्या राजवटींनी किंवा राजांनी मजबूत, आक्रमक, बलाढ्य अशी सेना उभारली, त्या राज्यांकडे वाकड्या नजरेने पाहण्याची कुणाचीही हिंमत झाली नाही. प्राचीन काळी सम्राट चंद्रगुप्त, समुद्रगुप्त, मध्ययुगीन कालखंडात छत्रपती शिवाजी महाराज यांची नावे या संदर्भात आवर्जून घेण्यासारखी आहेत. या सर्वांनी आपल्या राज्याच्या संरक्षणाकडे प्राधान्याने लक्ष दिले आणि यासाठी अतिशय उत्कृष्ट असे सेनादल उभारले. या पृष्ठभूमीवर भारताची संरक्षण सिद्धता वाढविण्याच्या या निर्णयाकडे पाहिले पाहिजे. 'भारताला ऐन संकटाच्या समयी मदत करणारा आणि विश्वासाने भारताच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणारा खरा मित्र,' अशी रशियाची प्रतिमा आहे आणि तशीच प्रतिमा भारताचीही आहे. दोन्ही देशांनी ही प्रतिमा प्राणपणाने जपली आहे. यामुळेच भारताची आवश्यकता लक्षात घेऊन रशियाने लांब पल्ल्याची इंटरसेप्टर क्षेपणास्त्रे देण्याचा निर्णय घेतला आहे. आता भारताकडे असलेल्या एस-४०० ट्रायम्फ या रशियन हवाई संरक्षण प्रणालीत ही क्षेपणास्त्रे बसविली जातील. या क्षेपणास्त्रांचे नाव आता बदलून 'सुदर्शन चक्र' असे करण्यात आले आहे. आणखी १२० इंटरसेप्टर क्षेपणास्त्र मिळाल्यानंतर भारत पाकिस्तान आणि चीनने निर्माण केलेल्या आव्हानांना अधिक प्रखरपणे सामना करण्यास सज्ज राहणार आहेत. विशेष म्हणजे रशियाने भारताच्या शत्रू देशांना ही इंटरसेप्टर क्षेपणास्त्रे किंवा त्याच्याशी संबंधित तंत्रज्ञान देऊ नये, असा आग्रह भारताने रशियाला केला. भारताची ही गोष्ट रशियाने मान्य केली असल्याची माहिती आहे. 'अडचणीत किंवा समस्यांमध्ये वाद होईल, अशी कुठलीही कृती आम्हाला करायची नाही,' अशी निःसंदिग्ध ग्वाही रशियाने भारताला दिली आहे. केवळ हवाई दलच नव्हे तर लष्कर व नौदलासह एकूणच भारताची संरक्षण सिद्धता वाढविण्याचे प्रयत्न केंद्रातील मोदी सरकार सातत्याने करीत आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे बॅलेस्टिक क्षेपणास्त्र संरक्षण प्रणालीच्या निर्मितीत भारताने घेतलेली आघाडी सुखद आणि स्वागतार्ह आहे. संरक्षण संशोधन आणि विकास संस्था अर्थात डीआरडीओने पाच हजार किलोमीटर पल्ल्यापर्यंतचे लक्ष्य भेदणारे क्षेपणास्त्र आकाशातच नष्ट करण्याची क्षमता विकसित केल्याची बातमी सुखद आहे. चीन आणि पाकिस्तान यांच्याकडून होणाऱ्या क्षेपणास्त्र चाचण्या पाहता भारतानेही या क्षेपणास्त्रांना जबरदस्त प्रत्युत्तर देण्याची तयारी चालविली होती. ओडिशातील बालासोर परिसरात शत्रूने सोडलेले क्षेपणास्त्र आकाशातच नष्ट करण्याची चाचणी नुकतीच करण्यात आली व ती पूर्णपणे यशस्वी झाली. एकप्रकारे भारतीय बॅलेस्टिक क्षेपणास्त्र संरक्षण प्रणालीच्या दुसऱ्या टप्प्याला यश आले आहे. याचाच अर्थ भारत लवकरच महत्त्वाच्या शहरांमध्ये तसेच संवेदनशील ठिकाणांच्या परिसरात अशा प्रकारची क्षेपणास्त्रभेदी सुरक्षा व्यवस्था विकसित करेल. या आधारावर शत्रूकडून येणारे कोणतेही धोकादायक क्षेपणास्त्र आकाशातच नष्ट करता येईल. आपल्या देशाची प्रचंड लोकसंख्या पाहता देशाचे संरक्षण करण्यासाठी भारताकडे अशा प्रकारची अत्याधुनिक संरक्षण व्यवस्था असणे अत्यंत गरजेचे आहे. इस्रायल आणि हमास यांच्यातील युद्ध सारे जग पाहात आहे. इस्रायलने विकसित केलेल्या अत्याधुनिक रडार प्रणालीमुळे व क्षेपणास्त्ररोधक यंत्रणेमुळे हमास, इराण व लेबनॉनची क्षेपणास्त्रे निष्प्रभ ठरत आहेत. आज इस्रायलवर एकटेच लढण्याची वेळ आली आहे. उद्या भारतावरही अशीच वेळ येऊ शकते. यामुळेच भारताने विकसित केलेली संरक्षण क्षमता महत्त्वाची ठरते. वास्तविक भारताने कमी अंतराचे, मध्यम पल्ल्याचे आणि लांब पल्ल्याचे क्षेपणास्त्र डागण्याचे तंत्र अवगत केलेले आहे. त्याचवेळी समोरून येणाऱ्या क्षेपणास्त्राचा शोध घेत त्याला निष्प्रभ करण्याची क्षमता तयार करणेदेखील तितकेच महत्त्वाचे होते आणि त्यानुसार २००६ पासून भारतीय शास्त्रज्ञ तयारी करीत होते. भारताने बॅलेस्टिक क्षेपणास्त्र संरक्षण कार्यक्रमातील पहिला टप्पा पूर्ण केला असून त्याचवेळी दुसऱ्या टप्प्यात नव्या श्रेणीतील इंटरसेप्ट सिस्टिम प्रबळ करण्याचे काम सुरू होते. कमी पल्ल्याच्या क्षेपणास्त्रांना पाडण्याची क्षमता भारताने अगोदरच विकसित केली आहे; परंतु पाच हजार किलोमीटर अंतरावरून येणाऱ्या क्षेपणास्त्रांना नष्ट करण्याची क्षमता विकसित केल्याने भारताचे संरक्षण व मारक सामर्थ्य नवीन उंचीवर पोहोचले आहे. भारताची भूमिका पहिला हल्ला करण्याची कधीच राहिलेली नाही आणि त्यामुळेच अशा क्षेपणास्त्रांचा मुकाबला करण्यात भारताने सिद्ध होणे अतिशय आवश्यक होते. कदाचित भविष्यात पाकिस्तान, चीनविरुद्ध युद्ध होईल, असे गृहीत धरले तरी भारताचा सामना हा क्षेपणास्त्र हल्ल्यांशीच होणार आहे. अशावेळी देशाला सुरक्षा कवच प्रदान करणे ही काळाची गरज आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, संरक्षण क्षेत्रातील आपली आयात कमी होऊन अधिकाधिक निर्यात कशी वाढेल यासाठी 'मेक इन इंडिया'ला अधिकाधिक प्रोत्साहन दिले पाहिजे. कावेबाज व कपटी शेजारी देशांनी आक्रमण करण्याचे व भारताची कुरापत काढण्याचे दु:साहस केले, तर त्यास चोख प्रत्युत्तर देणे गरजेचे असल्याने आपण त्यासाठी पूर्णत: सुसज्ज असले पाहिजे. या सर्व बाबींचा सखोल विचार भारताच्या राष्ट्रीय नेतृत्वाने म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केला असून त्यातूनच आपण संरक्षण सिद्धतेला सर्वाधिक महत्त्व दिले असल्याचे स्पष्ट होत आहे. भारताचे संरक्षण बजेट आधी मंद गतीने पुढे सरकत होते. पण यंदाच्या अर्थसंकल्पाने इतिहास घडवला. यंदा भारताने जगातील तिसरे सर्वात मोठे संरक्षण बजेट सादर केले आहे. संरक्षण खात्यासाठी २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात ६.२१ लाख कोटी रुपयांची तरतूद केली आहे. गेल्यावर्षीच्या अर्थसंकल्पात ५.९४ लाख कोटींची तरतूद केली होती. म्हणजेच भारताने आपल्या संरक्षण खर्चात यावर्षी २७ हजार कोटींची वाढ केली आहे. काही दिवसांपूर्वीच कपटी व विस्तारवादी ड्रॅगनने अरुणाचल प्रदेशावर पुन्हा एकदा आपला दावा केला आहे. या सगळ्या पृष्ठभूमीवर एकूणच भारताच्या संरक्षण सिद्धतेचा नव्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. भारताचे लष्कर, हवाई दल आणि नौदलाचे बळ अधिकाधिक वाढले पाहिजे यासाठी केंद्रातील मोदी सरकार सातत्याने प्रयत्न करीत आहे. रशिया-युक्रेन युद्धामुळे सध्या जगावर तिसऱ्या महायुद्धाचे ढग पसरले आहेत. हे युद्ध थांबण्याची सध्या कोणतीही लक्षणे दिसत नाहीत आणि दुसरीकडे ड्रॅगनच्या भारतविरोधी कुरापती सुरूच आहेत. अशा एकूणच स्फोटक आणि कमालीच्या नाजूक परिस्थितीत भारताने सावधगिरी बाळगली. त्यामुळेच संरक्षण सिद्धता ही काळाची गरज ठरली आहे.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# बांगलादेशातील वणवा...!

५३ वर्षांपूर्वी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी दूरदर्शीपणा दाखवत पाकिस्तानचे दोन तुकडे केले होते. त्या साऱ्यावर बांगलादेशातील ताज्या घटनाक्रमाने पाणी फेरले आहे. पाकिस्तानचे दोन तुकडे करून एक नवा देश- बांगलादेश स्थापन केल्यास भारताला एक विश्वासू शेजारी मिळेल आणि दुसऱ्या शेजाऱ्याचे पाकिस्तानचे कंबरडे मोडले जाईल, या साऱ्या विचारातून बांगलादेशाच्या जन्मात भारताने मोठी भूमिका बजावली. आता हा बांगलादेश पाकिस्तानसोबत चीनचा मांडलिक होण्याची तयारी करीत आहे, असे सध्या तरी दिसते. एक योगायोग म्हणजे बांगलादेशातील आंदोलकांनी सर्वप्रथम लक्ष्य केले ते ढाक्यातील इंदिरा गांधी सांस्कृतिक केंद्रास! याशिवाय हिंदूंच्या काही मंदिरांनाही लक्ष्य करण्यात आले.

**अशुभ ऑगस्ट :** ऑगस्टचा महिना बांगलादेशातील शेख मुजीबूर रहेमान परिवारासाठी अशुभ राहिला आहे. बांगलादेशचे जनक शेख मुजीब व त्यांच्या कुटुंबातील अनेकांची १९७५ च्या ऑगस्ट महिन्यातच हत्या करण्यात आली. त्या नरसंहारातून वाचलेल्या मुजीब कन्या शेख हसीना यांना आता ऑगस्ट महिन्यातच देशाबाहेर पलायन करावे लागले. बांगलादेशातील स्थिती आता कोणते वळण घेणार हे येणाऱ्या काही दिवसांत स्पष्ट होईल. लष्करप्रमुख जनरल झमान हे भारत समर्थक समजले जातात. पण, जमाते इस्लामी, बांगलादेश नॅशनल पार्टी हे पक्ष भारताचे विरोधक आहेत आणि यात चीन बजावीत असलेली भूमिका या घटकांनी या देशातील स्थिती कमालीची अस्थिर करून टाकली आहे.

**एकमेव साथीदार :** भारताच्या शेजारी देशांपैकी बांगलादेश हा भारताचा एकमेव साथीदार राहिला होता. पाकिस्तान, नेपाळ, भूतान, श्रीलंका, मालदीव या साऱ्यांनी चीनचे मांडलिकत्व पत्करले आहे. बांगलादेशावरही चीनची पकड हळूहळू मजबूत होत होती, पण हा देश पूर्णपणे चीनच्या आहारी गेला नव्हता. बांगलादेशने भारताशी असलेले आपले संबंध कायम ठेवले होते.

**शेख हसीना राजवट :** शेख हसीना मागील १५ वर्षांपासून सत्तेवर होत्या आणि त्यांनी आपल्या कार्यकाळात भारताशी संबंध मजबूत करणारे अनेक निर्णय घेतले होते. दळणवळण, पायाभूत प्रकल्प, संरक्षण या क्षेत्रात दोन्ही देशांत प्रगाढ संबंध स्थापन होत होते. येणाऱ्या काळात दोन्ही देशांचे संबंध बळकट करणाऱ्या करारावर सह्या केल्या जाणार होत्या, बांगलादेशचे लष्करप्रमुख आपल्या पहिल्या विदेश दौऱ्यावर लवकरच भारतात येणार होते. आता या साऱ्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**चीन दौरा :** शेख हसीना महिनाभरापूर्वी चीनच्या दौऱ्यावर गेल्या असता, तो दौरा अर्धवट सोडून त्या मायदेशी परतल्या होत्या. त्याची दोन कारणे सांगितली जात होती. येथे त्यांना मिळालेली अपमानास्पद वागणूक आणि आर्थिक मदत देण्याबाबत चीनने केलेली फसवणूक. चीनने बांगलादेशला ५०० कोटी डॉलर्सची मदत देण्याचे आश्वासन दिले होते. प्रत्यक्षात फक्त १० कोटी डॉलरची घोषणा करण्यात आली. चिनी राष्ट्रपती जिनपिंग यांच्यासोबत त्यांची झालेली चर्चा फार कमी वेळाची होती आणि चीनच्या परराष्ट्रमंत्र्यांनी तर शेख हसीना यांना भेटण्याचे सौजन्यही दाखविले नव्हते. त्यानंतर महिनाभरातच शेख हसीना यांना पद सोडावे लागले. या साऱ्याचा अर्थ आता लावला जात आहे.

**शस्त्र आयात :** बांगलादेशने चीनकडून मोठ्या प्रमाणावर शस्त्र आयात केली आहेत. बांगलादेशजवळ असलेल्या शस्त्रास्त्रांपैकी ७० ते ८० टक्के शस्त्र चीनकडून आयात झाली आहे. यात लढाऊ विमाने, नौदलासाठी लागणारी उपकरणे, बंदुका, दारूगोळा यांचा समावेश आहे. चीनने आपल्या दोन पाणबुड्याही बांगलादेशला दिल्या आहेत. याशिवाय चीनने बांगलादेशात मोठमोठे पायाभूत प्रकल्प उभारले आहेत. काही प्रकल्प उभारले जात आहेत. बांगलादेशात एवढी मोठी गुंतवणूक करणारा चीन या देशावरील आपली पकड ढिली होऊ देईल, असे समजण्याचे कारणच नाही.

**भारतविरोधाची किनार :** बांगलादेशात उसळलेल्या हिंसाचाराचा रोख शेख मुजीब-शेख हसीना यांच्याविरोधात असला, तरी त्याला भारतविरोधी किनारही आहे. अनेक ठिकाणी हिंदूंवर हल्ले करण्यात आले. यात दोन शक्ती असू शकतात. पाकिस्तान आणि चीन! आज पाकिस्तानला आपल्याच प्रश्नांनी ग्रासले आहे. या साऱ्या घटनाक्रमामागे पाकिस्तानपेक्षा चीनचा हात असण्याची जास्त शक्यता आहे. बांगलादेशच्या घटनाक्रमातील एक विशेष बाब म्हणजे देशाची आर्थिक स्थिती चांगली होत असताना हा सारा घटनाक्रम घडला. बांगलादेशची आर्थिक स्थिती केवळ पाकिस्तानपेक्षा चांगली आहे असे नाही तर दक्षिण आशियातील देशांमध्ये बांगलादेशचा उल्लेख एक झपाट्याने वाढणारी अर्थव्यवस्था असा केला जात होता. मागील दशकात बांगलादेशचा जीडीपी ६.६ टक्के या गतीने वाढला. गरिबीचा दर कमी झाला. २००८ मध्ये तो १२ टक्के होता तर २०२२ मध्ये तो ५ टक्के झाला. २००९ मध्ये बांगलादेशचा जीडीपी १०० बिलियन डॉलर्स एवढा होता तर २०२२ मध्ये तो ४६० बिलियन डॉलर एवढा झाला. भारताशी व्यापार सात पट वाढला. २००७ मध्ये तो २ बिलियन डॉलर्स होता तर २०२२ मध्ये तो १४ बिलियन डॉलर्स एवढा झाला. या साऱ्या पृष्ठभूमीवर या देशात घडलेला घटनाक्रम काहीसा रहस्यमय वाटावा असा ठरत आहे.

**शेख हसीना भारतात :** अपदस्थ पंतप्रधान शेख हसीना प्रथम भारतात आल्या. आता त्या किती काळ भारतात राहणार हे स्पष्ट झालेले नाही. त्या भारतात राहिल्यास बांगलादेश सरकार भारताशी फटकून वागेल, हे स्पष्ट आहे. शेख हसीना यांना ब्रिटनने आश्रय देण्यास नकार दिला आहे. शेख हसीना यांच्या पश्चात त्यांच्या अवामी लीग पक्षाचे काय, हा प्रश्न राहणार आहे. अवामी लीग हा भारतासाठी मित्रपक्ष राहिला आहे. मात्र, अवामी लीगचा गाशा गुंडाळला गेल्यास या देशात भारताचे नाव घेणारा कुणी राहणार नाही, असे दिसते. अर्थात हा सारा घटनाक्रम अस्थिर असल्याने त्यावर नेमके भाष्य करता येणार नाही.

**चीनचा डोळा :** चीनने भारताच्या शेजारी देशांना आपल्या बाजूने वळविल्यानंतर बांगलादेशच भारताला अनुकूल होता. चीनने त्यालाही आपल्या बाजूने केल्यास ही बाब भारतासाठी चिंता निर्माण करणारी ठरेल. भारत-बांगलादेश सीमा ४०९६ किलोमीटर एवढी म्हणजे पाकिस्तान-चीन सीमेपेक्षाही मोठी आहे. आजवर भारतासाठी हीच काय ती शांत सीमा मानली जात होती. जम्मू-काश्मीरला लागून असलेल्या पाकिस्तान सीमेवर सतत पाकिस्तानच्या कारवाया सुरू आहेत. लडाखला लागून असलेल्या चीन सीमेवर दोन्ही देशांचे ४५ हजार सैन्य युद्धसज्ज स्थितीत समोरासमोर उभे आहे. यात बांगलादेश सीमेची भर पडल्यास भारताच्या सुरक्षा व्यवस्थेवर व त्याच्या आर्थिक परिणामावर किती ताण पडेल, याची कल्पना केलेली बरी.

**'रॉ'वर प्रश्नचिन्ह :** बांगलादेशातील घटनाक्रमाने 'रॉ'च्या कामकाजावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह लागले आहे. शेजारी देशात हे सारे होत असताना 'रॉ'ला याचा मागमुस का लागला नाही, असा एक प्रश्न विचारला जात आहे. 'रॉ'ने भारत सरकारला वेळीच सावध केले असते तर परिस्थिती सावरण्यासाठी सरकारला काही करता आले असते. आंदोलन थंड करून लष्कराला विश्वासात घेण्याचा प्रयत्न करता आला असता. कोणत्याही स्थितीत शेख हसीना सरकार कायम ठेवणे व नंतर राजकीय तोडगा काढणे असा एक प्रयत्न करता आला असता. काही काळासाठी शेख हसीना यांना सत्तेबाहेर ठेवण्याचाही विचार करता आला असता. पण, सारा घटनाक्रम एवढ्या वेगात पुढे सरकला की भारत सरकारला काही करण्याची संधीच मिळाली नाही.

**चित्र बदलले :** ५३ वर्षांपूर्वी चीन जागतिक महासत्ता नव्हता. पाकिस्तान अमेरिकेचा मांडलिक होता. चीन एकाकी होता. आज सारेच चित्र बदलले आहे. चीन महासत्ता झाला आहे. पाकिस्तान त्याचा मांडलिक झाला आहे. नेपाळ, भूतान, अफगाणिस्तान, म्यानमार यावर चीनची पकड निर्माण झाली आहे. बांगलादेशही त्याचा मांडलिक होण्याच्या वाटेवर आहे. भारतासाठी यापेक्षा वाईट व चिंतेची घटना असू शकत नाही.

## वेध

**अनिल फेकरीकर**

# एकमेकांना भरपूर लुटा अन् मातीत मिसळा!

पशूंना द्रव्याची इच्छा नसते हे खरे, पण हीच हाव माणसाला मात्र पशू बनवते. हो. आपण सर्व सुजाण लोकांनी देशात सुक्ष्म निरीक्षण केले तर तुम्हाला अशीच परिस्थिती अनुभवास येईल. प्रत्येक जण एकमेकांना कसे लुटता येईल, यावरच भर देत असतो. 'न कंचित् शाश्वतम्' अर्थात कुठलीही गोष्ट शाश्वत नाही. पैसाही आज आहे, पण उद्या राहणार नाही. शेवट माणसाचा मातीतच जाण्याचा आहे. हे सत्य अवगत असतानाही लुटमारीची परिस्थिती का उद्भवली? कुणी या व्यवस्थेला आणले, याची चर्चा आणि त्यावर उपाय शोधण्याची गरज आता निर्माण झाली आहे. बाजारात गेल्यावर प्रत्येक ग्राहकाला माफक दरात वस्तू मिळावी, असेच अभिप्रेत असते. नव्हे, तो त्याचा अधिकारच असतो. पण त्याला तिथे चक्क फसवले जाते. फसविणारे काही पाकिस्तानातील लोक नसतात तर ते आपलेच भारतीय बांधव असतात. आपल्याच देशबांधवांना अधिकाधिक फसवायचे आणि वाममार्गाने श्रीमंत होऊन मग समाजात मिरवायचे, ही प्रथा आज वायुवेगाने वाढली आहे. तसे पाहता लोकमान्य टिळक नेहमी म्हणायचे, आपल्या राष्ट्राचा विचार करा. नुसत्या आहारविहारासाठी मानवजन्म नाही. पण आपण तर केवळ स्वत:चाच विचार अधिक करीत आहोत. पोलिसांकडे जा, तिथे सामान्यांना लुटले जाते. न्यायासाठी गेला तर वकील मंडळी पक्षकारांना लुटतात आणि पक्षकारांना तारीख पे तारीख मिळवून देतात. राजकीय नेत्यांकडे गेल्यास तेही हवे तेवढे लुटतात. रुग्णालयात जा, तिथेही रुग्णांना लुटले जाते. गरज नसलेल्या तपासण्या करायला भाग पाडले जाते. व्यापाऱ्यांकडे गेल्यास तेही नफ्यावर नफा मिळवून लुटतात. औषध घेण्यासाठी गेल्यावर तिथेही सामान्यांना लुटले जाते. शाळेत गेल्यावर तिथेही पालकांना रडकुंडीला आणले जाते. एवढेच काय तर स्मशानभूमीवर गेल्यावरही तिथे मरणाऱ्याच्या नातेवाईकांना लुटले जाते. बँकेत कर्ज काढण्यासाठी गेल्यावर शाखा व्यवस्थापकापासून ते इतरही मंडळी मंजुरीसाठी पैसे मोजा, असे खुलेआम सांगतात. 'जन्मापासून मृत्यूपर्यंत सोबत करतं पाणी, जीवनाच्या काठावर शेवटचं आचमन असतं पाणी' याप्रमाणे लुटमार ही माणसाला जन्मापासून ते मृत्यूपर्यंत छळत असते. बाजारात साधा भाजीपाला घेण्यापासून सामान्यांची पिळवणूक सुरू होते. शेतकऱ्यांचीही अशीच पिळवणूक दलाल मंडळी करतात. त्यांच्याकडून कमी भावात भाजीपाला घेतात आणि तो जास्तीत जास्त नफा मिळेल या किमतीत विकून सामान्य लोकांना दिवसाच चांदणे दाखवितात. आज मोबाईल हे सुखाचे नव्हे तर आवश्यक साधन बनले आहे. पण मोबाईल सेवा पुरवठादार कंपन्यांनीही आता लुटमार सुरू केली आहे. ट्रायचे सर्व नियम बासनात गुंडाळून त्यांनी आणलेली व्यवस्था भविष्यात अराजकता निर्माण करणारीच ठरणार आहे. ग्राहकांचे हित जपले जावे म्हणून भारत सरकारने एमआरपी व्यवस्था अस्तित्वात आणली आहे. पण एमआरपीचे पालन कोणीही करीत नाही. शीतपेयाच्या बाटलीवर २० रुपये लिहिले असल्यास दुकानदार २२ रुपये घेतो. त्याला याविषयी विचारले तर तो म्हणतो, त्या बाटलीला थंड करण्याचे आम्ही २ रुपये घेतो. तसे पाहता थंड करून ती बाटली २० रुपयात विकायची असते. पण तेही एमआरपी पाळत नाहीत. आज देशात एखादे क्षेत्र दाखवून द्यावे, जिथे लुटमार होत नाही. हे आपले खरोखरच दुर्दैव म्हणावे लागेल. विशेष म्हणजे या लुटमारीतून कुणीही सुटलेला नाही. देशातील गरीब असो वा श्रीमंत प्रत्येक जण कुठे ना कुठे अशा लुटमारीचा शिकार होतो. कुठेही जा, पळसाला पाने तीनच असतात, या तत्त्वानुसार लुटमारीची व्यवस्था देशाला फार मोठ्या संकटाकडे खेचून नेत आहे, हे आपण समजून घ्यायला हवे.

'तू जन्माला आलास तेव्हा रडला, पण लोक मात्र हसले. आता असा पुरुषार्थ कर की, जगाचा निरोप घेताना कर्तव्यपूर्तीच्या आनंदाने तू हसशील, पण लोक मात्र रडतील...' हे वाक्य सदैव स्मरणात ठेवत निर्माण झालेली लुटमार व्यवस्थेला मूठमाती देण्यासाठी क्रांतीची गरज आहे. याच व्यवस्थेमुळे भ्रष्टाचार प्रत्येकाच्या रक्तात भिनला आहे. विशेष म्हणजे याला कुणीही विरोध करू शकत नाही. ज्याने विरोध केला तो एकतर जीवाने जातो किंवा त्याला लोक पागल समजून दूर लोटतात.

म्हणूनच आता वेळ आली आहे की, प्रत्येकाने त्या परमेश्वराला घाबरून तरी सत्याचा मार्ग निवडायला हवा. कारण 'ऊपरवाले की, अदालत में वकालत नही होती और सजा हो जाए तो फिर जमानत नहीं होती...!' हेही समजून घ्यावे. शेवटी पृथ्वी सूर्याभोवती फिरत नाही तर ती रुपयाच्या नाण्याभोवती फिरते, हेच कटू वास्तव आपल्याला स्वीकारावे लागेल.

९८८१७१७८५९

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील संघाचे योगदान

अनेक वेळा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विरोधकांकडून हा मुद्दा उचलला जातो की, संघाने स्वातंत्र्य लढ्यात काय केले? बरेच वेळा संघाच्या स्वयंसेवकांना किंवा इतर समाजाला याबद्दल माहिती नसल्यामुळे तेही या प्रश्नाच्या गोत्यामध्ये येतात व त्यांनाही असे वाटू लागते की, संघाने खरंच काय केले? वास्तविक पाहता संघ ज्यावेळेला स्थापन झाला तेव्हा देशावर इंग्रजांचे राज्य होते. त्यामुळे संघामध्ये जी प्रतिज्ञा दिली जायची त्या प्रतिज्ञेमध्ये देशाच्या स्वातंत्र्यासाठी मी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा स्वयंसेवक झालो आहे, असा अर्थ होता. १९२६-२७ मध्ये जो सत्याग्रह करण्यात आला त्यामध्ये सत्याग्रहींच्या रक्षणासाठी संघाचे स्वयंसेवक तैनात असायचे. यामुळे अनेक वेळेला इंग्रज पोलिसांचा त्यांना मारही खावा लागत होता. १९२८ मध्ये सँडर्स या इंग्रज अधिकाऱ्याचा वध करून ज्या वेळेला प्रसिद्ध क्रांतिकारी राजगुरू हे नागपुरात आले होते त्यावेळेस त्यांच्या राहण्याची व्यवस्था उमरेड येथे भय्याजी दाणी, जे पुढे संघाचे सरकार्यवाह झाले, त्यांच्या शेतावर करण्यात आलेली होती. इंग्रजांचा ससेमिरा चुकविण्यासाठी जयप्रकाश नारायण, अरुणा आसफ अली हे लोक दिल्लीचे संघचालक लाला हंसराज यांच्या घरी बरेचदा आश्रय घेत होते. महाराष्ट्रामध्ये पत्री सरकार स्थापन करणारे नाना पाटील यांनी पोलिसांचा ससेमिरा टाळण्यासाठी त्यावेळेसचे संघ चालक पंडित सातवळेकर यांच्याकडे आश्रय घेतला होता.

१९२८ मध्ये सायमन कमिशनचा नागपूरमध्ये जो विरोध करण्यात आला त्यामध्ये पण संघाचे स्वयंसेवक मोठ्या प्रमाणावर सहभागी झाले होते. काँग्रेसच्या लाहोर येथील अधिवेशनात ३१ डिसेंबर १९२९ रोजी संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव पारित करण्यात आला व २६ जानेवारी १९३० या दिवशी सर्वत्र स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात यावा, अशा पद्धतीच्या सूचना देण्यात आल्या होत्या. याला अनुसरूनच पूजनीय डॉक्टर हेडगेवार यांनी त्या वेळच्या सर्व शाखांना या दिवशी स्वातंत्र्य दिवस साजरा करून ध्वजाला मानवंदना देण्याची व स्वातंत्र्याची कल्पना व आवश्यकता या विषयावर व्याख्यान आयोजित करण्याची सूचना केलेली होती. त्यानुसार सर्वत्र शाखांवर असे कार्यक्रम घेण्यात आले. यावरून आपल्या असे लक्षात येईल की, स्वातंत्र्यासाठी चाललेल्या प्रत्येक गतिविधीशी डॉक्टर हेडगेवार हे संलग्न होते. संघाच्या स्थापनेपूर्वी ते बंगालमध्ये कलकत्ता येथे असताना अनुशीलन समिती या क्रांतिकारकांच्या संघटनेचे सदस्य होते. स्वातंत्र्याबद्दल त्यांचे विचार अतिशय प्रखर आणि स्पष्ट होते. १९३० मध्ये देशभरामध्ये मिठाचा सत्याग्रह करण्यात आला. विदर्भामध्ये जंगल सत्याग्रह करण्यात आला. त्यावेळेला पूजनीय डॉक्टरांनी स्वत:च्या सरसंघचालक पदाची जबाबदारी डॉक्टर परांजपे यांच्यावर टाकून ते व १२ स्वयंसेवक सत्याग्रह करण्यासाठी यवतमाळ जिल्ह्यातील पुसद येथे गेले होते. तेथे त्यांनी जंगल सत्याग्रह केला. यामध्ये त्यांच्यासोबत वर्धेचे आप्पाजी जोशी जे पुढे सरकार्यवाह झाले व दादाराव परमार्थ जे दक्षिण भारतामध्ये प्रचारक होते, हे विशेषत्वाने पूजनीय डॉक्टरांसोबत होते. पूजनीय डॉक्टरांना त्यावेळेस नऊ महिने कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली होती. या सत्याग्रहाच्या आधी केलेल्या भाषणात पू. डॉक्टर म्हणतात की, आम्हाला स्वातंत्र्य कुठल्याही किमतीत मिळवायचेच आहे. १९३१ च्या विजयादशमीला पूजनीय डॉक्टर तुरुंगात असताना सर्व शाखांमध्ये एका संदेशाचे वाचन करण्यात आले होते. त्यामध्ये म्हटले होते की, देशाची पारतंत्रता नष्ट होऊन जोपर्यंत समाज बलशाली आणि आत्मनिर्भर होत नाही तोपर्यंत 'हे मना तुला निज सुखाचा' विचार करण्याचा अधिकार नाही.

१५ डिसेंबर १९३२ ला इंग्रजांनी संघाच्या शाखेमध्ये सरकारी कर्मचाऱ्यांना जाण्यासाठी मज्जाव केला तर १९४० मध्ये इंग्रजांनी संघाचे प्रशिक्षण वर्ग व सैनिकी वेशभूषा यावरही बंदी घातली. इंग्रजांनी १९४३ मध्ये संघाचा अभ्यास करून जो अहवाल तयार केला त्यामध्ये म्हटले होते की, संघ हा योजनाबद्ध पद्धतीने कार्य करीत स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करीत आहे. त्यांचा हा अहवाल राष्ट्रीय अभिलेखागार येथे आजही सुरक्षित आहे. संघाच्या सुरुवातीपासूनच इंग्रज सरकारने संघावर लक्ष ठेवलेले होते. संघामध्ये त्यावेळेस शस्त्रास्त्रांचे प्रशिक्षण दिले जात होते; ज्यातून तरुणांचे मन निर्भय बनत होते. असे निर्भय मनाचे तरुण स्वातंत्र्यप्राप्तीच्या कामांमध्ये सहभागी होत होते. संघ जर जिवंत राहिला तर त्यातून हजारो कार्यकर्ते निर्माण होऊ शकतात, हे पूजनीय डॉक्टरांना माहिती होते. म्हणून त्यांनी १९३० साली आपले पद दुसऱ्याला देऊन मग ते सत्याग्रहात गेले होते. त्यामुळे संघाचा उघड उघड सहभाग जरी अनेक कार्यात दिसत नसला, तरी संघाचे स्वयंसेवक हे सर्वच कार्यांमध्ये सहभागी राहायचे. वर्धा जिल्ह्यातील आष्टी येथे झालेल्या आंदोलनात अनेक स्वयंसेवक पकडल्या गेले व त्यांना शिक्षा झाली. चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर येथे समानांतर सरकार स्थापन करण्यात आले होते. त्यावेळी झालेल्या आंदोलनात व गोळीबारात संघाचे अनेक स्वयंसेवक धारातीर्थी पडले होते. अनेक स्वयंसेवकांना फाशीची शिक्षा झाली होती. पुढे आम जनतेला जी माफी देण्यात आली त्यामध्ये ती शिक्षा रद्द झाली. रामटेकचे त्यावेळचे नगर कार्यवाह बाळासाहेब देशपांडे यांना फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली होती. पुढे त्यांची ही शिक्षा रद्द झाली. संघ काही करणार नाही, परंतु स्वयंसेवक सर्वच कामात अग्रेसर राहतील, हा संघाचा सुरुवातीपासूनचा मंत्र आहे. संघाचे कार्य हे सुरुवातीपासूनच प्रसिद्धीपासून दूर असल्यामुळे छोट्या छोट्या कामांचे वर्तमानपत्रात फोटो देणे, प्रसिद्धी यापासून संघ दूर राहिला. इंग्रजांचे लक्ष संघाच्या कामावर जाऊ नये व संघटन मोठे होत राहावे, हा त्या मागचा एक हेतू होता. परंतु, यामुळे पुढील पिढीला संघाने स्वातंत्र्यासाठी दिलेल्या योगदानाची माहिती राहिली नाही व त्या अज्ञानातूनच लोक प्रश्न विचारतात की, संघाने स्वातंत्र्यासाठी काय केले आहे. हे त्यांचे अज्ञान आहे. ज्यावेळेस सर्वसामान्य माणूस स्वातंत्र्यासाठी पेटून उठलेला होता त्यावेळेस संघासारख्या देशभक्त आणि शिस्तबद्ध संघटनेतील स्वयंसेवक मागे कसे राहू शकतील! संघाने आपल्या पद्धतीने आपले योगदान भारत मातेच्या चरणी समर्पित केलेले आहे.

आम्हास नको मुळी मान मरातब काही कीर्तीची आम्हा हाव मुळीही नाहि ।
सर्वस्व अर्पिले मातृभूमिचे ठायी हे दैवत अमुचे ध्येयमंदिरातील ॥
या भावाने संघाने कार्य केलेले आहे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

### पदक विजेते खेळाडू घडावेत!

सध्या पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेची जगभरात चर्चा सुरू आहे. भारतात ऑलिम्पिक स्पर्धेबाबत आवडीने चर्चा रंगली आहे. भारतीय खेळाडूंनी पॅरिस स्पर्धेत फक्त सहा पदके जिंकली आहेत. लोकसंख्येच्या तुलनेत ऑलिम्पिकसारख्या जागतिक दर्जाच्या क्रीडा स्पर्धेत भारतीय खेळाडूंचा सहभाग फार कमी आहे आणि पदके जिंकण्याची टक्केवारी अगदी नगण्य आहे. त्यामुळे भारतीय खेळाडूंची कामगिरी नक्कीच चांगली नाही, असे नाईलाजाने म्हणावे लागेल. पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेच्या पदकतालिकेत चीन पहिल्या क्रमांकावर आहे तर दुसऱ्या स्थानावर अमेरिका आहे. पदकतालिकेत भारताचा क्रमांक नसल्यासारखा आहे. म्हणजे एक तर भारतीय खेळाडू हे सध्या चमकदार कामगिरी करू शकले नाहीत किंवा भारतीय खेळाडूंना परफेक्ट कामगिरी करण्यासाठी आवश्यक ते प्रशिक्षण मिळाले नाही. मनू भाकर, सरबज्योत सिंह व स्वप्निल कुसळे यांनी पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत कांस्यपदके जिंकून अभिमानास्पद कामगिरी केली आहे. महिला कुस्तीपटू विनेश फोगाटकडून सुवर्ण पदकाची आशा होती; दुर्दैवाने ते स्वप्न भंगले. भालाफेक स्पर्धेत नीरज चोप्राची कामगिरी रौप्य पदकाला गवसणी घालणारी ठरली. बऱ्याच वर्षांनंतर भारतीय हॉकी संघाने कांस्य पदक मिळवून भारताचा बहुमान वाढवला तसेच अमन सेहरावतने कुस्तीमध्ये कांस्य पदक जिंकून भारताचा बहुमान वाढविला आहे. इतर खेळांमध्ये भारतीय खेळाडूंनी चमकदार कामगिरी केली नाही. ही बाब लक्षात घेऊन भारतीय खेळाडूंनी निराश न होता खेळाच्या सरावात सातत्य ठेवावे आणि त्या त्या खेळांची कौशल्ये आत्मसात करावीत. यासाठी स्वत:ला शारीरिकदृष्ट्या मजबूत व मानसिकदृष्ट्या सक्षम बनवावे. आगामी ऑलिम्पिक स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी पूर्ण तयारीनिशी उतरावे. याकरिता भारतीय मॅनेजमेंटने आपल्या सर्व खेळाडूंना तसे तंत्रशुद्ध प्रशिक्षण द्यावे. राजकीय लोकांना विनंती की, खेळांमध्ये होणाऱ्या घाणेरड्या राजकारणापासून स्वत:ला दूर ठेवावे. ज्यांना खेळातील तंत्र व कौशल्य माहीत नसते त्यांनी समाजमाध्यमावर खेळाबद्दल व भारतीय खेळाडूंच्या बाबतीत फुकटचे ज्ञान पाजळू नये. आताच्या ऑलिम्पिक स्पर्धेत सहभागी होऊन पदके जिंकलेल्या सर्व भारतीय खेळाडूंचे मनःपूर्वक अभिनंदन!

**बबन दामोदर गुळवे**/९५४५४४२६४८

## वाचक पत्रे

### भारतीय हॉकीचे सुवर्णयुग

भारतीय पुरुष हॉकी संघाने स्पेनसारख्या मात्तबर प्रतिस्पर्धी संघावर २-१ अशा गोल फरकाने मात करीत पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कांस्य पदकावर नाव कोरत देशवासीयांना जल्लोषाची संधी निर्माण करून दिली. मागील टोकियो ऑलिम्पिकमध्येही भारतीय संघाने कांस्यपदक जिंकले होते. त्यामुळे सलग दोन ऑलिम्पिकमध्ये भारताने कांस्यपदक जिंकण्याची कामगिरी केली. कर्णधार हरमनप्रीत सिंग आणि विनेश कुमार तसेच गोलकिपर श्रीजेशने संपूर्ण स्पर्धेत चांगला खेळ केला. भारतीय संघाची ही कामगिरी अभिमानास्पद आहे. संपूर्ण देशाला भारतीय हॉकी संघाचा अभिमान आहे. भारताला सर्वाधिक पदके हॉकी या खेळानेच मिळवून दिली आहेत. ऑलिम्पिक हॉकीमध्ये भारताचे हे १३ वे पदक आहे. सलग दोन ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक मिळवून भारतीय हॉकी संघाने आपले सुवर्ण युग परतत असल्याचे संकेत दिले आहेत.



भारतीय हॉकीसाठी हे शुभ चिन्ह आहे. या विजयाने भारतीय हॉकी खेळाला पुन्हा ऊर्जितावस्था मिळेल. या पदकामुळे देशातील तरुण मुले हॉकी खेळाकडे वळतील. प्रेक्षकही हॉकीवर पूर्वीप्रमाणे प्रेम करतील. भारतीय हॉकीला पुन्हा अच्छे दिन येतील. भारतीय हॉकीचे सुवर्णयुग पुन्हा अवतरेल. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये मिळविलेले हे कांस्यपदक भारतीय हॉकीच्या सुवर्णयुगाची नांदी ठरेल, यात शंका नाही. कांस्यपदक विजेत्या भारतीय हॉकी संघाचे मनापासून अभिनंदन!

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

### बांगलादेशातील उलथापालथ

बांगलादेशात सत्तापालट ज्या प्रकारे होतोय् तो अतिशय दुर्दैवी प्रकारच म्हटला पाहिजे. ज्या शेख हसीना यांनी १५ वर्षे यशस्वीपणे राज्य कारभार केला, देशाची प्रगती केली, देशाचे उत्पन्न वाढवले, सर्व स्तरात देशाची प्रगती केली, सर्व देशांशी संबंध चांगले ठेवले याची कट्टरपंथीयांनी जाणीव ठेवली नाही. केवळ शेख हसीना यांचा दुस्वासापोटी देशात दंगली, हिंसा करून सत्तापालट करण्याचा जो प्रयत्न होतोय् व अशा कृत्यामुळे बांगलादेश अनेक वर्षे प्रगतीत माघारेल, याचीही विरोधकांनी जाणीव ठेवली नाही. बांगलादेशातील लोकांचे हे दुर्दैवच म्हटले पाहिजे. आज भारतामुळे बांगलादेशाला स्वातंत्र्य मिळाले, याची जाणीव ठेवून बांगलादेशी हिंदू तिथे सुरक्षित हवा होता. पण दंगलग्रस्तांनी त्यांची घरे जाळली, हिंदू मंदिरांची तोडफोड केली, मानवतेची वाट लावली, हे सर्व मानव जातीला अत्यंत क्लेशकारक आहे. यातून मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी काय योग्य बोध घ्यायचा तो घ्यावा...

**प्रा. अनिल पळनीटकर**/९३७३२१३६१०

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. निवासी संपादक: प्रशांत वसंतराव माने (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com
या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

## संक्षिप्त वृत्त...

### -लाडक्या भावाला अवघ्या तीन दिवसात प्लाँस्टीक कोटेड राखी

लाडक्या बहिणीसाठी पोस्ट खात्याचा अभिनव उपक्रम



**सेलू,/प्रतिनिधी:** महाराष्ट्र शासनाने लाडक्या बहिणीला आर्थीक आधार मिळावा या उदात्त हेतूने नूकतीच लाडकी बहिण योजना घोषीत करून प्रतिमाह १ हजार ५०० रूपये आर्थीक मदत देण्याची घोषणा केली आहे.ही योजना जूलै महिन्यापासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात येत असून सोमवार १९ आँगस्ट पासून म्हणजेच राखी पौर्णीमेपासून लाडक्या बहिणीच्या बँक खात्याात सदरिल रक्कम जमा करणार आहे.राज्य शासनाच्या सदरिल घोषणेला अनूसरून केंद्र शासमाच्या पोस्ट खात्याने देखील राखी पौर्णीमा निमित्ताने एका अभिनव उपक्रमाची घोषणा केली आहे.देशाच्या कोणत्याही भागात अवघ्या तीन दिवसात राखी पोहचविण्यासाठी पोस्ट खाते विशेष मोहिम राबविण्यात असल्याची माहिती पोस्ट मास्तर विठ्ठल जोगदंड व अंजू काष्टे यांनी दिली आहे.शहरातील मूख्य डाकघर व उप डाकघर या ठिकाणी स्वतंत्र एक खिडकी फूलांनी सजवून सदरिल खिडकी मार्फत लाडक्या बहीणीसाठी प्लास्टीक कोटेड राखी पाकिट उपलब्ध करण्यात आले आहे.सोमवार १९ आँगस्ट पर्यंत सदरिल सूशोभीत खिडकी मार्फत प्लाँस्टीक कोटेड पाकिट देण्यात येणार असून त्यााच सूशोभीत खिडकी मार्फत राखी असलेले पाकिट स्विकारण्यात येणार आहेत.यासाठी पोस्ट खात्यातील कर्मचारी सूट्टीच्या दिवशी देखील काम करून देशातील कानाकोप-यात अवघ्या तीन दिवसात प्रत्याक्ष भावाच्या हातात राखी मिळेल अशी व्यवस्था करण्यात आली आहे .यासाठी राज्यभरात २आँगस्ट पासून विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.याशिवाय जगातील कोणत्याही भागातील भावासाठी पाठवणा-या लाडक्या बहीणीची राखी देखील स्पीड पोस्टाव्दारे अवघ्या आठ दिवसात भावांच्या हातात पडेल अशी व्यवस्था पोस्ट खात्याअंतर्गत करण्यात आली आहे.त्यामूळे देशातील व परदेशातील बहिणींच्या राख्या लाडक्या भावांना राखी पौर्णीमेपूर्वी मिळणार आहेत.सेलू शहरातील दोन पोस्ट कार्यालयाप्रमाणेच महाराष्ट्रातील प्रमूख शहरातील मूख्य पोस्ट कार्यालयात राख्या पोस्ट करण्यासाठी वेगवेगळे रंगीत बाँक्स लावण्यात येणार आहेत.यात विशेषबाब म्हणजे शासकीय सूट्टी असतांना देखील राखी पाठविण्याची व्यवस्था सर्व पोस्ट कार्यालयातंर्गत करण्यात आली आहे.त्यामूळे लाडकी बहिण व लाडक्या भावासाठी केंद्र व राज्य सरकारच्या विशेष उपक्रमामूळे राखी पोर्णीमा उत्सव पर्वणी ठरणार आहे.

### दुधगाव- आसेगाव रस्त्याची दुरावस्था



**परभणी,/प्रतिनिधी:** परभणीकडे जाणारा दुधगाव आसेगाव हा रस्ता सतत च्या ओव्हर लोडिंग वाहनाने दुधगाव २ किमी ते साडेगाव फाटा रस्त्याची दुर्मिळ अवस्था झाली असून सा.बा. विभाग परभणी यांचे त्याकडे दुर्लक्ष आहे त्त्याा परभणी मध्ये शालेय व महाविद्यालयीन शिक्षणासाठी गावाकडे ये जा करणाऱ्या विद्यार्थ्यांना व गावकऱ्यांना परिणामी त्रास होत आहे.हे लक्षात घेता व गावकरांच्या मागणीस्तव कर्तव्यदक्ष मा.आ.विजयराव भांबळे साहेबांनी रस्त्याची पाहणी केली व लवकरात लवकर रस्ता दुरुस्त करण्यासाठी संबंधित सार्वजनिक बांधकाम विभाग परभणी अधिकाऱ्यांना फोन वरून सूचना दिल्या व योग्य वेळी कामाची पूर्तता झाली नाही तर गावकऱ्यांसह लोकशाही पध्दतीने आंदोलनांचा इशारा दिला. यावेळी पांडूकाका पवार , अभिनय राऊत , विशंभर पवार, मधुकर आण्णा पवार, सुगाजीराव गरगडे, सचिन राऊत, पंडितराव पारवे, आनंता राऊत, राजू पाटील, राम सर पारवे, भगवान राऊत, शिवाजी राऊत, शिवाजी गारुडी, स्वप्नील मगर, पवन राऊत, नारायण राऊत, कैलास राऊत, राहुल राऊत, अभिलाष राऊत तसेच अनेक गावकरी उपस्थित होते.

**जाहिर प्रगटन**

परभणी येथील तिसरे सह दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर परभणी यांचे न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज ५९७/२०२४. नि.क्र. ०७
अर्जदार : १) रामेश्वर पि. बाबुराव मुटकुळे,वय ३४ वर्षे, धंदा शेती राहणार पारवा. ता.जि. परभणी २) सत्याभामाबाई भ्र. बाबुराव मुटकुळे,वय ५५ वर्ष धंदा घरकाम,राहणार पारवा ता. जि. परभणी ३) सुरेखा भ्र. सिताराम दंडवते,वय ३७ वर्षे, धंदा घरकाम,राहणार सोन्ना, ता. जि. परभणी ४) लता भ्र. मारोती जमरे,वय २९ वर्ष धंदा घरकाम,राहणार नागनगांव ता. जिंतुर जि. परभणी
विरुद्ध
गैरअर्जदारः निरंक
वादः- बॉम्बे रेग्युलेशन अक्ट कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत...
ज्याअर्थी, अर्जदार रामेश्वर पि. बाबुराव मुटकुळे यांनी या न्यायालयात विधीज्ञ श्री एल. एस. काळे केला आहे की बाबुराव पि. आश्रोबा मुटकुळे हे दि. २८/०६/२०२४ रोजी मौजे पारवा ता. जि. परभणी यांच्या मार्फत अर्ज दाखल येथे मयत झाले अर्जदार हे मयत व्यक्तीचे वारस आहेत त्यांनी खालील कामाकरिता वारसा हक्काचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज केलेला आहे- अर्जदार यांच्या हक्कात वारसा अधिनियम कलम २ मुंबई रेग्युलेशन अक्ट प्रमाणे वारस्सा प्रमाणपत्र मिळणे बाबत
विधिज्ञ शासकिय व निमशासकिय कार्यालयीन कामकाजा करीता आवश्यक आहे.
त्याअर्थी, कोणास सदर अर्जा बाबत आक्षेप असल्यास त्यानी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन एक महिन्याच्या आत आपला आक्षेप या न्यायालयात दाखल करावा अन्यथा अर्जदाराचे म्हणणे एकुण एकतर्फी निर्णय दिला जाईल-
आज दिनांक ०८/०८/२०२४ रोजी माझ्या सहिनिशी व शिक्यानिशी दिले- आदेशान्वये
पुढील तारीख १९/०९/२०२४

स्वाक्षरीत/-
कनिष्ठ लिपीक

स्वाक्षरीत/-
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, व स्तर परभणी.

# आई-वडीलांचा पाठिंबा, तिसऱ्या प्रयत्नात हादगावं बु.ची लेक कालवा निरीक्षक

## ग्रामस्थांच्यावतीने अनिलराव नखाते यांनी केला सत्कार

**पाथरी ,/प्रतिनिधी :** जिद्द उराशी बाळगून मेहनत केल्यावर यश हे नक्की मिळतेच,सोनाली मदनराव नखाते हिच्या बाबतीतही असेच झाले.उच्च पदाचे स्वप्न उराशी बाळगताना कौटुंबिक जेमतेम आर्थिक परिस्थितीवर मात करीत अन् आई वडीलांचा पाठिंबा व सेल्फ स्टडीतून तिसऱ्या प्रयतात पाठबंधारे विभागात कालवा निरीक्षक म्हणून तिची निवड झाली.

या यशाबद्दल ग्रामस्थांच्या वतीने शनीवारी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अनिलराव नखाते यांनी सोनालीचा सत्कार केला. हादगांव बु.येथील विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे गट सचिव मदनराव नखाते यांच्या सामान्य कुटुंबातील सोनालीने दहावी पर्यंत चे शिक्षण गावातील जिल्हा परिषद शाळेत पुर्ण केले. पुढे माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण पुर्ण करतांना तिने स्पर्धा परीक्षेची तयारी केली. यातून २०१७ साली एसटीआय ची परिक्षा दिली पण हा प्रयत पुर्णत्वास गेला नाही. त्यानंतर मंत्रालयातील पदासाठी परिक्षा दिली पण अपयश आले.दोन वेळा अपयश आल्यानंतरही न खचता जिद्दीने व परिश्रमातून



पाठबंधारे विभागाच्या दिलेल्या परिक्षेचा निकाल ३१ जुलै रोजी मध्यरात्री म्हणजे ११:३० वा जाहीर झाला. यामध्ये सोनाली नखाते यांची कालवा निरीक्षक पदावर निवड झाली.हि मध्यरात्र कुटुंबासाठी आनंदाची ठरली.ग्रामस्थांच्या वतीने शनीवारी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अनिलराव नखाते यांनी सोनाली नखाते,वडील मदनराव नखाते यांचा सत्कार केला. सोनालीने मेहनत घेऊन जिद्दीने मिळवीलेले यश हे हादगांव बु येथील मुला मुलींनी आदर्श घेण्यासारखे आहे असे गौरवोद्गार सभापती अनिलराव नखाते यांनी व्यक्त केले.याप्रसंगी सरपंच बिभीषण नखाते,चेअरमन बाबासाहेब नखाते,ग्रा.पं. सदस्य प्रशांत नखाते,बि.टी. कदम सोसायटी सदस्य सुनिल नखाते,देविदास शिंदे,पंडित आबा नखाते,रामचंद्र बापु नखाते,बापुराव नखाते,गणेश निर्वळ,शिवा काका नखाते,भास्कर आबा नखाते,मदन नखाते,गंगाधर नखाते व ग्रामस्थांची उपस्थिती होती. दोन पैकी एक वेळा प्रतिक्षा यादीत नांव होते; परंतु निवड झाली नाही. त्यामुळे मी न खचता आणखी जोमाने तयारी केली. या वेळेस मला यश मिळाले. माझ्या यशात आई, वडील,शिक्षक यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांच्या प्रोत्साहनामुळेच माझी आज कालवा निरीक्षक म्हणून निवड झाली. यापुढे स्पर्धा परिक्षा देऊन प्रथमवर्ग प्रशासकीय सेवेत जाण्याचे ध्येय आहे.असे मनोगत सोनाली नखाते यांनी व्यक्त केले.

## विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर चव्हाण यांच्याकडे महत्वाची जबाबदारी

**जिंतूर ,/प्रतिनिधी :-** नुकतीच रिपब्लिकन सेना महाराष्ट्र प्रदेश पदाधिकारी यांची बैठक नांदेड शासकीय विश्रामगृहात संपन्न झाली परभणी रिपब्लिकन सेनेत बदल करत पच्छीम जिल्हाध्यक्ष शरदराव चव्हाण यांच्या कडे पक्ष नेतृत्वाने त्यांच्या कुशल कामाची महंती लक्षात घेऊन परभणी जिल्ह्यातील जिंतूर विधानसभा व पाथरी विधानसभा ह्या मतदारसंघांची प्रभारी अध्यक्ष म्हणून निवड केली आहे.



विधानसभा निवडणुकीत कोण उमेदवार असेल त्याची चाचपणी करुन आवहाल रिपब्लिकन सेना पक्ष कार्यालयात पाठवावा असी सुचना परभणी निरिक्षक प्रा.युवराज धसवाडीकर यांनी केली. ऐन विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शरदराव चव्हाण यांना मोठी जबाबदारी राजकीय जबाबदारी दिल्याने जिंतूर,सेलु, सोनपेठ,मानवत,पाथरी तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी अभिनंदन केले आहे. तरपच्छीमजिल्हाध्यक्षजिल्हाध्यक्ष रिक्त झाल्यानें त्यांच्या जागी आशीष भैय्या वाकोडे यांची निवड करण्यात आली. यावेळी प्रदेश अध्यक्ष समाजभूषण काकासाहेब खांबाळकर, प्रदेश महासचिव युवराज धसवाडीकर, प्रदेश संघटक भैय्यासाहेब भालेराव, प्रदेश सचिव श्रीपती ढोले, प्रदेश सचिव माधवदादा जमदाडे, युवा प्रदेशाध्यक्ष किरण घोंगडे, कार्यकारिणी सदस्य सिद्धार्थ कांबळे, कार्यकारिणी सदस्य चद्रकांत सुपेकर, विदर्भ अध्यक्ष योगेंद्र चावरे, परभणी पुर्व जिल्हाध्यक्ष राजकुमार सुर्यवंशी, युवा जिल्हाध्यक्ष प्रितम वाकळे यांची उपस्थिती होती.





**जिंतूर- म.पो.केंद्र जिंतूर येथे मा. सुरेश मेकला सर, मा.अपर महासंचालक साहेब, (वा)म.रा. मुंबई , मा.श्री अरविंद साळवे सर, मुख्यालय, वाहतूक विभाग , मुंबई, श्रीमती जमादार मॅडम, मा.पोलीस अधीक्षक महामार्ग छत्रपती संभाजीनगर परिक्षेतत्र मा.श्री डिसले सर पोलीस उप अधीक्षक ,पो. नि.पठाण साहेब ,यांचे मार्गदर्शनाखाली आरोग्य शिबीर कार्यक्रम घेतला. सदर वेळी महामार्ग पोलीस केंद्रातील प्रभारी अधिकारी विनायक जाधव सहाय्यक पोलीस निरीक्षक पोलीस उपनिरीक्षक श्री.कदम, श्री.इनामदार व पोलीस अंमलदार यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. त्त्याा नेत्र तपासणी ,बीपी , शुगर व इतर वैद्यकीय तपासणी डॉ.सागर कांगणे सर व नेत्रातज्ञ श्री.ज्ञानेश्वर वानखेडे सर यांचे मार्फतीने करण्यात आली.**

## सेलूत पोलिस स्टेशनच्या पाठिमागे घरफोडी



**सेलू,/प्रतिनिधी :** शहरात चोरीचे प्रमाण वाढले असून शनिवारी ( ता.३) रोजी पोलिस स्टेशनच्या पाठीमागे हाकेच्या अंतरावर भर वस्तीत घरी कोणी नसल्याचा फायदा घेत भुरट्या चोरट्यांनी घराचा पाठिमागील दराचा कोंडा तोडून घरातील ऐवज लंपास केल्याची घटना घडली आहे.

शहरात अवैध धंद्यांदी डोके वर काढले असल्याने चोऱ्यांच्या घटना घडत आहेत. शनिवारी नूतन महाविद्यालयाच्या पाठिमागे असलेल्या सह्याद्री नगर कॉलनीत कृष्णकांत पदे हे काही कामानिमित्त बाहेरगावी गेले होते. त्याचाच फायदा घेत भुरट्या चोरांनी त्यांच्या घराचा पाठिमागिल दरवाज्याचा कोंडा तोडून घरात प्रवेश केला. घरातील सामान अस्तावेस्त करून घरातील ऐवज लंपास केला. हाकेच्या अंतरावर असलेले पोलिस स्टेशन त्याच बरोबरीला पदे यांच्या शेजारीच असलेली महिला पोलिस व उपविभागीय पोलिस कार्यालयाचे कर्मचारी यांचे घर असूनही अज्ञात चोरट्यांनी पदे यांचे घर साफ केल्याने सर्व सामान्य नागरिकांना पोलीस कर्मचाऱ्यावरच संशय येत असून रक्षकच भक्षक होत असल्याची भावना नागरिकात व्यक्त होत आहे. या घटनेने शहरातील नागरिकात भितीचे वातावरण पसरले आहे. घटनास्थळी पोलिस निरिक्षक दिपक बोरसे यांनी भेट देवून पहाणी केली.

## त्या रत्याची प्रचंड दुरावस्था

**परभणी,/प्रतिनिधी :** शहरात सध्या राष्ट्रीय महामार्गावरील खड्डे- म्हणजे जीवघेणेच ठरले आहे. या खड्डयामुळे अनेक नागरिकांना चांगलाच त्रास होत आहे. या खराब रस्त्यावरुन वाहन चालविणे अत्यंत जोखमीचे झाले आहे. त्यामुळे अशा रस्त्यांच्या दुरुस्तीकडे ऐन पावसाळयात दुर्लक्ष होत असलयाचा परिणाम सर्वसामान्य नागरिकांना भोगावा लागत आहे. त्यातच या रस्त्यावर प्रचंड धुळ होत असल्यामुळे नागरिकांनी याबाबीचा गांभीर्याने विचारविनिमय करण्याची खरी गरज असून आपल्या आरोग्याची काळजी घेण्याची गरज आहे.

## जिंतूर-सेलू तालुक्यात असंख्य कार्यकर्त्यांचा काँग्रेस पक्षात प्रवेश

**जिंतूर,/प्रतिनिधी-** सेलू शहरासह सेलू तालुक्यातील मौजेकरडगाव,मौजे राजा तसेच जिंतूर तालुक्यातील चिंचोली काळे येथील राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गट व भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सचिव, सुरेश नागरे यांच्या उपस्थितीमध्ये राष्ट्रीय काँग्रेस पक्षात प्रवेश केला.



या मध्ये सेलू शहरातील रहीम सर माजी नगरसेवक यांचे सहकारी अब्दुल हफिस,अब्दुल जब्बार, मारुती सुरवसे, शोएब सय्यद, नादर खान, आरेफ सय्यद, जबी खान,आरेफ सय्यद, जफर हुसेन, मोहसीन खान, हसन खान,सय्यद कलीम, मुदसिर हुसेन, अरबाज खान, वजीर भाई, अब्दुल रहमान, शोएब पठाण, शेख शफी, मोहित शेख, आमिर खान, साजिद गफार,अब्दुल नफिस, सय्यद इमरान,शेख बबलू शेख, अमीर तजीन खान,फरखान बागवान, आमिर खान,अलीम खान,राजू पठाण, नवीन पठाण, अफसर बेग,अझहर शेख,हाफिस गुत्तेदार, कालुभाई कुरेशी, इस्माईल भाई,अरमान शेख, यांच्या सह करडगाव ता. सेलू येथील बाबासाहेब सावंत, विष्णू देवकते, तसेच राजा ता. सेलू येथील रामचंद्र दळवी रावसाहेब गिनगिने, अशोक बहिरट व चिंचोली काळे ता. जिंतूर येथील आश्रोबा शेवाळे, विश्वनाथ मोरे, ताराचंद्र मोरे, सिद्धार्थ मोरे, लक्ष्मण मोरे, पंढरी घोगरे, कोंडीराम शेवाळे, अर्जुन मोरे, काकासाहेब मोरे,गंगाधर मोरे, बबन घोगरे, गजानन गायकवाड, शेषराव गायकवाड,पांडुरंग गायकवाड, लिंबाजी पिसाळ, शिवाजी काळे भगवान घोगरे नारायण पिसाळ, नितीन मोरे, रामभाऊ आव्हाड, विठ्ठल कोरडे, विलास काळे, दत्तराव मोरे, नामदेव शेवाळे,बालाजी घोगरे, देविदास मोरे,दादाराव मोरे, अशोक मोरे, राजू काळे, रामेश्वर कोरडे, अंकुश मोरे, प्रल्हाद गायकवाड, बालाजी मोरे, या सर्वांचा काँग्रेस पक्षात प्रवेश झाला.

यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव श्री सुरेशभैया नागरे, जिल्हाकार्याध्यक्ष नानासाहेब राऊत, प्रसादराव बुधवंत, मा.जि.प.सदस्य राजेंद्र नागरे, मा.जि.प.सदस्य अविनाशराव काळे, ओबीसी प्रदेशउपाध्यक्ष केशवराव बुधवंत, कवडा सरपंच राजेश चव्हाण, शहराध्यक्ष बासू पठान, सुधाकर नागरे,डॉ निशांत मुंढे,युवक विधानसभा अध्यक्ष रामेश्वर घुगे अल्पसंख्यांक तालुका अध्यक्ष तहसीन देशमुख,अल्पसंख्यांक शहर अध्यक्ष जाबेर मुल्ला, माजी नगरसेवक जम्मु भाई, वसीम पठाण आदी उपस्थित होते.

# मी कधीही गट-तट पक्ष न पाहता लोकांची कामे करतो- आ.डॉ.रत्नाकर गुट्टे

**गंगाखेड,/प्रतिनिधी :** कोणत्याही भागाचा विकास करण्यासाठी दूरदृष्टी ठेवून कामे केली पाहिजेत. ग्रामीण व शहरी भागाचा कायापालट करण्यासाठी पायाभूत सुविधा व नागरी प्रश्न सोडविणे आवश्यक असते. माय-बाप जनतेने त्यांच्या कामांसाठीच लोकप्रतिनिधीला निवडून दिलेले असते. विकास कामात राजकारण आणले तर, कोणतेच काम पूर्ण होऊ शकणार नाही. त्यामुळे मी कधीही गट-तट, पक्ष न पाहाता लोकांची कामे करतो. म्हणून सामान्य लोकांशी माझी नाळ जोडली गेली आहे, असे प्रतिपादन गंगाखेडचे रासप आमदार डॉ.रताकर गुट्टे यांनी केले.

शहरातील स्व.गोपीनाथ मुंडे सभागृह येथे आयोजित कामगार गृहोपयोगी वस्तू संच वाटप आ.गुट्टे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. त्यांच्या मार्गदर्शनात सुरू असलेल्या शासकीय योजना मदत केंद्राने हे आयोजन केले होते.

पुढे आ.डॉ.गुट्टे म्हणाले की,
अंग मेहनत करून काबाडकष्ट करणाऱ्या कामगार बांधवांना त्यांच्या दैनंदिन जीवनात उपयोगी येतील अशा वस्तू देऊन महाराष्ट्र शासनाने त्यांचा सन्मान केला आहे. त्यामुळे त्यांच्या कष्टाला मुद्देचा हात देताना मला विशेष समाधान वाटत आहे. आपल्या गंगाखेड विधानसभा कार्यक्षेत्रात कोणताही कामगार बांधव या लाभापासून वंचित राहता कामा नये, याची दक्षता शासकीय योजना मदत केंद्राने घ्यायला हवी.

याप्रसंगी बोलताना मित्र मंडळाचे जिल्हाध्यक्ष प्रल्हाद मुरकुटे म्हणाले की, या वस्तू वाटप संचामध्ये विविध प्रकारचे गृहपयोगी साहित्या आहे. त्याची कामगारांना मदत होईल. तसेच त्यांना प्रोत्साहन सुद्धा मिळेल. त्यामुळे आपल्या भागातील जास्तीत-जास्त लाभार्थ्यांना याचा लाभ मिळाला पाहिजे, यासाठी प्रयत करणे गरजेचे आहे.

दरम्यान, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम विभागाच्या वतीने देण्यात आलेल्या या गृहोपयोगी वस्तू संचाचे तब्बल १ हजार कामगार लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अभिजीत चक्के आणि सूत्रसंचालन पदुदेव जोशी यांनी केले. तर आभार सचिन राठोड यांनी व्यक्त केले. यावेळी मित्र मंडळाचे जिल्हाध्यक्ष प्रल्हादराव मुरकुटे, रासप जिल्हाध्यक्ष ॲड.संदीप आळनुरे, प्रभारी हनुमंत मुंडे, पालम तालुका प्रभारी माधवराव गायकवाड, तालुकाध्यक्ष रामप्रसाद सातपुते, राधाकृष्ण शिंदे, शहराध्यक्ष ॲड. अकबर सय्यद, माजी नगरसेवक सत्यापाल साळवे, राजू खान, उद्धव शिंदे, माणिकराव आळसे, नागनाथ कासले, वैजनाथ टोले, पिराजी कांबळे, उद्धव शिंदे, चांद भाई, सतिश घोबाळे, संजय पारवे, इंतेसार सिद्दिकी राजेभाऊ (बापू) सातपुते, खालेद शेख लाभार्थी कामगार बंधू आणि भगिनी तसेच पदाधिकारी व कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ...तर खोटे आरोप परतवून लावा : आ.डॉ.गुट्टे

**राज्यात कुठेही महायुतीला चांगले पाठबळ मिळत आहे. विविध महत्वकांशी योजनेच्या माध्यमातून महायुतीने जनाधार निर्माण केला आहे, हि खूप सकारात्मक बाब आहे. मात्र, आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विरोधकांकडून फेक नरेटीव्ह पसरवला जात आहे. त्यामुळे घराघरात जाऊन महायुतीची कामे निर्णय आणि तरतुदी व धोरण लोकांना समजावून सांगा आणि विरोधकांचा खोटा नरेटीव्ह व आरोप परतावून लावा, असेही आवाहन आ.डॉ.गुट्टे यांनी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना केले.**



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# जल्लोष लोककलेचा १७ ऑगस्टला बीडमध्ये बालरंगभूमी परिषदेचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ ऑगस्ट**

येथील अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची घटक संस्था असलेली बालरंगभूमी परिषदेचा जल्लोष लोककलेचा बीड जिल्हा महोत्सव दिनांक १७ ऑगस्ट २०२४ ला सकाळी नऊ वाजल्या पासून सौ.के.एस.के. महाविद्यालयाच्या परिसरात होणार असल्याचे बालरंगभूमी परिषदेच्या मुंबई उपाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर यांनी कळवले आहे.

या बाल लोककला महोत्सवात समूह लोकगीत व वैयक्तीक लोकगीत,समुह लोकनृत्य व वैयक्तीक लोकनृत्य तर वैयक्तीक लोकवाद्य वादन यात संबळ,डिमडी, पखवाज,ढोलकी, तुनतुने, बगलबच्चा, संदरी,बासरी, शहनाई,ताशा,कडकनी,हलगी, गजाढोल, टाळ, विना, चिपळ्या, ढमरू, तुतारी, झांज, लेझीम नगारा, आदिवाद्य तर लोकगीत आणि लोकनृत्यात भाऊड,वासुदेव, शेतकरी गीत,पिंगळा,पांगुळ, जागरण,देवीची गाणी, भराडी, लोकगीत,भलरी गीत, भूलाबाईची गाणी, फटका, भोंडव्याचा फेर, जात्यावरची गाणी, धनगरी ओव्या, पोतराजाच्या वहया, लावणी,धनगरी नृत्य,कुठल्याही राज्याचे लोक नृत्य त्यात ६ ते १५ वयोगटातील बाल कलावंतानी सहभाग नोंदवावा.सर्वोत्कृष्ट,उत्कृष्ट, उत्तम व प्रशंसनीय असे जवळपास पंच्याहत्तर हजाराची बक्षीसे या बाल कलावंताना दिली जाणार आहे. तर सर्वच बाल लोककलावंताना सहभागी प्रमाणपत्र दिले जाणार आहे.

वैयक्तीक सादरीकरणासाठी ३ ते ४ मिनीटांचा वेळ असेल तर समुह सादरीकरणासाठी ६ ते ८ मिनिटांचा वेळ असणार आहे.प्रथम येणार्या २५ समूह संघाना तर ५० वैयक्तीक कलावंताना प्रवेश दिला जाणार आहे. वैयक्तीक नृत्य व समूह नृत्यासाठी रेकॉर्डीग गाणे चालतील. समुहगीत,वैयक्तीक लोकगीत व वादन हे सहवाद्य असणार आहे. नुकतेच लोककला प्रशिक्षण व प्रदर्शन कार्यशाळा परिषदेने घेतली होती. यात जवळपास सातशे बालकलावंत सहभागी झाले होते. परिषदे तर्फे छत्री रंगवा महोत्सव देखील घेतला होता. या सर्व कार्यक्रमांना उदंड असा प्रतिसाद मिळत आहे. तसेच बालप्रेक्षक सभासद योजना देखील सुरू आहे. या बाललोककला महोत्सवात जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे तसेच बाल प्रेक्षक सभासद योजनेतील कलावंतानी महोत्सवात बघण्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर, स्नेहल पाठक,डॉ.संजय पाटील देवळाणकर, शाहीर विलास सोनवणे,अनुराधा चिंचोलकर, विश्वांभर देशमाने, मिलींद शिवणीकर,अमित गाडे,दुष्यंता रामटेके,अनिता शिंदे, विजय राख,सुरेखा जोशी,दीपक जमधाडे,नामदेव साळूंके,नितीन प्रधान, पवन शिंदे,सिध्दार्थ अग्रवाल,राधाकृष्ण वाघ, कैलास शिंदे, सुमित गायकवाड, सुरेश साळूंके,सुरेश थोरात,इंद्रजीत भांगे आदिनी केले आहे.संपर्क नाटचशास्त्र व संगीत विभाग सौ.के.एस.के.महाविद्यालय,बीड

# अहंकार न करता सद्भावनेतून केलेल्या कामाचे शालिनतेतून रुपांत्तर होते विनयात : अमृत ऋषी महाराज

## सद्गुरुच्या आशिर्वाद आणि मार्गदर्शनाने मानवी जीवनाचे कल्याण

## चातुर्मास निमित्त आनंद गणेश दरबारात प्रवचनातून श्रावकांना गुरुंचे मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ ऑगस्ट**



पूर्व कर्म बंधनातून मुक्तीसाठी मिळालेला जीव माझे माझे करत मोह,लोभात गुरुफटून जातो व स्वतःचे अस्तित्व विसरून संपत्तीच्या हव्यासात अडकतो. मात्र नीर्वाणा वेळी सर्व स्थावर आप्तेष्टांना त्याला येथेच सोडून जावे लागते. सोबत काहीच येत नसते मात्र सद्गुरुचा आशीर्वाद आणि मार्गदर्शन मिळाले तर जीवनाचे सार्थक होते हे स्तवनातून आनंद गणेश दरबारात आज अमृत ऋषी महाराजांनी सांगितले.

तर आपल्या जीवनात असणार्या आपल्यातील पाशवी वृती बद्दल अमृत ऋषी महाराज म्हणाले प्रत्येकाची वृत्ती ही त्याला या कार्याबद्दल मनवण्याची अर्थात विनंती करून ते काम साध्य करण्याची असते. आपल्यापुढे त्याला झुकण्याची आपलेच त्यांनी ऐकावे अशाच अहंकाराची वागणूक दिसून येते. मात्र सांगितले की, तत्परतेने मान्य करुन यासाठी नम्रतेने त्याच्या पुढे झुकले व त्याचे ऐकून घेतले तर त्याचा अहंकार न जाणवता शालीनतेने हे काम झाले. अशा वृतीच्या व्यक्ती बद्धल सदभावनेची भावना जागृत होते व ती व्यक्ती वंदनीय पूजनीय नमन करण्यायोग्य वाटते. त्याच्यातील साहस आणि विश्वास हाच भव बंधनातील होणार्या कर्माला मिटवतो. ही केवळ त्याच्यातील शालिनता, नम्रततेने घडते. जसे मान्य करणे, झुकणे, व ऐकण्याच्या क्रियेतून अंतर्मनातील शुद्ध सकारात्मक भाव विचार जागृत करणे व या विचाराने त्यातील संघर्षाला टाळून अवघड समस्याला सोडवणे व आपसातील स्नेह संबंध दृढ होणे हे उपहास, आट्टाहास, आणि परिहास याला कर्मबंधनकारक ठरतात. त्याच्याद्वारे कर्म निर्जरा त्याचा क्षय होत नाही.

या क्षणभंगुर जीवनात ध-र्म गुरु- देवाशी जो समर्पित होतो तोच सिद्धता प्राप्त करू शकतो. आणि असाच व्यक्ती इतरांच्या चरणाजवळ झुकला जातो आणि वैरभावाला तो विसरतो. तर अशा वंदनाला जो झिडकारतो तो अहंकार युक्त मदमस्त वाटतो. मात्र प्रगल्भ व्यक्ती मस्तीत मदात न राहता, विनयाने इतरांच्या मनात जागा करतात. त्या आपल्या जीवनात यशस्वी ठरतात. त्याचे उदाहरण त्यांनी गौतम स्वामींचे घेतले. मात्र आपण संवत्सरीच्या महापर्वात सर्व जीवासाठी आलोचना पश्चात प्रतीक्रमणानंतर क्षमा याचना करताना ज्यांच्याशी वैरत्व आहे त्यांची क्षमा याचना दिखाव्याच्या रूपातून करतोत तर यांचा व्याही मंडळीशी दुरान्वयानेही १२ महिने संबंध येत नाही अशाची सर्वप्रथम क्षमा याचना करतोत गुरुची आज्ञा न मानता त्यांची केवळ अनौपचारिकरीत्या दाखवण्याला क्षमा याचना करून त्या क्रियेची अवहेलना करतो मात्र गुरुचे ऐकून क्षमायाचनेणे अतिमुक्त मुनीचे कल्याण झाले हे सांगण्यात ते विसरले नाहीत. जीव हाच परमात्मा आहे. त्या परमात्म्याची क्षमा याचना करण्यात यांना वैशम्य वाटते. मी माफी मागतो हे वाक्य बोलण्यास तीन सेकंद लागतील लिहण्यासाठी सहा सेकंद पुरतील तर हेच वाक्य व्यक्त करण्यास पुढच्या वर्षी संवत्सरी पर्वातील क्षमा याचनेची सकाळ पहावी लागेल.

# आदित्य शिक्षण संस्थेतील आदित्य कृषी अभियांत्रिकी अन्न तंत्र व जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची SBI बँकेमध्ये वर्ग १ अधिकारी म्हणून निवड

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ ऑगस्ट**

येथील आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य कृषी अभियांत्रिकी, अन्न तंत्रज्ञान व जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पुन्हा एकदा यशाची पताका फडकावली आहे. SBI बँकेच्या वर्ग १ अधिकारी पदी ३ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



आदित्य शिक्षण संस्थेतील कृषी अभियांत्रिकीचा शुभम कुरलुपवाड, जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचा राजू खरात आणि अन्न तंत्रज्ञान महाविद्यालयाचा अनिकेत बाभुळगाकर या तीन विद्यार्थ्यांची SBI बँकेमध्ये वर्ग १ अधिकारी म्हणून निवड झाली आहे. आदित्य शिक्षण संस्थेत येणाऱ्या विद्यार्थ्यांना केवळ परीक्षा आणि पुस्तकी ज्ञान न देता विविध उपक्रम राबवून त्यांच्यातील कला गुणांना वाव दिला जातो. त्यामुळेच येथील विद्यार्थी आयुष्याची शिदोरी आणि चांगले संस्कार घेऊन बाहेर पडतात. आज भारतासह परदेशात मोठ-मोठ्या पदावर आदित्य शिक्षण संस्थेचे विद्यार्थी कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा यांच्यासह वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्य तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा, आदित्य कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य अमोल सानप व जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश कचरे अमोल, अन्न तंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा, उपप्राचार्य डॉ. विकास गरजे, उपप्राचार्य अमर सोळंके यांनी अभिनंदन करत पुढील वाटचाली शुभेच्छा दिल्या.

**आदित्य शिक्षण संस्थेत मिळालेल्या मार्गदर्शनामुळे आष्युला कलाटणी मिळाली**

आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयात २०१९ मध्ये पदवी पूर्ण केली. पदवीचे शिक्षण घेत असताना योग्य वेळी योग्य मार्गदर्शन मिळणे गरजचे असते. आदित्य शिक्षण संस्थेत मिळालेल्या मार्गदर्शनामुळे आज आयुष्याला कलाटणी मिळाली. येथील गुरूजन विद्यार्थी घडवण्याचे काम करत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच आम्ही इथपर्यंत पोहचलो असल्याचे मत SBI बँकेमध्ये वर्ग १ अधिकारी म्हणून निवड झालेल्या - शुभम कुरलुपवाड, राजू खरात आणि अनिकेत बाभुळगाकर यांनी व्यक्त केले.

**अभ्यासात सातत्य ठेवा यश नक्की मिळेल- डॉ. आदिती सारडा**

आपल्याला काय व्हायचे ते ठरवले पाहिजे. त्या दिशेने वाटचाल करत अभ्यासात सातत्य ठेवले पाहिजे. शिक्षकांणी केलेले मार्गदर्शन आणि आपल्या करिअरवर लक्ष केंद्रीत केले तर यश नक्कीच मिळते. आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थी गुणवत्तेच्या बळावर यशाची पताका कायम फडकत राहत आहे. त्यामुळे संस्थेसह येथील विद्यार्थ्यांचेही नाव देशाच्या काणाकोपऱ्यात आदराणे घेतले जात आहे.असे प्रतिपादन आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केले.

# श्रावण सोमवार निमित्त मोफत आरोग्य तपासणी शिबिर आणि प्रसाद वाटप

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ ऑगस्ट**



श्रावण सोमवार निमित्त श्री क्षेत्र कंन्कालेश्लर मंदीर परिसरात आलेल्या भाविक भक्तांचे जयदत्त आण्णा क्षीरसागर सामाजिक विचारमंच महिला आघाडी बीड विधानसभा प्रमुख सौ. जयश्री विलास विधाते यांच्या सहकार्याने सोनाजीराव क्षीरसागर होमिपॅथीक वैद्यकिय महाविद्यालय बीडचे डॉ.अरुण भस्मे, डॉ.महेंद्र गौशाल, डॉ.गणेश पांगारकर, डॉ.अंजली पवार यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.अंजली क्षीरसागर, डॉ.अमृता आगवान, डॉ.अनिल राठोड, डॉ.विशेष सरनाईक, डॉ.दिक्षीता घोरपडे, डॉ.संयुक्ता काळे यांच्या टीमने मोफत आरोग्य तपासणी आणि औषध वाटप करण्यात आले यावेळी महिला आघाडीच्या वतीने प्रसाद वाटप करून शुभेच्छा दिल्या. या उपक्रमात नगरसेविका सुशिलाताई नाईकवाडे, भारतीताई क्षीरसागर, यांच्यासह मुख्याध्यापक किर्तीताई पांगारकर प्रा.संगीताताई शिंदे आणि सर्व महिला आघाडी सदस्याचे सहकार्य लाभले.

# सैनीकहो तुमच्यासाठी कार्यक्रमाच्या निमीत्ताने तहसीलदार सचीन देशपांडे यांनी केला माजी सैनीकांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१२ ऑगस्ट**

शनिवार दिनांक १० ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी दहा वाजता तहसील कार्यालयात सैनिक हो तुमच्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तहसीलदार सचीन देशपांडे यांनी या कार्यक्रमात संघर्ष माजी सैनीक संघटनेचे अध्यक्ष शेख अजिमोद्दीन मेजर व उपाध्यक्ष राम मेजर राऊत आणि संघटनेचे सर्व पदाधिकारी व सदस्य गण यांचा सत्कारकेला.यावेळी माजी सैनीक उपस्थित होते. सर्व माजी सैनिकांना गुलाब पुष्प देऊन गौरविण्यात आले आणि माजी सैनीकांच्या समस्या जाणून घेण्याचा व त्यावर उपाय योजना करण्यात येतील असे आश्वासन दिले. संघटनेचे उपाध्यक्ष राम मेजर राऊत यांनी माजी सैनीकांच्या व्यक्तीगत काही समस्या त्यांच्यासमोर माडल्या त्या समस्येचे निराकरण तहसीलदार सचीन



देशपांडे यांनी केले. राम राऊत मेजर यांनी सामुहिक अडचणी मांडताना सैनिकांना महाराष्ट्र शासनाच्या सवलतीमध्ये त्यांना त्यांचा लाभ द्यावा अशी मागणी केली उदा.विंधन विहिरी, घरकुल,रेशन मालाचा पुरवठा या सुविधा मध्ये माजी सैनिकांना देखील त्याचा लाभ द्यावा कारण देश सेवा करून वापस आल्यास प्रत्येकाला रोजगार उपलब्ध नाही त्यामुळे शेती व शेतीपूरक व्यवसाय करण्यासाठी या योजनाचा त्यांना फायदा होईल असे सांगितले. तसेच पुढे राम राऊत मेजर यांनी तहसीलदार यांना विनंती केली की, तालुका पातळीवर असलेल्या सरकारी कार्यालयामध्ये माजी सैनीकास सन्मानपुर्वक वागणुक द्यावी व अशा आशयाचा फलक त्या कार्यालयासमोर लावावा अशी मागणी केली आहे. माजी सैनीकांच्या वतीने शेख अजिमोद्दीन ईनामदार मेजर यांनी आभार मानले.

# संस्था विचारधारा जोपासत पुढे जाण्याची प्रत्येकाची जबाबदारी - हरिशभाऊ कुलकर्णी

## भाशिप्रच्या वार्षिक सभेचे अंबाजोगाईत आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१२ ऑगस्ट**

भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दिनांक ११ ऑगस्ट रोजी अतिशय खेळीमेळीच्या आनंददायी वातावरणात संपन्न झाली. स्वयंवर मंगल कार्यालयात आयोजित महासभेसाठी संस्था सभासदांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होती. दरम्यान ७५ वर्षे आयुष्य असलेल्या संस्थेचा इतिहास मागे वळून पाहिल्यानंतर वर्तमानस्थित काळात पुढे घेवून जाणार्यांनी विचारधारा व्रत समजून काम करण्याची गरज वाटते. मिशनरी कार्यकर्ते यासाठी महत्वाचा घटक असुन सेवाभाव आणि समर्पण गरजेचे वाटते. पोट भरण्यासाठी संस्थेचा वापर केला जावु शकत नाही. मुळ विचारधारा न सोडता उत्तम नागरिक सर्वांग परी घडविण्याचं पुण्यकर्म संस्थेच्या माध्यमातून होतं. सामुहिक निर्णयाच्या आधारावर ७५ वर्षांची आदर्श परंपरा सद्यस्थितीत सुव्यवस्थित चालत असल्याचे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघ प्रांत कार्यकारिणी सदस्य हरिशभाऊ कुलकर्णी यांनी केले. ते महासभेच्या समारोप प्रसंगी बोलत होते.

महासभेच्या प्रारंभी प्रतिमापुजन, वैयक्तिक पद्य, मान्यवरांचा सन्मान झाल्यानंतर या सभेत बीडच्या पुर्णवादी बँकेच्या चेअरमनपदी डॉ.सुभाष जोशी तर बाटुच्या कार्यकारिणीवर शासनातर्फे सदस्य म्हणुन निवड झालेले संस्था संचालक प्रविण सरदेशमुख आणि विद्यावाचस्पती पदवी मिळवणारे मुख्याध्यापक सोनवणे गुरूजी यांचा सत्कार करण्यात आला. वार्षिक अहवाल वाचनाने संस्था कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य यांनी महासभेला सुरूवात केली. यात ॲड.रोहित सर्वज्ञ, राम कुलकर्णी यांनी मांडलेले ठराव सर्वानुमते ओमच्या जयघोषात सहमत करण्यात आले. डॉ.हेमंत वैद्य यांनी आपल्यावर जबाबदारी आल्यानंतर पारदर्शक कारभार सहज संवाद, सामुहिक निर्णय या




प्रक्रियेतून आपण मार्गक्रमण करीत असून सभासद सहकार्यांच्या पाठिंब्यावर जबाबदारी सक्षम पुर्ण करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे त्यांनी सांगितले. अध्यक्ष म्हणून या सभेत डॉ.सुरेंद्र आलुरकरांनी सभासदांना आश्वासित करताना या संस्थेचा लौकिक आणि त्या मागे कार्यकर्ता यांनी घेतलेले परिश्रम महत्वाचे असून परिवर्तनाच्या दिशेने जाताना गुणवत्ता आणि व्यवस्थापनात होणारे बदल शिवाय सर्वांच्या सहकार्याने संस्था पुढे घेवून जात असल्याचे सांगितले. राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचा त्रिशताब्दी महोत्सव संस्थेच्या अजेंड्यावर असून विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. संस्था अमृत महोत्सवी वर्षांत देखील अनेक उपक्रमांचे आयोजन केल्याचे ते म्हणाले. महासभेच्या समारोप भाषणात हरिशभाऊ कुलकर्णी यांनी मोजक्या शब्दांत दिशादर्शक मार्गदर्शन केले. आपल्या परंपरा, उद्दिष्ट, ध्येय धोरण विषयाची उजळणी करण्यासाठीच आपण अशा निमित्ताने एकत्रित येतो. सुमारे तीनशे वर्षांपुर्वी राजमाता अहिल्यादेवीं सारख्या कर्तृत्ववान महिलेने आपल्या देशात सुशासन देताना दाखवून दिलेला सामाजिक दायित्वाचा आदर्श घेण्यासारखा असून कौटुंबिक संघर्ष करताना त्यांनी राष्ट्र आणि राज्य संकल्पना मांडली. ज्यातुन अस्मिता भाव निर्माण झाला. आपली संस्था अमृत महोत्सवात प्रवेश करीत असुन सामुहिक निर्णयाच्या आधारावर आजतागायत झालेली यशस्वी वाटचाल खर्या अर्थाने सामाजिक विश्वास पुर्णतेकडे गेल्याचे समाधान वाटते. मुळ विचारधारा न सोडल्याने रूढी, परंपरा, आदर्श वर्षांनुवर्षे चालत आले. कुठलेही सामाजिक कार्य करताना सेवाभाव, मिशनरी अंगिकारूनच करायला हवा. चाळीस हजार मुलं घडविणारी ही संस्था राष्ट्रभक्तीचे संस्कार देवून जाते. याचाच अर्थ सक्षम पिढी घडविण्याचं पुण्यकर्म आपण करतो. काळाचे बदल स्विकारायला हवे. पण, मुळ विचारधारा न सोडता पुढे जाणे महत्वाचे वाटते. संचालक अमरनाथ खुर्पे आणि शैलेष कंगळे यांनी सुत्रसंचालन केले. महासभेची सांगता कल्याण मंत्राने झाली. महासभेसाठी संयोजकांनी सर्व व्यवस्था चांगल्या केल्याचे कौतुक उपस्थित सभासद बांधवांनी केले. स्थानिक अध्यक्ष, कार्यवाह यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक, कार्यकर्ते व पदाधिकार्यांनी सभा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेच्या वर्धापन दिनी शेकडो कार्यकर्त्यांचा होणार जाहीर प्रवेश-विजय साळवे

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१२ ऑगस्ट**



स्वाभिमान सेनेचा पहिला वर्धापन १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिनी साजरा करण्यात येणार आहे. प्रसंगी शेकडो कार्यकर्ते संघटणेत प्रवेश करणार असुन या सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संस्थापक अध्यक्ष विजय साळवे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

दिनांक ११ ऑगस्ट रोजी शहरातील व्यंकटेश हॉटेल मध्ये स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेचे कोअर कमिटी सदस्य चंद्रकांत टाकणखार यांच्या अध्यक्षते खाली प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक संपन्न झाली असता स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेचे संस्थापक अध्यक्ष विजय साळवे यांनी सांगितले की दिनांक १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिनी स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेचा पहिला वर्धापन दिन हॉटेल व्यंकटेश येथे साजरा करण्यात येणार आहे प्रसंगी तालुक्यातील शेकडो कार्यकर्ते संघटनेत जाहीर प्रवेश करणार आहेत. तसेच शहर कार्यकारिणीची निवड करण्यात येणार आहे.

या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून आरपीआयचे अध्यक्ष दिनेश हानवते , उद्योजक तथा संस्थापक विजयकुमार वाव्हळ , मराठा आरक्षण संघर्ष समितीचे नेते ऋषिकेश बेदरे , उद्योजक सोमनाथ चांदमारे यांची उपस्थिती राहणार आसल्याचे विजय साळवे यांनी सांगितले आहे या वेळी कोअर कमिटी सदस्य बी.जी. शिंदे , अंजेराम घनघाव, वशिष्ठ लांडगे , विशाल ससाने , भास्कर पौळ , धम्मानंद गावडे , सय्यद अनवर , गंगाधर सोनपसारे , वैजनाथ गडसिंग , राजु मोरे , सुग्रीव शिंगाडे , सय्यद नाजेर , शेख अर्शद , आनंद साळवे , गौतम सोनपसारे , गणेश ढगे , सय्यद अकबर , उत्तम सोनपसारे यांची उपस्थिती होती.

या वैभवशाली सोहळ्या निमित्त भिम गितांचा जंगी कार्यक्रम होणार असून तालूक्यातील सर्व भिम सैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आव्हाण संघटणेच्या वतीने करण्यात आले आहे.

# जिल्ह्यात घरोघरी तिरंगा अभियान व्यापक प्रमाणावर राबवा– जिल्हाधिकारी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ ऑगस्ट**

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव देशात आणि राज्यात साजरा करण्यात येत असून या कालावधीत पंतप्रधान तसेच मुख्यमंत्री यांच्या नेतृत्वात घरोघरी तिरंगा देशव्यापी अभियान राबवण्यात येत आहे. दि १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान व्यापक प्रमाणावर उत्साहात घरोघरी तिरंगा अभियान राबवण्याचा सूचना जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी यांनी बैठकीत दिल्या.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी महाडीक, प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, मुख्याधिकारी अरविंद मुंढे, जिल्हा माहीती अधिकारी प्रभाकर बारहाते यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी जिल्हाधिकारी परदेशी यांनी सांगितले की, घरोघरी तिरंगा अभियानात सर्वांनी सहभागी व्हावे, प्रत्येक घरापर्यंत तिरंगा पोहचवून अभियान यशस्वी करावे. घरोघरी तिरंगा अभियान राष्ट्रभक्ती चेतवणारे अभियान असून या कालावधीत प्रत्येक दिवशी रॅलीसह मॅरेथॉन, सांस्कृतिक कार्यक्रमांसह अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये तिरंगा यात्रा, तिरंगा रॅलीज, तिरंगा सांस्कृतिक कार्यक्रम, तिरंगा कॅन्व्हास, तिरंगा प्रतिज्ञा, तिरंगा सेल्फिज, तिरंगा ट्रीब्युट, तिरंगा मेळा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी पुढे बोलतांना परदेशी म्हणाले की, हर घर तिरंगा उपक्रमांतर्गत जिल्ह्यात १ लाख ७९ हजार ८४१ इतकी कुटूंब संख्या असून १ लाख २७ हजार ३८९ इतके तिरंगा राष्ट्रध्वज उपलब्ध आहेत. ५३ हजार ९५२ राष्ट्रध्वजांची मागणी ग्रामपंचायतींनी शासनमान्य पुरवठादारांकडे केली आहे. यामध्ये वसमत नगरपरिषदेने १ हजार, कळमनुरी नगर परिषदेने ५०० राष्ट्रध्वजाची मागणी केली आहे. सेनगाव नगर पंचायतीकडे मागील वर्षाचे १ हजार राष्ट्रध्वज शिल्लक आहेत. हिंगोली नगर परिषदेकडे मागील वर्षाचे २५०० तर औंढा नगर पंचायतीकडे मागील वर्षीचे १ हजार राष्ट्रध्वज शिल्लक असल्यामुळे त्यांचीही मागणी नाही. घरोघरी तिरंगा माहीमेत १५ ऑगस्टपर्यंत विविध कार्यक्रम, उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. प्रत्येक गाव, शहरामध्ये राष्ट्रध्वज उपलब्ध व्हावा यासाठी पोस्ट ऑफिस, खादी ग्रामोद्योग, खाजगी आस्थापना, महिला बचतगट, स्वयंसेवी संस्थांची मदत घेतली जात आहे. जिल्हा, शहरातील महत्वाच्या शासकीय इमारतीवर तिरंगा रोषणाई करण्यात येत आहे.

सदर अभियान जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी, मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार, प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अनंतकुमार कुंभार, संजय कुलकर्णी, गणेश वाघ आणि नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणार आहे.

# अवैध दारू विक्री करणाऱ्या २९ ठिकाणी पोलिसांचे छापे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ ऑगस्ट**

प्रभारी पोलिस अधीक्षक अर्चना पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाभरात पोलिस विभागाच्यावतीने विशेष अभियान राबवून अवैध दारू तयार करणारे तसेच विक्री करणाऱ्या २९ ठिकाणी पोलिसांनी छापे मारले. यावेळी १८ हजार अवैध दारू जप्त करण्यात आली.

जिल्ह्यात शहरासह ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर हातभट्टी दारूचे अड्डे तसेच देशी दारू अवैधपणे देशी दारूची विक्री करण्यात येत असल्याची माहीती पोलिसांना मिळाल्यानंतर प्रभारी पोलिस अधीक्षक अर्चना पाटील यांच्या नेतृत्वात जिल्ह्यात २९ ठिकाणी एकाच दिवशी अवैध दारू निर्मिती करणारे तसेच अवैध दारू विक्री करणाऱ्यांवर पोलिसांनी कार्यवाही केली. त्यामध्ये हिंगोलीत एका ठिकाणी ३६०० रूपयांची अवैध दारू जप्त करण्यात आली. बासंबा पोलिस ठाण्यांतर्गत २ ठिकाणी छापे मारून ५९५०, हिंगोली ग्रामीण पोलिस ठाणे हद्दीत तीन ठिकाणी छापे मारून ३७८० रूपयांची अवैध दारू जप्त करण्यात आली. औंढा पोलिस ठाण्यांतर्गत तीन ठिकाणी, गोरेगाव पोलिस ठाण्यांतर्गत दोन ठिकाणी, नर्सी पोलिस ठाणेअंतर्गत एका ठिकाणी, वसमत शहर आणि ग्रामीण पोलिस ठाण्यांतर्गत प्रत्येकी दोन ठिकाणी, हट्टा पोलिस ठाण्यांतर्गत एका ठिकाणी, आखाडा बाळापूर पोलिस ठाण्यांतर्गत दोन ठिकाणी, कुरूंदा पोलीस ठाण्यांतर्गत चार ठिकाणी अवैध दारू निर्मिती करणाऱ्या तसेच अवैध दारू विक्री करणाऱ्यांवर छापे मारण्यात आले. या छाप्यात पोलिसांनी तब्बल १३३ लिटर हातभट्टी दारू साठा नष्ट केला. तसेच सडके रसायन १२७५, देशी व विदेशी दारूचा साठा जप्त केला आहे. या कारवाईत १ लाख १८ हजार ९२० रूपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. या मोहीमेत एक उपविभागीय पोलिस अधिकारी, संबंधित ठाण्याचे १३ प्रभारी अधिकारी, ५ स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी, ११७ पोलिस अंमलदार यांनी कामगिरी बजावली.

# हिंगोली नगर परिषदेच्यावतीने शहरात तिरंगा रॅली



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ ऑगस्ट**

हिंगोली नगरपरिषदेच्यावतीने सोमवार दि १२ ऑगस्ट रोजी सकाळी आठ वाजता तिरंगा रॅलीचे आयोजन मुख्याधिकारी अरविंद मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील प्रमुख मार्गावरून तिरंगा रॅली काढण्यात आली.

हिंगोली नगरपरिषद आणि योग विद्याधाम शाखा हिंगोलीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसर येथून तिरंगा रॅली काढण्यात आली. यावेळी नगरपरिषदेचे सर्व अधिकारी, कर्मचारी, योग विद्याधामचे साधक, तसेच शहरातील नागरिक उपस्थित होते. १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट दरम्यान तिरंगा ध्वज हा नागरिकांनी आपल्या घरावर राष्ट्रध्वज फडकवायचा आहे. त्या अनुषंगाने ही तिरंगा रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे आखरे मेडिकल जवाहर रोड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, महात्मा गांधी चौक याठिकाणी तिरंगा रॅलीचा समारोप करण्यात आला. यावेळी उपमुख्याधिकारी उमेश हेंबाडे, पोलीस निरीक्षक नरेंद्र पाडळकर, स्वच्छता निरिक्षक बाळू भाऊ बांगर, आशिष रणशिंगे, अभियंता काकडे, देविसिंग ठाकूर, अनिकेत नाईक, पंडित मस्के यांच्यासह मोठ्या संख्येने कर्मचारी व नागरिक सहभागी झाले होते.



**हिंगोली– ओमप्रकाश देवडा पिपल्स को ऑप बँकेची रविवारी सर्वसाधारण सभा घेण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी बँकेचे अध्यक्ष प्रकाशचंद सोनी तर प्रमुख पाहुणे म्हणून उपाध्यक्ष सुनील देवडा यांच्यासह संचालक मंडळ, बँकेचे सदस्य, ग्राहक, व्यापारी यांची उपस्थिती होती. छाया– विजय गुंडेकर**

# पुसेगाव येथील ग्रामसेवकाची चौकशी करण्यासाठी समिती गठीत

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ ऑगस्ट**



पुसेगाव ग्रामपंचायतमार्फत राबवण्यात आलेल्या १५ वित्त आयोगातून स्वच्छ भारत अभियानांतर्गत सांडपाणी व्यवस्थापनाचे कामात लाखोंचा भ्रष्टाचार करून काम न करता परस्पर निधी उचल केल्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात आले होते. या उपोषणाची दखल घेत सेनगावचे गटविकास अधिकारी भोजे यांनी उपोषणार्थींना भेट देत त्यांच्या मागण्या ऐकून या प्रकरणातील ग्रामसेवकाची करून चौकशी अहवाल १० दिवसांत सादर करण्यात येणार असून या प्रकरणातील दोषींवर कार्यवाहीचे आश्वासन दिले आहे. दि ९ ऑगस्ट पासून उपोषणकर्ते मोहमद रिजवान मोहमद नूर तांबोली यांच्यासह गावकरी उपोषणाला बसले होते.

## संक्षिप्त वृत्त

### दूध उत्पादक शेतकरी रामेश्वर मांडगे यांना स्वातंत्र्यदिनी दिल्लीचे आमंत्रण



हिंगोली– तालुक्यातील बेलवाडी गावचे दुग्ध उत्पादक शेतकरी श्री रामेश्वरराव किसनराव मांडगे व कलावती रामेश्वर मांडगे यांना सपत्नीक स्वातंत्र्यदिनानिमित्त दिल्ली येथे ध्वजारोहणाच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने आमंत्रण मिळाले आहे. हिंगोली तालुक्यातील बेलवाडी या छोट्या गावांमधील दुधाचा व्यवसाय करणारे तसेच राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त असलेले शेतकरी रामेश्वरराव मांडगे यांना स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण समारंभासाठी दिल्लीतील लाल किल्ल्यावर होणाऱ्या ध्वजारोहण कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याचे आमंत्रण मिळाले असून दिल्ली येथील ध्वजारोहणाच्या कार्यक्रमाला रामेश्वरराव किसनराव मांडगे व कलावती रामेश्वर मांडगे हे स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित विविध कार्यक्रमात सहभागी होणार असल्याचे मांडगे यांनी सांगितले. तालुक्यातील एका दुग्ध उत्पादक शेतकऱ्याला हा मान मिळाला असल्याने त्यांचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

### नागनाथ देवस्थानचे पूजारी मनोहर भोपी यांचे निधन



औंढा नागनाथ– नागनाथ देवस्थानचे मुख्यपुजारी मनोहर दत्तात्रय भोपी वय ७२ वर्ष यांचे अल्पशा आजाराने १० ऑगस्ट रोज शनिवार सकाळी १०वा. त्यांच्या राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली नातवंडे असा परिवार आहे. औंढा नागनाथ येथील वैकुंठ भूमी मध्ये सायंकाळी ५वा.त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

### भाजपकडून शासकीय योजनांची निशुल्क नोंदणी

हिंगोली– भारतीय जनता पक्षाच्यावतीने राज्य शासनाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांची नोंदणी निशुल्क नोंदणीसाठी कार्यालयाची स्थापना करण्यात आली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना, मुख्यमंत्री वयोश्री योजना, इमारत बांधकाम कामगार कल्याण योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनामध्ये नोंदणी करण्यासाठी आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्या मार्गदर्शनात हनुमान मंदिर, विठ्ठल रूखमाई मंदिर याठिकाणी कार्यालयाची स्थापना करण्यात आली आहे. या योजनेत सहभागी होणाऱ्या महिला तसेच लाभार्थ्यांना आवश्यक कागदपत्रासह कार्यालयात येऊन नोंदणी करण्याचे आवाहन आशीष जैस्वाल, सुधर पोफळाईतकर यांनी केली आहे.

# औंढ्यात एक हात मदतीचा दिव्यांगांच्या कल्याणाचा कार्यक्रमाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, १२ ऑगस्ट**



येथील तहसील कार्यालयात सोमवारी एक हात मदतीचा दिव्यांगांच्या कल्याणाचा हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. महसूल पंधरवडा कार्यक्रमांतर्गत दिव्यांग लाभार्थी यांचेसाठी विविध योजनेबाबत लागणारे कागदपत्रे बाबतीत माहिति दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नायब तहसीलदार वैजनाथ भालेराव यांची तर प्रमुख अतिथी म्हणून नायब तहसीलदार श्रीमती अनिता कोलगणे श्रीमती लता लाखाडे तसेच समाज कल्याण अधिकारी विभागाचे झगडे, सवडकर, पाईकराव, झूमाटे, राणे, दळवी, वंजारे यांची उपस्थिती होती. त्यांनी दिव्यांगाच्या कल्याणासाठी योजनांची माहिती दिली. सदर कार्यक्रम यशस्वीतेसाठी लिपिक शेख हमीद संजय पाटील, महेश हिवरे मल्हारी क्षीरसागर, आपरेटर संतोष पोले, कदम यांनी परिश्रम घेतले. आभार शरद नाईकनवरे यांनी व्यक्त केले. सदरिल कार्यक्रमात ८५ दिव्यांग लाभार्थी व्यक्ती उपस्थित होते.

# पोलिस महासंचालकांना सकल मराठा समाजाचे शिष्टमंडळ भेटणार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ ऑगस्ट**



सकल मराठा समाजाची जिल्हास्तरीय बैठक संपन्न झाली. या बैठकीत नांदेड येथील पोलीस महासंचालकाना असोला ( ढोबळे) गोळीबार प्रकरणी कारवाईसाठी शिष्टमंडळ भेटणार असल्याचा निर्णय झाला. याचबरोबर बैठकीत विविध ठराव सर्व समितीने पारित करण्यात आले.

हिंगोली येथील शासकीय विश्रामगृहात रविवार दि. ११ ऑगस्ट रोजी सकल मराठा समाज जिल्हास्तरीय बैठक संपन्न झाली. या बैठकीत औंढा नागनाथ तालुक्यातील असोला (ढोबळे) येथील गोळीबार प्रकरणी पोलिसांनी केलेली कारवाई या संदर्भात माहिती देण्यात आली. मुख्यमंत्री व पोलीस महानिरीक्षक यांच्याकडे गोळीबार प्रकरणातील मागण्याची पूर्तता अद्याप झाली नाही. यामुळे मराठा बांधवात तीव्र नाराजी बैठकीत व्यक्त केली. तत्कालीन एपीआय बोराटे व जमादार सांगळे यांचा चौकशी अहवाल तातडीने दाखल करून त्वरित निलंबित करण्यात यावे, जिल्ह्यातील अवैध धंदे बंद करणे, गोळीबारात जखमी मारुती पावडे यांना शासनाने ५० लक्ष रुपयाची आर्थिक मदत यासह इतर मागण्या पूर्तता झाली नसल्याची खंत बैठकीत उपस्थित मराठा बांधवांनी व्यक्त केली. नांदेड येथील पोलीस महानिरीक्षकांना येत्या दि. १६ ऑगस्ट रोजी शिष्टमंडळासहआंदोलनाचे निवेदन देण्याचे सर्वानुमते ठरले. मागण्याची पूर्तता न झाल्यास सात दिवसानंतर जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस ठाण्याच्या समोर संविधानिक पद्धतीने भजन आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला. मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या आदेशाने कळमनुरी विधानसभा मतदारसंघात गाव पातळीवर संपर्क अभियान राबविण्याचा कृती कार्यक्रम हाती घेण्याची नियोजन करण्यात आले. ओबीसीतूनमराठाआरक्षण बलिदान दिलेल्या कुटुंबीयांच्या मदतीसाठी पाठपुरावा करण्याचे तसेच गुंडा ता. वसमत येथील एकनाथ चव्हाण व गोळीबारात जखमी मारुती पावडे यांच्या कुटुंबियांना तातडीची मदतीचा हात देण्यात येणार आहे, यासाठी एक स्वतंत्र समिति नियुक्त करून बाळासाहेब बोंगाणे यांच्याकडे जबाबदारीदेण्यातआली. बैठकीत विविध विषयावर चर्चा करून सर्व समितीने निर्णय घेण्यात आले. बैठकीला जिल्ह्यातील पाचही तालुक्यातील मराठा बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वातंत्र्य दिनानिमित्त भव्य चित्रकला रंगभरण स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ ऑगस्ट**

स्मृतीशेष ॲड ग्यानबाराव शिरसाट सेवाभावी संस्थेच्या राजे संभाजी कनिष्ठ महाविद्यालय हिंगोली येथे चित्रकला रंग भरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून संस्थेचे सचिव पंडित शिरसाट तर प्रमुख पाहुणे सुरेश सोनुने, असोले, उपाध्यक्ष संजय गेहेरवार, संचालक घुगे, पंडीत अवचार, प्राचार्य शेळके यु एस, मुख्याध्यापक डोलारे एस के. यांची उपस्थिती होती. सर्व मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रमाता जिजाऊ व राजे संभाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दिप प्रज्वलन करून स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. या स्पर्धेसाठी आदर्श माध्यमिक विद्यालय एकूण ९३ विद्यार्थी ,सत्यनारायण विद्या मंदिर ८३ विद्यार्थी, बियाणे इंटरनॅशनल स्कूल २१७ विद्यार्थी, जेके इंटरनॅशनल स्कूल १७० विद्यार्थी, सरस्वती विद्यामंदिर ५१ विद्यार्थी शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विद्यालय ८२ विद्यार्थी, नारायणा इंग्लिश स्कूल ८१ विद्यार्थी, एबीएम इंग्लिश स्कूल २६ विद्यार्थी, मानिक स्मारक माध्यमिक विद्यालय २२ विद्यार्थी राष्ट्रमाता जिजाऊ विद्यानिकेतन १७८ विद्यार्थी तसेच ३१ विद्यार्थी वैयक्तिकरित्या सहभाग नोंदविला आहे या स्पर्धेला एकूण १०३४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता अशा रीतीने भव्य अशी चित्रकला रंगभरण स्पर्धा यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील प्रा. सौ .भट, प्रा.जाधव, प्रा, डोलारे, प्रा. शिरसाट यांच्यासह शिक्षक–शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# नाना पाटोलेंची वक्तव्ये म्हणजे वैचारिक दिवाळखोरी : खा. अशोक चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,१२ ऑगस्ट -**

नांदेड आणि मराठवाड्याला १२ फेब्रुवारीला स्वातंत्र्य मिळाले असे वक्तव्य नाना पटोले यांनी काँग्रेसच्या मेळाव्यात केले. स्वातंत्र्याची तुलना राजकीय घटनेशी करणे ही नाना पटोले यांची वैचारिक दिवाळखोरी असल्याची टीका खा. अशोक चव्हाण यांनी केली.

रविवारी नांदेड येथे काँग्रेसचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. परंतु या मेळाव्यात केवळ अशोक चव्हाणांवरच टीका करण्यात आली. त्यामुळे हा मेळावा काँग्रेसच्या संघटनात्मक बांधणीसाठी होता की, व्यक्तिगत आकस आणि द्वेष करण्यासाठी असा प्रश्न खा. अशोक चव्हाण यांनी यावेळी उपस्थित केला. राज्यात महायुती सरकार योग्य प्रकारे काम करत आहे. लाडकी बहीण योजनेसह अन्य दहा ते बारा योजना सुरू असून लाडकी बहीण योजनेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. परंतु काँग्रेसकडून या योजनेबाबत संशयास्पद वातावरण निर्माण करण्यात येत आहे. योजना जाहीर झाल्यापासून विरोधक या योजनेला सावत्रपणाची भूमिका देत आहेत. लोकसभा निवडणुकीत संविधानाबाबतीत फेक नॅरेटीव्ह पसरवून जागा पदरात पाडून घेतल्या. विधानसभा निवडणुकीतही पुन्हा तोच



पॅटर्न राबवण्याची तयारी काँग्रेसची आहे. परंतु या खोट्या प्रचाराला जनतेने बळी पडू नये असे आवाहन खासदार अशोक चव्हाण यांनी यावेळी केले. राज्यात दीड कोटी महिलांनी लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज केले आहेत. नांदेड जिल्ह्यात ४ लाख ७५ हजार अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी ४ लाख ५० हजार अर्ज मान्य झाले. आहेत या योजनेसाठी जवळपास १३५ कोटी रुपये नांदेड जिल्ह्याला मिळतील असा अंदाज आहे. या योजनेला प्रतिसाद मिळत असतानाच नांदेड येथे काँग्रेसच्या मेळाव्यात नाना पटोले यांनी फडतूस वक्तव्ये करून संकुचित राजकारणाचा नमुना दाखवून दिला. १२ फेब्रुवारीला नांदेड, मराठवाड्याला स्वातंत्र्य मिळाले असे वक्तव्य करून स्वातंत्र्याची तुलना थेट राजकीय घटनेशी केली. ही नाना पटोले यांची वैचारिक दिवाळखोरी आहे. २५ जुलै २००९ रोजी नाना पटोलेंनी भाजपामध्ये प्रवेश केला होता. त्यावेळी साकोली मतदारसंघाला स्वातंत्र्य मिळाले होते का? असा प्रश्न उपस्थित करत ११ जानेवारी २०१८ रोजी नाना पटोले भाजप सोडून पुन्हा काँग्रेसमध्ये गेले तो दिवस पारतंत्र्याचा दिवस झाला का? असाही प्रश्न खा. अशोक चव्हाण यांनी उपस्थित केला. लोकसभा निवडणुकीमध्ये अपप्रचार व गैरसमजमुळे नानांच्या नावाने लॉटरी लागली आत्मस्तुतीमध्ये मग्न असलेले नाना पटोले संकुचित राजकारणाचा नमुना दाखवत असून त्यांनी आपण काय बोलतो याचे भान ठेवावे असा सल्लाही खा. अशोक चव्हाण यांनी यावेळी दिला.

या पत्रकार परिषदेत भाजपा जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख, महानगराध्यक्ष डॉ. संतुक हंबर्डे यांची उपस्थिती होती.

# जलसंपदा विभागातील अनुकंपाधारक नोकरीच्या प्रतीक्षेत

**तभा वृत्तसेवा**
**कंधार,११ ऑगस्ट -**

जलसंपदा विभागात मागील अनेक वर्षापासून अनुकंपाधारकांच्या नियुक्ती बाबत निर्णय घेण्यात येत नसल्याने अनुकंपाधारक चिंतेत सापडले आहेत. विशेष म्हणजे यापैकी अनेकांची वयोमर्यादा ओलांडत असल्याने जलसंपदा विभागाने तातडीने नियुकत्या द्याव्यात अशी मागणी होत आहे.

जिल्हा परिषद, महानगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग आदीसह अन्य काही विभागांनी लोकसभा निवडणुकीच्या पूर्वीच अनुकंपा धारकांना नियुक्त्या दिल्या. परंतु जलसंपदा विभाग मात्र २० टक्क्याचे धोरण पुढे करत या नियुक्त्या देण्यास टाळाटाळ करत असल्याची तक्रार अनुकंपाधारकांनी केली आहे. विशेष म्हणजे जलसंपदा विभागात अनेक जागा रिक्त असताना अनुकंपाधारकांना नियुक्तत्या देण्यास टाळाटाळ का करण्यात येत आहे असाही प्रश्न अनुकंपाधारकांनी उपस्थित केला आहे. अनेक अनुकंपाधारकांच्या वयोमर्यादा उलटत असल्याने जलसंपदा विभागाने तातडीने नियुक्त्या द्याव्यात अन्यथा आक्रमक पवित्रा घेण्याचा इशारा अनुकंपाधारकांनी दिला आहे.

## संक्षिप्त वृत्त

### भाजपच्या जिल्हासचिव पदी काशिनाथ पाटील शिंदे यांची निवड

**इस्लापूर** -भाजपचे जेष्ठ नेते काशिनाथ पाटील शिंदे यांची भाजपच्या जिल्हासचिव पदी निवड करण्यात आली आहे. भाजपचे जिल्हाध्यक्ष अँड. किशोर देशमुख यांनी शिंदे यांच्या नियुक्तीचे पत्र काढले असून आमदार भिमराव केराम यांच्या हस्ते काशिनाथ पाटील शिंदे यांना नियुक्तीचे पत्र नुकतेच देण्यात आले आहे. काशिनाथ पाटील शिंदे हे माजी मंत्री डि. बी. पाटील यांचे अतिशय जवळचे मानले जातात. भाजपचे काम गेल्या अनेक वर्षांपासून ते निष्ठेने करतात. इस्लापूर सर्कल च्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीत त्यांनी पक्षाला चांगले दिवस प्राप्त करून दिले आहेत. माजी मंत्री डि. बी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली इस्लापूर ग्रामपंचायतीवर भाजपाचे वर्चस्व कायम ठेवण्यासाठी शिंदे यांचा महत्वाचा वाटा आहे. पक्षाशी बांधलेली नाळ त्यांनी कधीच तुटू दिली नाही, पक्ष श्रेष्ठीने काशिनाथ पाटील शिंदे यांच्या कार्याची व निष्ठेची दखल घेऊन सलग दोन वेळेस जिल्हासचिव पदाची संधी दिली होती. आता तिसऱ्यांदा पक्षाने संधी दिली आहे. अखेर निष्ठावंत कार्यकर्त्याला न्या मिळाल्याची भावना व्यक्त होत असून विधान सभेच्या निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर शिंदे यांची निवड महत्त्वपूर्ण मानली जात आहे. नूतन जिल्हासचिव शिंदे आपल्या मनोगतात म्हणाले की, माजी मंत्री डि. बी. पाटील, आमदार भिमराव केरम व जिल्हाध्यक्ष अँड. किशोर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाची विचारधारा तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचत राहणार असून, पक्षाने मला तिसऱ्यांदा संधी देऊन जिल्हासचिव म्हणून काम करण्याची संधी दिली. त्या संधीचे सोने करण्यासाठी मी कुठेही कमी पडणार नाही. असे काशिनाथ शिंदे यांनी सांगीतले. शिंदे यांच्या निवडीबद्दल किनवट विधान सभा प्रमूख बाबुराव केंद्रे, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, गोविंद अंकूरवाड, कपिल करेवाड, विवेक केंद्रे, विष्णू दराडे, शेखर चिंचोलकर, सागर पिसारीवार, विकास माहूरकर, लतीफ शेख, विकास डुकरे, गणपत कुरूडे यांच्यासह त्यांच्या मित्रमंडातून अभिनंदन व पुढील कार्यासाठी सुभेच्छा दिल्या आहेत.

### पिंपाळकोठा (म) येथे प्रथमच वर्षावास निमित्त धम्म ग्रंथाचे वाचन

**मुदखेड**-मुदखेड तालुक्यातील मौजे पिंपळकौठा (म) येथे प्रथमच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी यांच्या जीवनातील शेवटच्या काळात लिखान केलेला पवित्र ग्रंथ भगवान बुध्द आणि त्यांचा धम्म या ग्रंथाचे वाचन वर्षावास निमित् सुरू करण्यात आले. दररोज सायंकाळी ठिक आठ वाजता त्रिसरण पंचशिल बुध्द वंदना झाल्यानंतर लगेचच ग्रंथाचे वाचनास सुरुवात होत आहे. यावेळी बुद्ध ग्रंथाचे वाचन कविता मनोज पवळे करीत असुन सुचक म्हणून मनोज मारोती पवळे करीत आहेत. मनोज पवळे यांनी सविस्तर व सोप्या भाषेत उपासक उपासिकांना समजाऊन सांगत आहेत. या दोघांच्या मधुर वाणीतून बुद्ध ग्रंथाचे वाचन करीत असताना तेथील उपासक उपासिका बालक बालिका यांच्या कानावर ग्रंथाचे शब्द पडताच मंत्रमुग्ध होत आहेत. यावेळी मुदखेड येथिल भदंत गगन बोधी नी भेट दिली व समस्त बौध्द उपासक उपासिका यांना प्रवचन देऊन मार्गदर्शन केले. यावेळी केरबा जोंधळे, राहुल अप्पा चौदंते, प्रभु थोरात,आबाजी दवने, मारोती पवळे, विनोद वंजारे, रविकांत कांबळे, लक्ष्मीबाई वंजारे,द्रोपतताबाई जोंधळे, यासह इतर उपासक उपासिका बालक बालिका उपस्थित होते.

### प्रा. डॉ. संग्राम आंदे यांना दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर

**नांदेड-** मुखेड तालुक्यातील जाब बु येथील रहिवासी तथा महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागातील प्रा डॉ आंदे एस जी यांना २०२४ चा दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल त्यांना या वर्षीचा दादासाहेब फाळके पुरस्कार घोषित करण्यात आला आहे. त्यांना या अगोदर दहा पुरस्कार मिळाले असून सहा आंतरराष्ट्रीय आणि चार राष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. त्यांनी आत्तापर्यंत अनेक ग्रंथाचे लिखाणही केले आहे त्यांचे अग्रलेख ही वृत्तपत्रात प्रकाशित झाले आहेत साहित्य संमेलनात काव्यही सादर केले आहे. आणि त्यांचे अनेक विषयावर प्रभावी लेखन आहे हा पुरस्कार जाहीर झाल्यामुळे महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. बी. अडकीणे, प्रा. डॉ. आहेर, प्राचार्य मस्के, प्राचार्य डॉ. गोरे, परीक्षा नियंत्रक नेटके इत्यादींनी त्यांचे आणि महाविद्यालयीन परिवाराने त्यांचे अभिनंदन व कौतुक केले आहे

### संभाजी धुळगंडे यांची विस्तार अधिकारी पदी पदोन्नती

**लोहा-** पंचायत समिती अंतर्गत माळाकोळी. ग्रामपंचायती चे ग्रामविकास अधिकारी संभाजी. धुळगंडे यांना विस्तार अधिकारी (पंचायत ) म्हणून नुकतीच पदोन्नती होऊन मुखेड येथे बदली झाली आहे. ग्रामसेवक ते ग्रामविकास अधिकारी म्हणून २८ वर्ष सेवा झाली असून स.न.२००० मध्ये आदर्श ग्रामसेवक या पुरस्काराने मुख्य कार्यकारी अधिकारी जि प नांदेड यांच्या हस्ते गौरव करण्यात आले. हागणदारी मुक्त ग्राम अभियानामध्ये मंगरूळ. मुरंबी. बहादरपुरा या तीन गावच्या ग्रामपंचायतीना निर्मल ग्राम पुरस्कार प्राप्त मिळवून दिल्यामुळे देशाचे महामही राष्ट्रपती यांच्या हास्ते प्रधान केला. संभाजी धुळगंडे यांची सर्व सामान्य जनतेशी नाळ जोडलेली असल्यामुळे त्यांना देवा या नावाने ते परिचित आहेत. संभाजी धुळगंडे यांना माजी जि.प.अध्यक्ष संभाजीराव गोविंदराव धुळगंडे यांनी नोकरीला लावले यांचाच आशीर्वाद असल्याचे सांगितले. त्यांची बदली मुखेड पंचायत समिती येथे झाली असल्यामुळे अनेक मित्रमंडळीनी शुभेच्छा दिल्या.

### गोरठा येथिल गणपतराव दांगट यांचे निधन

**उमरी** -तालुक्यातील गोरठा येथिल जेष्ट नागरीक गणपतराव मारोती दांगट यांचे दि ११ ऑगस्ट २०२४ रोजी रोजी सांयकाळी ५ : ०० वाजता वृद्धापकाळाने निधन झाले . मृत्यू समयी त्यांचे वय ९० वर्ष होते . त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली , सुना नातवंड असा मोठा परिवार आहे त्यांचा अंत्यविधी दि १२ ऑगस्ट रोजी दुपारी १ वाजता गोरठा गावीच करण्यात आला . सेवानिवृत मुख्य लिपीक मधुकर दांगट यांचे ते वडिल होत .

# देगलूर- बिलोली राखीव विधानसभा मतदारसंघात सुरेशदादा गायकवाड यांना उमेदवारी देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर,१२ ऑगस्ट -**

आगामी विधानसभा निवडणुकीत नांदेड जिल्ह्यात राखीव असलेल्या बिलोली-देगलूर राखीव विधानसभा मतदारसंघात काँग्रेस पक्षाने आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते सुरेशदादा गायकवाड यांना उमेदवारी द्यावी, अशी एकमुखी मागणी नांदेड येथे झालेल्या सर्वपक्षीय नेत्यांच्या बैठकीत करण्यात आली आहे.

संयोजक कुलदीप चिकाटे यांनी पुढाकार घेऊन विविध पक्ष संघटनेत कार्यरत असलेल्या या नेते आणि पदाधिकाऱ्यांना एकत्रित आणण्याची किमया साधली. नांदेड येथील शासकीय विश्रामगृहात झालेल्या बैठकीत वर्तमान परिस्थितीत आंबेडकरी चळवळ आणि राजकारण दिशाहीन झालेले आहे.



याबाबत गांभीयनि चिंता व्यक्त करण्यात आली. आंबेडकर चळवळीत वाढलेले आणि उदयास आलेले अनेक नेते, पदाधिकारी इतर पक्ष संघटनेत काम करतात, परंतु त्यांना नाही योग्य ते प्रतिनिधित्व मिळत नाही, याबाबत खंत व्यक्त करत आगामी होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीत नांदेड जिल्ह्यातील नऊ विधानसभा सुरेशदादा गायकवाड, नगरसेवक तथा अंगुली सेनेचे रिपब्लिकन हक्क परिषदेचे प्रमुख बाळूभाऊ राऊत, संस्थापक रमेशदादा सोनाळे, आंबेडकरी चळवळीतील नेते गायकवाड, माजी नगरसेवक गवळे, भाजपाचे साहेबराव गायकवाड, रिपब्लिकन सेनेचे संदीप मांजरमकर, प्रभू सावंत,नंदकुमार बनसोडे, सुभाष काटकांबळे, जनार्दन कवडे, रवीगायकवाड, पत्रकार दत्ताहरी धोतरे, संजय नरवाडे, बाबुराव कसबे, भगवान तारू, प्रितम जोंधळे, आर.व्ही. वाघमारे, पद्माकर सोनकांबळे, शीलरत्न चावरे, अशोक कांबळे, अँड. दिगंबर गायकवाड, सचिन आठवले, प्रशांत सोनकांबळे, धम्मा ढवळे यांच्यासह विविध पक्ष संघटनांचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.मतदारसंघांपैकी बिलोली- देगलूर या राखीव विधानसभा मतदारसंघात काँग्रेस पक्षाने बौद्ध उमेदवार म्हणून सुरेशदादा गायकवाड यांना संधी द्यावी, ही मागणी घेऊन काँग्रेसच्या शोर्ष नेतृत्वाशी चर्चा करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. आजपर्यंत बौद्ध समाजाला विधानसभेत प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली माजी नगरसेवक श्रीकांतदादा प्रा. देवीदास मनोहरे, पी.एस. , याला आपलीच दिशाहीनता कारणीभूत असल्याचे चर्चिल्या गेले. अत्यंत महत्त्वपूर्ण ठरलेल्या या बैठकीत आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते सुभाष रायबोले, माजी जि.प. सदस्य साहेबराव धनगे, कुलदीप चिकाटे यांच्यासह अनेकांनी आपले मत व्यक्त केले.

# रस्ता दुरुस्त करा,अन्यथा उपोषण : संजय कुलकर्णी

**तभा वृत्तसेवा**
**उमरी,१२ ऑगस्ट -**



नगर परिषद हद्दीतील बहुतांश रस्ते खड्डेमय झाले असून पाऊसाळ्यात ते खड्डे न ओळखता आल्यामुळे अनेकदा अपघात सदृश्य परिस्थिती निर्माण होते आहे उमरी नगर परिषद प्रशासनाने वेळीच लक्ष देवून शहरातील खड्डेमय रस्ते दुरुस्त करावे अशी मागणीचे निवेदन माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी यांनी मुख्यधिकारी उमरी यांना दिले आहे .

भोकर रोडवरील रेल्वेगेट ते कै. गिरीश भाऊ गोरठेकर सांस्कृतिक सभागृह ह्या रस्त्यावर रापतवारनगर, श्री. महादेव मंदीर, नविन बसस्थानक, सांस्कृतिक सभागृह येतात त्या भागात बाजारपेठ आहे. तो संपूर्ण रस्ता वर्दळीचा असून खड्डेमय झाला आहे. नगर परिषद प्रशासनाचे त्याकडे दुर्लक्ष झाले असून उपरोक्त रस्त्यावरील खड्डे नगर परिषद प्रशासनाने तात्काळ बुजवावेत अन्यथा भारतीय स्वातंत्र्य दिनाचे दिवशी नगर परिषद कार्यालयासमोर उपोषणास बसणे भाग पडेल अशा आशयाचे निवेदन उमरीचे माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी यांनी नगर परिषदेच्या मुख्याधिकारी निलम कांबळे यांना दिले आहे. सदरील निवेदनाच्या प्रति तहसीलदार उमरी आणि पोलिस निरीक्षक, पोलिस स्टेशन उमरी यांना दिल्या आहेत.

# उमरी नगरपरिषदे कडून तिरंगा दौड आणि मॅरेथान स्पर्धेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,१२ ऑगस्ट -**

लोकांच्या हृदयात देशाची भावना जागृत भारतीय राष्ट्रीयध्वजाबद्दल अधिकजागरूकता निर्माण व्हावी यासाठी केंद्र व महाराष्ट्र शासनाच्या निदर्शनानुसार भारतीय स्वातंत्र्यदिनानिमित्त व खारघर तिरंगा या उपक्रमा अंतर्गत उमरी नगर परिषदेच्या वतीने तिरंगा दौड आणि मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे तरी तरी या स्पर्धेमध्ये स्पर्धकांनी जास्तीत जास्तीत जास्त सहभाग नोंदवा असे आव्हान उमरी नगर परिषदेच्या मुख्यअधिकारी निलम कांबळे यांनी केले आहे.

तिरंगा दौड आणि मॅरेथॉन स्पर्धेची माहिती पुढील प्रमाणे अशी की मॅरेथॉन स्पर्धेमध्ये पाच किलोमीटर ध१वणे या स्पर्धेचे प्रथम पारितोषिक सात हजार रुपये द्वितीय पारितोषिक पाच हजार रुपये तृतिय पारितोषिक तीन हजार रुपये प्रथम येणाऱ्या क्रमांक ०४ ते १३ स्पर्धकांना प्रोत्साहन पर आकर्षक चषक देण्यात येईल सहभागी स्पर्धांना प्रमाणपत्र देण्यात येईल

स्पर्धेचे नियम व अटी पुढील प्रमाणे असे आहेत की स्पर्धा नियोजित वेळेनुसार पार पाडली जाईल स्पर्धेमध्ये स्पर्धकाकडून गैरप्रकार आढळल्यास स्पर्धक बाद ठरवण्यात येईल पदकास कोणत्याही प्रकारची दुखापत जीवित हानी झाल्यास आयोजक समिति जबाबदार राहणार नाही पंचांचा निर्णय अंतिम राहील. ज्या स्पर्धकाला या स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवायचा आहे त्यांनी .प्रवेश नोंदणी नगरपरिषद कार्यालय येथे करावी प्रवेश नोंदणी अंतिम दिनांक १३ ऑगस्ट सायंकाळी ५ वाजेपर्यंत राहील.

**प्रवेश विनामूल्य दिल्या जाईल याची स्पर्धकांनी नोंद घ्यावी**

तिरंगा दौड आणि मॅरेथॉन स्पर्धा १४ ऑक्टोंबर रोजी बुधवारी सायंकाळी ६ :३० वाजता सुरुवात होईल ही स्पर्धा मोंढा मैदान परिसरातून स्पर्धेच्या मॅप नुसार ही स्पर्धा संपन्न होईल. तिरंगा दौड आणि मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन उमरी नगर परिषदेच्या नीलम कांबळे मुख्याधिकारी उपविभागीय अधिकारी धर्माबाद तथा प्रशासक नगर परिषद उमरी स्वाती दाभाडे तसेच नगरपरिषद अधिकारी कर्मचारी वृंद यांनी केले आहे.

# सिडको मनपा रुग्णालय येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,१२ ऑगस्ट -**

सिडको येथील मनपाच्या मातृसेवा आरोग्य केंद्र येथे दिनांक १० ऑगस्ट २०२४ रोजी रुग्णाच्या रक्ताच्या तपासणी यामध्ये उच्च रक्तदाब, मधुमेह यासारख्या तपासण्या वैद्यकीय अधिकारी मधुमेह तज्ञ डॉ. संतोष शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मोफत तपासणी करण्यात आली.



नांदेड येथील प्रसिद्ध मधुमेह तज्ञ तथा मनपा सिडको मातृसेवा आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. संतोष शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १० ऑगस्ट २०२४ रोजी सिडको येथील रुग्णांना आरोग्य विषयक विविध तपासण्या करण्यात आल्या यामध्ये मधुमेह, उच्च रक्तदाब यासारख्या तपासणीसाठी जवळपास १२५ रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी २० रुग्णांना रक्तदाबाचा आजार आढळून आला, व २५ रुग्णांमध्ये मधुमेहाचे आजार आढळून आले. सदरील तपासण्या या मोफत शिबिरा मार्फत करण्यात आल्या. यावेळी रुग्णाच्या तपासणीसाठी एका नामांकित फार्मा कंपनीचे एम.आर. रिंकेश गुंडावार व सुधीर मूर्ती यांनी तपासण्याचे प्रात्यक्षिक करून घेतले. सदरील मोफत तपासणी शिबिर हे महिन्यातून दोन वेळा घेण्यात येईल अशी माहिती सिडको मनपा दवाखान्याचे वैद्यकीय अधिकारी डॉ. संतोष शिंदे यांनी दिली यावेळी येथील आरोग्य कर्मचारी परिचारिका पल्लवी मुगटकर, सुरेश अरगुलवार, विष्णुदास गलपवाड, पदरे, राजश्री कराडखेले, सुखदेव जोंधळे यांची उपस्थिती होती.



किनवट: आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने किनवट विधानसभेच्या निवडणूक प्रमुखपदी ओबीसी समाजातील निष्ठावंत नेते बाबुराव केंद्रे यांची नियुक्ती केल्याबद्दल भाजपा ओबीसी आघाडीचे पदाधिकारी तसेच ओबीसी समाजबांधवानी लोकार्पण जनसंपर्क कार्यालयात आमदार भीमराव केराम यांचा शाल श्रीफळ व भव्य पुष्पहार घालून सत्कार केला. या प्रसंगी नागनाथ कराड, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, आत्माराम मुंडे, बालाजी धोत्रे, स्वागत आयनेनीवार,विवेक केंद्रे, शेखर चिंचोलकर, सागर पिसारीवार, रमेश बद्दीवार, लांब, उमाकांत कराळे, शिवा क्यतमवार,राहुल दारगुलवार, सुनील मच्छेवार यांच्यासह ओबीसी आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे न्यायिक आयोगाची स्थापना करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,१२ ऑगस्ट -**

अनुसूचित जाती आरक्षण वर्गीकरणाच्या बाबतीत सन्माननीय सर्वोच्च न्यायालयाने दि. १ ऑगस्ट २०२४ रोजी दिलेल्या निर्णयानुसार अनुसूचित जाती आणि जमाती आरक्षण उपवर्गीकरण करण्याची परवानगी राज्यांना देण्याचा सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय असून या निर्णयाप्रमाणे महाराष्ट्रात अनुसूचित जाती आरक्षणाचे उपवर्गीकरण पद्धत निश्चित करण्यासाठी न्यायिक आयोग नियुक्त होणे आवश्यक आहे.

मातंग समाजाच्या जिव्हाळ्याच्या मागण्यांबाबत सकल मातंग समाज समन्वयक व विविध संघटना यांनी वेळोवेळी केलेल्या आंदोलनाची व विनंतीची तसेच पाठपुराव्याची दखल घेत, मा. मुख्यमंत्री यांनी व त्यांचे सरकारने मातंग समाजाची आर्टी या स्वायत्त संस्थेच्या कार्यालयाचे उद्घाटन करून ही संस्था कार्यान्वित केल्याबद्दल आम्ही आपले व महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन करून आभार व्यक्त करत आहोत. मातंग समाजाच्या विविध मागण्यांबाबत दि. २५ मार्च २०२३ रोजी मातंग समाज प्रतिनिधी यांच्या समवेत सविस्तर चर्चा करून आपण प्रामुख्याने खालीलप्रमाणे निर्देश बार्टी या संस्थेस दिलेले होते. मातंग समाजाच्या उन्नतीसाठी अनुसूचित जाती आरक्षणाचे अ,ब,क,ड नुसार उपवर्गीकरण करण्यासाठी लोकसंख्येचा तुलनात्मक अभ्यास करणे, सर्वोच्च न्यायालयात अपिल क्र. ६७५८/२००० इ.व्ही. चिन्नया विरूद्ध आंध्रप्रदेश व इतर न्यायालयीन प्रकरणी सन २००० मध्ये दिलेल्या निर्णयाचा अभ्यास करणे, आंध्रप्रदेश, तामिळनाडू, पंजाब, हरियाना व कर्नाटक या राज्यांत ज्या धर्तीवर अनुसूचित जाती आरक्षणाचे उपवर्गीकरण मंजूर करण्यात आले आहे.

# हजरत सांगडे सुल्तान मुश्किले आसान यांचा उर्स महोत्सव उत्साहात साजरा होणार

**तभा वृत्तसेवा**
**कंधार,१२ ऑगस्ट -**

महाराष्ट्र व परराज्यातील हिंदू मुस्लिम यांचे श्रद्धास्थान असलेल्या सूफी संत हजरत सय्यद शेख अली सांगडे सुल्तान मुश्किले आसान रय. अ. यांचा ५९० वा उरूस महोत्सव अनेक वर्षापासून पारंपरिक सदभावना आणि मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार असल्याचे सय्यद शाह अनवारुल्लाह हुसैनी रफाई कादरी सज्जादा नशीन व मुतवल्ली दर्गाह हजरत सांगडे सुल्तान मुश्किले आसान रय. अ. कंधार यांचे वंशज यांनी बोलताना सांगितले.

पुढे बोलताना सय्यद शाह अनबारुल्लाह हुसैनी म्हणाले की, हिंदू-मुस्लिम यांचे श्रद्धास्थान असलेले प्रेम, शांती आणि बंधूत्व शिकविणारे महान सूफी संत हजरत सय्यद शेख सांगडे सुल्तान मुश्किले आसान र. अ. याचा उरुस दि.१४ अगस्ट २०२४ रोजी सायंकाळी ५.३० वाजता संदल मिरवणूक दर्गाह मधून निघेल व रात्री १०.०० वाजता दर्गाह परिसरात सूफी संत यांच्या महान कार्या वर प्रबोधनात्मक कार्यक्रम दि. १५ अगस्ट २०२४ रोजी सकाळी ७ ते १० बाजेपर्यंत फातेहा का प्रसाद व भोजन करण्यासाठी त्यांच्या निवासस्थानी भाविकांना सांगण्यात आले व सायंकाळी चिरागां चा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून दि. १६ अगस्ट रोजी सायंकाळी ५.३० वाजता हजरत सय्यद शाह अजीमोद्दीन (शाह धड़क) र. अ. आणि स. शाह मोईनोद्दीन (शाह कडक) र. अ. कंधार यांचा संदल व रात्री प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या वर्षी सूफी संत हजरत सय्यद शेख सांगडे सुल्तान मुश्किले आसान त्यांचा ५९० या उरूस महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे तरी सर्व भाविकांनी गर्दी न करता शिस्तीने सूफी संत यांचे दर्शन घते



बेळेस कोणत्याही अनुचित प्रकार घडू नये याची काळजी प्रत्येक भाविकांनी घेण्यात यावी व आपल्याघरी सुखरूप जावे हीच स्द्भावना त्यांनी व्यक्त केली. कंधार शहरातील जगतुंग तलावात पाणीसाठा मोठ्या प्रमाणात असल्याने आपला हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात यावा पण तळ्याकाठच्या जवळ असल्याने भाविकांना कळविण्यात येते की जगतुंग तलावाकडे आपले नातेवाईक मुले बाळ यांना तलावाकडे जाऊ देऊ नये असे सय्यद शाह अनवारुल्लाह हुसैनी रफाई कादरी सज्जादा नशीन व मुतवल्ली दर्गाह हजरत सय्यद शेख सांगडे सुल्तान मुश्किले आसान यांचे वंशज यांनी आवाहन केले आहे.